
साप्ताहिक

# माणूस

६० पैसे
२२ एप्रील १९६७



कल्पवृक्ष कन्येसाठी
लावुनिया बाबा गेला
वैभवाने बहरून आला
याल काहो बघायाला

# "डायमंड"

**टॅक्सी व रिक्षा मीटर्स**

भारतात सर्वप्रथम निर्मिती
डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,
११८० बुधवार पेठ, पुणे २.

**डायमंड वॉच कंपनी**
११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रुमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.




**एक समग्र साप्ताहिक**

*वर्ष : सहावे*
*अंक : बेचाळीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५१*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## शुभेच्छा

लता मंगेशकरांच्या पार्श्वगायनास पंचवीस वर्षे पूर्ण होत असल्याने येत्या २५ एप्रिलला त्यांचा मुंबई येथे एक भव्य सत्कार होत आहे. यानिमित्त लताबाई-संबंधी एखादी छोटी पुरवणी 'माणूस'-ने काढावी अशी सत्कार समितीशी संबंधित असणाऱ्या काही व्यक्तींची अपेक्षा होती. त्यातल्या त्यात मंगेशकर घराण्याचा आणि 'माणूस' परिवारापैकी श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचा घनिष्ट संबंध. त्यामुळे पुरवणीच्या कामाला चालना मिळाली. ज्या कलावंतांनी मुलाखती दिल्या, लेख पाठवून सहकार्य केले, त्या सर्वांचे आभारी आहोत.

मा. दीनानाथांची पंचवीसावी पुण्यतिथीही याच वेळी साजरी केली जात आहे. एक स्वतंत्र पुरवणी काढावी एवढ्या योग्यतेचा हा थोर कलाकार! अंगी असामान्य गुणसंपदा असूनही सर्वोच्च यशापासून वंचित राहिलेला हा मानी मनाचा कलावंत! पण काळाच्या प्रतिकूलतेमुळे वडिलांना न लाभलेले, हे आपल्या क्षेत्रातील सर्वोच्च शिखर होण्याचे भाग्य मुलीच्या पायाशी मात्र आज लोळण घेत आहे. काय म्हणावे या योगायोगाला! गौरव समारंभाचा स्वीकार करताना या योगायोगासंबंधी लताबाईंची भावना कोणती असेल! आपल्या बाबांविषयी नितांत पूज्यभाव बाळगणाऱ्या मुलीला हा स्वागत सोहोळा चालू असताना असेच वाटत असेल का......?......याल का हो बघायला! एकदाच, एकच वेळा!

शुभेच्छा आणि प्रणाम

—संपादक

केल्याचे माझ्या ऐकिवात वा वाचनात आलेले नाही. या प्रकरणी त्यांची वाचा का बसावी ?

येथील, युनायटेड गोअन्स पक्षाची ' निशाणी ' हात ' ही आहे. हा हात संत झेवियरचा हात आहे, असा प्रचार करून यु. गो. ला मते मागितली जातात. धर्मवेडया अज्ञ जनतेची ही फसवणूक ' फायदेशीर ' असल्याने तिच्याकडे कानाडोळा केला जात आहे.

मानमरातब मिळविण्यासाठी, स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी धर्माचा आधार घेणारी माणसे सगळयाच धर्मात व सगळयाच देशांत आहेत. पण त्यांच्या अस्तित्वामुळे बहुजनसमाज मात्र अज्ञानाच्या अंधारात चाचपडत असतो. त्याला वाचविण्याचे काम समाजधुरिणांचे व विचारवंतांचे आहे. सुदैवाने गोव्यात यु. गो. पक्षातून फुटून ' फुर्तादो गट ' स्थापन करणारी पुरोगामी विचारसरणीची सुशिक्षित व बहुजन–हितदक्ष निःस्वार्थी माणसे आहेत. प्रा. आर्मान्द मिनिझिस, प्रा. मेलिशियु फर्नांडिस, टॉनी फर्नांडिस, अँथनी डिसौझा, थॉमस डायस, अनास्तासियु आलमैद, फेलिक्स कार्दोज अशी कितीतरी पुरोगामी माणसे आहेत. आपल्या धर्मबांधवांना पुरोगामी दृष्टी देण्याचे कार्य त्यांनी सुरू केले आहे. त्यांच्या या थोर कार्यात येथील ' महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने ' संपूर्ण सक्रीय सहकार्य करणे आवश्यक आहे.

...गोव्यातील वस्तुस्थिती ही अशी आहे. ती कटू आहे त्याला काय करायचे ? तेव्हा, ती कुणी चव्हाटयावर मांडली तर त्याबद्दल कुणाही ख्रिस्ती बांधवाने वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. या परिस्थितीवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न न करता, तिला तोंड देऊन ती बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्री. लोखंडे व डिसौझा यांची धार्मिक ऋणानुबंधातून स्फुरलेली कळकळ मी समजू शकतो. पण पुण्याला व घोडेगावला ( म्हणजे पुण्यालाच का ? ) राहून त्यांनी गोव्यातील घटनेबाबत सारवासारव करावी, हा शुद्ध उंटावरून शेळया हाकण्याचा प्रकार होय. धर्मगुरू म्हटला की, तो सद्‌गुणांचा पुतळा असणारच असे नाही. उलट, चारित्र्यहीन, नैतिक अधःपात झालेला व नीच हेतुस्तव आपल्या अधिकाराचा वापर करणारासुद्धा धर्मगुरू असतो. अशा हिडीस धर्मगुरूंचे नमुने गोव्यातील खुद्द ख्रिश्चन धर्मीय पत्रकारांनी आपल्या दैनिकांतून जाहीरपणे मांडलेले आहेत. अशा धर्मगुरूंची ओळख करून घेणे असल्यास सर्वश्री बा. पा. लोखंडे व जॅक डिसौझा यांनी गोव्याची जरूर वारी करावी. त्यांची उतरण्याची सोय मी माझ्या घरी करीन.

**रत्नकांत पावसकर,**
पांडववाडी, आके (गोवा)

## राष्ट्रपतींची निवड

# काँग्रेसची मिरासदारी संपली

सध्या देशात चर्चा चालू आहे ती राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसंबंधी. गेले पंधरा-वीस दिवस प्रत्येक वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर यासंबंधीच्या बातम्या ठळक रीतीने प्रसिद्ध होत होत्या. राष्ट्रपतिपदाची निवडणूक काही पहिल्याप्रथम होत आहे, असे नव्हे; परंतु यापूर्वीच्या या निवडणुकीबाबत लोकांत फारशी उत्सुकता नसे. याचे कारणही उघड होते. संसदेतील व राज्यांच्या विधिमंडळांतील सदस्य हे या निवडणुकीतील मतदार असतात. आतापर्यंत संसदेतच काय, पण सर्व राज्यांच्या विधानसभांतही काँग्रेस पक्षाचे एवढे प्रचंड बहुमत असे की, काँग्रेस श्रेष्ठांनी सुचविलेला उमेदवार एकमताने निवडून यणार हे ठरलेलेच. असे इतर दोन-चार उमेदवार उभे राहत असत. पण ते इतके चिल्लर असत की त्यांची कोणी दखलही घेत नसे.

पण आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. नुकत्याच आटोपलेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्वच राज्यांच्या विधानसभांमध्ये काँग्रेसची फार मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. लोकसभेतील काँग्रेसचे बहुमतही बऱ्याच प्रमाणांत घटले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने उमेदवार सुचवावा व इतर विरोधी पक्षांनी तो मान्य करावा, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. साऱ्या देशभर मतदारांनी हा जो काँग्रेसविरोधी कौल दिला तो राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतही दिसून येणे अपरिहार्य आहे.

वस्तुत: राष्ट्रपती हा राष्ट्राचा सर्वोच्च अधिकारी असल्यामुळे या निवडणुकीला पक्षीय स्वरूप यण्याचे कारण नव्हते. सर्व पक्षांना मान्य होईल व जनतेच्या आदराला पात्र होईल, अशा कर्तृत्वसंपन्न व्यक्तीची या पदावर निवड होणे आवश्यक आहे. काँग्रेस श्रेष्ठांनी पूर्वी विरोधकांची उपेक्षा केली हे समजण्यासारखे होते; परंतु या वेळी काँग्रेससह सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक भरून तीत राष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरला असता तर भारतीय लोकशाहीने एक नवा संकेत निर्माण केला असे घडले असते. या बाबतीत प्रारंभी आपण विरोधी पक्षनेत्यांचा सल्ला घेऊ, असे प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी जाहीर केले होते. परंतु विरोधकांशी सहकार्य करण्याच्या त्यांच्या या धोरणावर काँग्रेसपक्षात एवढी टीका झाली की, त्यांना आपल्या पक्षीय सहकाऱ्यांच्या आग्रहामुळे नमावे लागले. विरोधी पक्षनेत्यांशी याबाबतीत त्या निश्चित स्वरूपाचे काहीही बोलेनात.

त्यामुळे लोकसभेत प्रतिनिधित्व करीत असलेल्या सर्व प्रमुख विरोधी पक्षनेत्यांनी आपली बैठक बोलावून तीत आपला उमेदवार निवडण्याचे ठरविले. या बैठकीतही मतभेदांचे दर्शन झाले. एका दृष्टीने तसे होणे साहजिकही होते; परंतु राममूर्तीसारखा अनुभवी नेत्याने सर्व नेत्यांची समजूत घालून सरन्यायाधीश सुब्बाराव यांना आपण राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार म्हणून उभे करावे असे सुचविले. सुब्बारावांसारखा सरन्यायाधीशपद भूषविणारा पंडित या निवडणुकीच्या धकाधकीत पडेल किंवा नाही यासंबंधी इतर पक्षनेत्यांना शंका होती. त्या बैठकीत त्यांनी ही शंका बोलूनही दाखविली; परंतु इतर कोणाहीपेक्षा सुब्बारावांच्या स्वभावाची राममूर्ती यांना चांगली माहिती आहे. त्यामुळे 'आपण त्यांचे नाव तर सुचवू,' असे राममूर्ती यांनी सांगताच इतर सर्वांनी या नावाला एकमताने संमती दिली. आपले नाव राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी सुचविण्यात आलेले आहे हे कळताच सुब्बाराव यांनी प्रारंभी असे जाहीर केले की, काँग्रेससह सर्व पक्षांचा आपणांस पाठिंबा असेल तरच आपण ही निवडणूक लढवू. या वेळी काँग्रेस पक्ष आपल्या नावास पाठिंबा देईल, अशी त्यांची कल्पना होती.

## कामराज-गांधी दोन तट

परंतु डॉ. राधाकृष्णन यांनीच पुन्हा राष्ट्रपती व्हावे, असा कामराजांनी आग्रह धरला. स्वत: डॉ. राधाकृष्णन यांनाही आपण आणखी पाच वर्षे राष्ट्रपतिपदावर राहावे, असे वाटत होते; परंतु डॉ. राधाकृष्णन यांच्या नावाला इंदिरा गांधी यांचा इतका विरोध होता की, त्यांनी इतर कोणीही चालेल पण डॉ. राधाकृष्णन नकोत, अशी आग्रही भूमिका घेतली. काँग्रेस श्रेष्ठांमध्ये अशा रीतीने दोन तट पडले असल्यामुळे विरोधकांनी सुचविलेल्या सुब्बारावांच्या उमेदवारीचा विचार करणे श्रीमती गांधी यांना सर्वस्वी अशक्य झाले. त्यामुळे सर्वसंमत उमेदवार निवडण्याची शक्यता नाहीशी झाली. डॉ. राधाकृष्णन यांना विरोध करताना काँग्रेस पक्षा-

तील बहुसंख्य सदस्यांना मान्य होईल, असा उमेदवार निवडणे आवश्यक होते व त्यामुळे इंदिरा गांधी यांनी सध्याचे उपराष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांचे नाव सुचविले. डॉ. झाकिर हुसेन यांचे नाव सुचविण्यामागे दोन उद्देश होते. एक तर इतर कोणाही व्यक्तीपेक्षा उपराष्ट्रपतींचा राष्ट्रपतिपदावर अधिक हक्क पोहोचतो, ही गोष्ट सर्वांना मान्य होण्यासारखीच होती. शिवाय डॉ. हुसेन यांच्यासारख्या 'मुसलमानाची' निवड केल्याने अल्पसंख्याकांना हायसे वाटणार होते, हे दोन्ही हिशेब मनाशी बाळगून संसदीय कॉंग्रेस मंडळाच्या बैठकीला श्रीमती गांधी हजर राहिल्या. बैठकीला प्रारंभ होताच त्यांनी डॉ. झाकिर हुसेन यांच्या नावाचा प्रस्ताव मांडताच बहुतेक सर्व सदस्यांनी त्यांना पाठिंबा दिल्यामुळे कामराजांना डॉ. राधाकृष्णन यांच्या बाबतीतील आपला आग्रह आपोआप मागे घ्यावा लागला.

कॉंग्रेसमधील बहुसंख्य सभासद आपल्या पाठीशी नाहीत, हे या बैठकीमुळे डॉ. राधाकृष्णन यांना आढळून येताच त्यांनी मोठ्या साळसूद रीतीने आपण निवडणूक लढविण्यास तयार नसल्याचे जाहीर केले. परंतु संसदीय कॉंग्रेस मंडळाचा कौल कळेपर्यंत ते या प्रकरणी गप्प होते. त्यामुळे नंतर त्यांनी जो निवृत्तीचा उदार दृष्टिकोन स्वीकारला आहे, त्याबद्दल येथे कोणालाच कौतुक वाटत नाही. केवळ अंतर्गत मतभेदामुळे कॉंग्रेस पक्ष आपल्या उमेदवारीचा पाठपुरावा करू शकत नाही, हे आढळून येताच सुब्बाराव यांनीही कॉंग्रेस पक्षाच्या पाठिंब्याशिवाय निवडणूक लढविण्यास आपण तयार आहोत, असे जाहीर केले. इतकेच नव्हे तर सरन्यायाधीशपदाचा तडकाफडकी राजीनामा देऊन टाकला. त्यामुळे डॉ. झाकिर हुसेन विरुद्ध सुब्बाराव असा आता सामना होणार आहे.

## तडजोड संपली

पुढल्या महिन्यात नव्या राष्ट्रपतींप्रमाणे नव्या उपराष्ट्रपतींचीही निवडणूक होणार आहे. कॉंग्रेसपक्षाने व्ही. व्ही. गिरी यांना उभे केले आहे तर विरोधी पक्षांतर्फे प्रा. हबीब उभे राहण्याचे घाटत आहे. विरोधी पक्षनेत्यांनी प्रारंभी अलीयावर जंग यांच्या नावाची सूचना केली होती; परंतु उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत केवळ लोकसभेच्या आणि राज्यसभेच्या सदस्यांनाच मतदान करता येत असल्यामुळे व या दोन्ही सभागृहांत कॉंग्रेसचे निर्विवाद बहुमत असल्यामुळे आपण हमखास पराभूत होणार हे अलीयावरजंगना कळून चुकल्यामुळे त्यांनी निवडणूक न लढविण्याचे ठरविले व त्या ऐवजी आपले एक सहकारी प्रा. हबीब यांना उभे करावे, असे विरोधी पक्षनेत्यांना कळविले.

प्रा. हबीब यांच्या नावाचा प्रस्ताव मांडताना कॉंग्रेस पक्षाशी तडजोड करण्याचा मूळ उद्देश होता. राष्ट्रपती–उपराष्ट्रपती यांची अविरोध निवडणूक व्हावयाची असेल तर विरोधी पक्ष सुब्बाराव यांची उमेदवारी मागे घेतील व कॉंग्रेस पक्षाने उपराष्ट्रपतिपदासाठी उभे केलेले गिरी यांनी माघार घेऊन सुब्बाराव यांची त्या

जागी निवड करावी, असा हा पर्याय होता. परंतु गेल्या निवडणुकीतील पराभवाचा घडा ध्यानी घेण्यास काँग्रेस श्रेष्ठ अद्यापही तयार नाहीत. सर्वसामान्य जनतेपासून हा पक्ष इतका दूर गेला आहे की त्याला विरोधी पक्षांची दखल घेण्याचेही भान उरलेले नाही. इतर कोणत्याही पक्षापेक्षा आपल्याला अधिक मते पडली आहेत व अधिक जागा मिळाल्या आहेत, एवढ्या समाधानावर काँग्रेस श्रेष्ठ विरोधी पक्षांबरोबर सामना करण्यास उभे ठाकले आहेत. काँग्रेस गोटात फूट पडली नाही तर काँग्रेसचे दोन्ही उमेदवार निवडून येतील, याविषयी कोणालाच शंका नाही. परंतु काँग्रेस पक्षाची सत्तेच्या मिरासदारीची सद्दी संपली आहे एवढी गोष्ट मात्र ही निवडणूक सहज सिद्ध करील. इतकेच नव्हे तर काँग्रेसमधील फाटाफुटीला आणखी पाय फुटतील. या निवडणुकीने विरोधी पक्षीयांना साध्य करावयाचे आहे ते हेच.

आगामी वाटचालीच्या दृष्टीने या डावपेचांना बराच अर्थ आहे; परंतु या डावपेचांमध्ये सुब्बारावांसारख्या सर्वोच्च न्यायाधीशाने वाटेकरी व्हावे, ही गोष्ट मात्र सर्वांनाच खटकत आहे. स्वत: सुब्बाराव मात्र या बाबतीत आज तरी काहीच बोलावयास तयार नाहीत. त्यांचे मौन सूचक आहे, एवढे मात्र नक्की.

—सदाशिव पेठकर


*★ शेतकऱ्यांचा विकास म्हणजे देशाचा विकास. ★ भरपूर उत्पादन म्हणजे देशाची भरभराट. ★ विकास आणि उत्पादन यांसाठी सतत उद्योग करीत राहून संघ व राष्ट्र बळकट करा.*

**पुणे जिल्हा**

**सहकारी खरेदी-विक्री संघ लि.**

१२५ भवानी पेठ, पुणे २

*फोन नंबर २३२१५ २३५८८*

★ शीतगृह ★ खतपुरवठा. ★ शेतीच्या मालाची विक्री.
★ इंजिने, तेले, लोखंडी माल.

अशा प्रकारच्या शेतकऱ्यांच्या हितासाठी व भरभराटीसाठी संघ अहर्निश प्रयत्न करीत आहे.

**संभाजीराव काकडे**
*बी. ए., एलएल. बी. मॅनेजर*

**मुगुटराव साहेब काकडे देशमुख**
*चेअरमन*

# मुक्ताफळे



## □ राष्ट्रपती कसा निवडतात ?

अती गुणाकार भागाकार केल्याखेरीज राष्ट्रपती निवडला जात नाही. हा उद्योग सहज करण्यासारखा नाही. पाटी-पेन्सिल घेऊन बसलात तरच निभाव लागेल. घ्या पाटी पेन्सिल—

गणित १ ले : अ या राज्यातील लोकसंख्या एक कोटी एक लक्ष एक हजार सहाशे आहे. विधानसभेत लोकांनी निवडून दिलेले एक हजार व रिकामटेकड्या गव्हर्नरांनी नेमलेले पाच अँग्लो इंडियन, ज्यू आदी सभासद आहेत तर प्रत्येकी विधानसभा सदस्याला राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मते किती ?

उत्तर : जे पाच सभासद लोकांनी निवडलेले नाहीत ते या मतदानाला नालायक म्हणून त्यांचा विचारच करावयाचा नाही. उगाचच उत्तर चुकवण्यासाठी दिलेली ही फालतू माहिती आहे.

आता एक कोटी एक लक्ष एक हजार सहाशे या संख्येला एक हजार या सभासद संख्येने आपण भागू या. भागलेत का ? भागाकार दहा हजार एकशे एक आला.

यातील एकशे एक ही संख्या पाचशेहून कमी असल्याने हजाराच्या हिशेबात ती दुर्लक्ष करायची. अतएव हिशेबाला भागाकार दहा हजारच आला असे समजावे.

म्हणून अ राज्याच्या एक हजार विधानसभेच्या सभासदांना प्रत्येकी राष्ट्रपतीच्या निवडणुकीत दहा हजार मते आहेत हे उत्तर.

समजले ? आता दुसरे गणित—

गणित २ रे : प्रश्नसमुदाय तोच.

समजा अ, ब, क, ड,...ई...अशी अठरा राज्ये आहेत. यात प्रत्येकी एक हजार विधानसभेचे लोकनियुक्त सभासद आहेत व या प्रत्येकाला राष्ट्रपतीच्या निवडणुकीत दहा हजार मते आहेत. लोकसभेत पाचशे व राज्यसभेत पाचशे सभासद आहेत; तर प्रत्येक लोकसभा सदस्याला राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मते किती ? राज्यसभा सदस्याला किती ?

उत्तर : सर्व विधानसभांची एकूण मते :–

१८ × १,००० × १०,००० = १८,००,००,०००

म्हणजे अठरावर सात शून्ये. कर्जबाजारी देशाने संख्या अशीच लक्षात ठेवावी. हे सोपे जाते.

अठरावर सात शून्ये या संख्येला लोकसभा व राज्यसभा मिळून सभासदांची संख्या–जी १,००० आहे त्या संख्येने भागू या! भागलेत ?

उत्तर आले अठरावर चार शून्ये. अबब ! म्हणे लोकसभेच्या व राज्यसभेच्या प्रत्येक सभासदाला राष्ट्रपतीच्या निवडणुकीत प्रत्येकी एक लाख ऐंशी हजार मते आहेत हे उत्तर !

काही शिरते का डोक्यात ? ही मतदान पद्धती ग्यानबाला समजायला तीन निवडणुका व्हाव्या लागल्या. पहिल्या खेपेला विचारले तर सगळे सांगत–ते फार गुंतागुंतीचे आहे ! दुसऱ्या खेपेला एका गृहस्थाने हे प्रकरण सर्व तोंडी सांगितले. या वेळी मात्र पाटी-पेन्सिल घेऊन बसलो. ही पद्धती एवढी किचकट का ? भारता-पुढच्या समस्यांच्या मानाने ही गणित पद्धत फारच सोपी आहे, हे जेव्हा लक्षात येते तेव्हा आनंद होतो. ही कठीण गणितं अशासाठी ठेवली आहेत की ज्या राज्यात लोकसंख्या जास्त त्या राज्याला राष्ट्रपती निवडणुकीत तेवढ्या प्रमाणात अधिक मते देता येतात.

लोकसंख्या !! यावरून असे दिसते की महाराष्ट्र हा 'कुटुंबनियोजना'त व 'लूप' स्पर्धेत आघाडीवर आहे, हा ना. नाईक यांचा अभिमान सार्थ मानला तर राष्ट्रपती-पदाच्या निवडणुकीत महाराष्ट्र लवकर मागे पडेल, हे उघड दिसते. मग केरळ, आंध्र, मद्रास ही राज्ये या निवडणुकीत महत्त्वाची ठरतील. ही राज्ये प्रजो-त्पादनात आघाडीवर आहेत. म्हणजे लोकसंख्या ही महत्त्वाची दिसते!! कुटुंबनियो-जनाला मुसलमान धर्माचा विरोध असल्यानेच यंदाच्या या महान निवडणुकीत दोन मुसलमान उमेदवार आघाडीवर आहेत की काय ? छे: छे: प्रश्न जास्तीच किचकट होत चालला. विचार बंद करणे चांगले. डॉ. झाकिर हुसेन हे राष्ट्रपतिपदासाठी व उपराष्ट्रपतिपदासाठी अलियावर जंग उभे राहिले तर त्यांनी कुटुंबनियोजनाचा व लूपचा जाहीर पुरस्कार करणे हाच यावर उपाय दिसतो !

मात्र डॉ. राधाकृष्णन यांना निवडणुकीतून माघार घ्यायला लावून इंदिरा गांधी यांनी मोठा विजय संपादन केला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इंदिराजींच्या सरकारवर २६ जाने. च्या भाषणात राष्ट्रपतींनी जे प्रहार केले व लोकक्षोभाची मजल इंदिराजींच्या नाकावर दगड फेकण्यापर्यंत गेली, ही गोष्ट इंदिराजींनी विस-रावी, असे कसे म्हणता येईल! इंदिराजींचे नाक दुखावले तेव्हाच आम्ही ओळखले की राष्ट्रपतींच्या निवडणुकीत नाक कापले जाणार ! राष्ट्रपतीच्या निवडीतही बरेच गुणाकार भागाकार असतात हे तात्पर्य ! कुणाला तरी कामराजांनी गुणावे,



ही ठिणगी . . . . .

या ठिणगीचा अर्थ

आणि

अनर्थही . . . . . . ?

# व्होल्गा

# जेव्हा लाल होते

इंदिराजींनी मागावे– बाकी उरत नाहीसे दिसले की, त्या उमेदवाराने माघार घ्यावी! डॉ. झाकिर हुसेन यांचे इंदिराजींनी जे गुणवर्णन केले ते यथायोग्य आहे. त्यांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे ते हिंदू नाहीत. कल्पना करा, डॉ. झाकीर हुसेन यांनी निवडणुकांपूर्वी धर्मांतर केले–नुसती कल्पना करायची म्हटले तर! मोठी गंमत उडेल. अजय मुखर्जींचे उजवे हात हुमायून कबीर यांनी जाहीर केले आहे, की काही झाले तरी ते व त्यांचे चरणदास डॉ. झाकिर हुसेन विरुद्ध मते देणार नाहीत! का बुवा? डाव्यांच्या आडदेखील असे 'छुपे प्रेम' दडून आहे हे इंदिराजींनी ओळखले आहे. त्या हे सगळे ओळखतात. त्यांना सर्वांत राग कशाचा असेल तर तो हिंदू जातीयवादाचा. डॉ. झाकिर हुसेन यांनाच सर्वांनी मते द्यावीत हे काय सांगायला हवे? लोकसंख्येचे संख्याशास्त्रही महत्त्वाचे आहे. धर्म महत्त्वाचा आहे! हिंदूंच्या हितासाठी या गोष्टी राबवल्या तर तो जातीयवाद! मुसलमान, ख्रिश्चन यांसाठी राबवला तर तो लोकशाही समाजवाद! इंदिराजींच्या प्रखर नेतृत्वाचे हे सुत्र समजले तर कितीतरी मोठाले गुणाकार भागाकार सहज करता येतात. राष्ट्रपतींचे गणित तसे सोपेच आहे.

## ❑ काँग्रेसची लोकप्रियता

मार्च ६६ ते फेब्रुवारी ६७ या ३६५ दिवसांत भारतातील निरनिराळ्या व्यापारी कंपन्यांकडून राजकीय पक्षांना जी मदत झाली त्याचे आकडे काँग्रेस विकास मंत्री फक्रुद्दिन अली महंमद यांनी लोकसभेत सादर केले.

काँग्रेस : ६,२७,५३८ रु. स्वतंत्र : १३,३२० रु. जनसंघ : २,४८८ रु.
प्र. स. : २,०३० रु. सं. सो. पा. : १,०२१ रु. इंटक : ५०० रु. हिंदुमहासभा : २१ रु.

काँग्रेस पक्षाला जनतेकडून ही जी प्रचंड आर्थिक सहानुभूती लाभली तिचे वैषम्य वाटून स्वतंत्र पक्षाचे अध्वर्यू राजगोपालाचारींनी लिहिले–

"Such was the force and terror of the Congress Party's funds that until now there was little hope to replace it." का बुवा? पैशाची कसली आली आहे टेरर? सहा लक्ष रुपये काँग्रेसला मिळाले आणि पुण्याला सहस्रबुद्धे यांना एक बोर्ड रंगवायला जेमतेम पुरतील इतके एकवीस रुपये मिळतात, यातून जनतेचे प्रेम कुणावर आहे हे सिद्ध होते की टेरर? कंपन्यांच्या नफातोटा पत्रकात दाखवणे परवडले तेवढेच हे आकडे आहेत. प्रत्यक्ष जनतेचे व शेतकऱ्यांचे काँग्रेसवरील प्रेम यापेक्षा सहस्रपटीने आहे हे काय सांगायला हवे? सर्व विरोधी पक्ष जर म्हणे एकत्र आले तर म्हणे काँग्रेसला धक्का बसेल. करा हिशेब सगळ्या पैशांचा आणि प्रेमाचा. सर्व विरोधी पक्षांचे मिळून १९,३८० रुपये झाले. झाला सहा लक्षांचा पराभव? आपले उगाचच काहीतरी बोलायचे म्हणजे काय? आता यात कम्युनिस्ट पार्टीला एक कपर्दिक मिळाली नाही, असे असून जवळ जवळ काँग्रेस एवढेच पैसे डांगे मॉस्कोहून आणतात, असा

आपला लोकांचा संशय आहे. म्हणून तर पाटील म्हणाले की, काँग्रेसच्या सर्व निवडणूक फंडाचा तपशील मी जाहीर करतो. डांग आपल्या पक्षाचा निवडणूक फंड कुठून आला हे सांगतील का? डांगे गप्प. अक्षर बोलले नाहीत. निवडणुकीत लोकांनी मते कमी दिली, काही प्रांतांत मंत्रिमंडळे गडगडली. यावरून काँग्रेस संपली, संपवण्याच्या मार्गावर आहे, असा पुकारा काही विरोधी नेत्यांनी चालवला आहे. आमचे म्हणणे फेब्रुवारी १९६७ अखेर असलेले हे प्रचंड प्रेम एकदम कसे आटेल? आमचा यावर विश्वास नाही. पुढल्या निवडणुकीतही व्यापारी कंपन्या काँग्रेसलाच लक्ष वाहतील अशी आमची खात्री आहे. असे झाले नाही तर हे पैसेवाले चालत्या घोड्यावरील गोमाशा आहेत, असे आम्ही समजू. यातील पुष्कळजण 'गोभक्त' आहेत ते 'गोमाशा' ठरतील, असा इशारा आम्ही आताच देतो!

## □ चाळिशी

महाराष्ट्राचे दुसरे यशवंतराव—यशवंतराव मोहिते— हे सध्या फॉर्मात आहेत. त्यांनी नुकताच एक स्पुटनिक सोडला. दादर भगिनी समाजाच्या जागेत एका सामाजिक कार्यकर्त्या भगिनीच्या सत्कारात बोलताना यांनी सांगितले—

"देशापुढील समस्या सोडवण्यासाठी विचारसरणीत आमूलाग्र बदल हवा व चाळिशीच्या आतील माणसाकडेच नेतृत्व असणे आवश्यक आहे."

चाळिशी आली की माणूस चष्मा लावतो, त्याची दृष्टी अधू होते. डोक्यावरचे केस क्वचित पातळ होऊ लागतात. कामवासना मंद होऊ लागते ही सामान्य लक्षणे सर्वांना माहीत आहेत. परंतु चाळिशीनंतर देशापुढील समस्या सोडवण्यास तो नालायक ठरतो. हा नवा सिद्धांत फार महत्त्वाचा आहे. कर्तृत्व हे बहुधा चाळिशीच्या आत घडते हे मान्य! परंतु जेथे कर्तृत्वाचा प्रश्नच नसतो अशा गोष्टी चाळिशीनंतर करण्यास काय हरकत आहे. निवडणुकीला उभे राहावे, विधानसभेत बसावे, तेथे थोडा वेळ बसल्यावर लोकसभेत बसावे. याला चाळिशीनंतर मनुष्य अधिक लायक होतो असे आम्हांस वाटते. देशापुढील समस्या विधानसभेत किंवा लोकसभेत सुटणार आहेत या भ्रमामुळे कधी कधी असा साक्षात्कार होतो; पण तो दूर केला पाहिजे. सत्तरी सत्तरीची, पासष्ठीची माणसे हमरीतुमरीवर येऊन मंत्रिपदासाठी झुंजतात. याहून वृद्ध राष्ट्रपतिपदासाठी डोळे लावून बसतात. 'वांसासि जीर्णानि...' वगैरे काही म्हणत नाहीत. याला कारण काय याचा उलगडा करणारे मुख्य सूत्र यशवंतराव मोहिते यांनी सांगितले आहे. भारताचे शिक्षणमंत्री त्रिगुण सेन यांनी फक्त विद्वानांनाच डॉक्टरेट द्यावी असा नवाच चमत्कारिक मुद्दा उपस्थित केला असल्याने या चाळिशी विधानाबद्दल यशवंतराव मोहिते यांना डॉक्टरेट द्यावी, असे आम्ही म्हणू शकत नाही. परंतु हा सिद्धांत महत्त्वाचा आहे. एक मिग पोसिजीनचे, एक कोसिजीनचे असली चाळिशी वापरणाऱ्यांविरुद्ध यशवंतरावांच्या या आघाडीला कोण आशीर्वाद देतात ते पाहू!

—ग्यानबा

●

## □ इतिहास संशोधनाचे आधुनिक तंत्र

आणखी एकदा जॉन फ्रीमन या चतुरस्त्र ब्रिटिश विचारवंताचे विचार एका नवीन विषयावर नुकतेच ऐकायला मिळाले, तो विषय म्हणजे "इतिहास संशोधनाचे आधुनिक तंत्र." फ्रीमन म्हणाले, इतिहास–शास्त्र आता इतर शास्त्रांशी इतके निगडित झाले आहे की, ते निराळे काढता येणार नाही. इतिहासकार आता केवळ वाचनालयात बसून इतिहास–संशोधन करू शकणार नाही. त्याला आता समाजशास्त्र, मानवशास्त्र, आकडेशास्त्र, आहारशास्त्र, सौंदर्यप्रसाधनशास्त्र, इतकेच नव्हे तर जादूटोण्यासारख्या विषयातल्या तज्ज्ञांच्या ज्ञानाचाही उपयोग करणे भाग आहे. पूर्वी भूगोलाचा संबंध फक्त नकाशाशी होता आणि इतिहासाचा संबंध फक्त विशिष्ट व्यक्तीशी होता, तेव्हा काम सोपे होते; कारण घडलेल्या गोष्टींची कहाणी सांगणे एवढीच इतिहासकारांपुढे कामगिरी होती. पूर्वी एखाद्या इतिहासकाराचे पुस्तक बिनचूक आहे, असा दुसरा इतिहासकार म्हणू शकत होता; पण आता असे म्हणता येईल अशी आपल्याला खात्री राहिलेली नाही. काल ज्या उत्तराने आपले समाधान होत होते त्याने आज होत नाही.

## □ योगशास्त्राची पाश्चिमात्त्य आवृत्ती

एखाद्या परकीय भाषेचे शंभर शब्द एका तासाच्या आत शिकायचे व लक्षात ठेवायचे ही गोष्ट अशक्य वाटते, पण ती शक्य करून दाखविणारे अजब मनोवैज्ञा-

सुग्रास व चवदार भोजनासाठी

**महाजन भोजन गृह**

(मर्यादित भोजन पद्धत)

**माधवाश्रम, गिरगाव, मुंबई ४**

वेळ : सकाळी ९ ते १२–३० व सायंकाळी : ७ ते ९–१५

**सोमवारी बंद**

निक तंत्र डॉ. जॉर्ज लोझानॉव्ह या बल्गेरियन मानसशास्त्रज्ञाने शोधून काढले आहे. डॉ. लोझानॉव्ह नुकतेच दिल्लीला येऊन गेले, तेव्हा या अत्याधुनिक 'सूचना शास्त्रा'ची माहिती देताना म्हणाले की, निद्रावस्थेतील मोहिनीशास्त्रा'शी याचा संबंध नाही. उलट सूचनाशास्त्राच्या ('सजेस्टोपीडिया'च्या) मार्गाने वर्गात नवीन भाषा शिकणारा विद्यार्थी सबंध वेळ पूर्णपणे जागृतावस्थेत असतो. या प्रायोगिक शिक्षणतंत्राचे फक्त एकच वैशिष्टच आहे व ते म्हणजे नेहमीच्या पद्धतीत शिक्षक शिकवीत असताना विद्यार्थी 'नोटस्' घेतो, त्याप्रमाणे या पद्धतीत घेत नाही. सजेस्टोपीडियाचा विद्यार्थी ज्याप्रमाणे एखादा संगीताचा कार्यक्रम ऐकावा त्याप्रमाणे शिक्षकाचे भाषण केवळ ऐकतो. त्या वेळी विद्यार्थ्यांच्या मनावर कुठलाही ताण नसतो.

म्हणजे सजेस्टोपीडियाचा अर्थ जागृतावस्थेत सुचविणे असा आहे. "या पद्धतीचे भारतीय योगशास्त्राशी बरेच साम्य आहे." या पद्धतीने आश्चर्यकारक गतीने परदेशी भाषा शिकता येते. या तंत्रात संगीत–पद्धतींचा खास उपयोग करण्यात येतो. शिक्षकाच्या भाषणातच शिकायचे शब्द विशिष्ट लयीत पुनः पुनः उच्चारले जातात. हे संगीत कोण तयार करते? "आमच्या केंद्रात ज्याप्रमाणे डॉक्टर व मानसशास्त्रज्ञ आहेत त्याप्रमाणे इंजिनियर व संगीतकारही आहेत. हे संगीतकार आम्हांला हवे तसे संगीत तयार करून देतात. या शास्त्राचा विज्ञान, गणित असले विषय शिकवण्यासही अत्यंत उपयोग होऊ शकेल."

## ☐ चहाची चहा

भारताचा चहा जगात सर्वोत्कृष्ट आहे, यात संशय नाही. असा चहा तयार करण्याचे प्रयत्न इतरत्र होत आहेत, पण भारतीय चहाचे स्थान अढळ राहील. या चहाशी एकच गोष्ट स्पर्धा करू शकेल व ती म्हणजे 'इन्स्टंट कॉफी.'—लायन्स आणि कंपनी या ब्रिटिश हॉटेल कंपनीचे प्रमुख सर सॅम्युएल यांची चहा-प्रशस्ती. ●

सुज्ञ लोकांची आगाऊ तरतूद
आगामी पावसाळ्यासाठी
स्त्रिया व पुरुषांकरिता विविध प्रकारच्या सर्वोत्कृष्ट छत्र्या
मार्केट भावाने मिळण्याचे एकमेव विश्वसनीय ठिकाण.
एन्. व्ही. गोखले
*टोप्या, होजिअरी व अद्ययावत तयार कपड्यांचे व्यापारी*
प्रार्थना समाजजवळ, गिरगाव, मुंबई ४.

## मग पालक कोण ?




आपले सरकार म्हणजे जनतेचे 'बालक' आहे
अशी भूमिका श्री. अण्णा दुराई यांनी घेतली आहे.

# समज

**मीना शेवाळकर**


त्या दिवशी मी अनूबरोबर नाटक पाहण्यासाठी गेलो होतो. रात्रीचे दोन वाजले होते. आम्ही चालतो होतो. झरझर......झपझप. आणि इतक्यात मला माधव दिसला. माधव पाटील. माझा बालमित्र. नकळतच मी त्याला हाक मारली. एखाद्या धुमकेतूसारखाच तो रस्त्यावर भेटला. अगदी अचानक ह्या क्षणाला तो मला दिसेल असं माझ्या ध्यानीमनीसुद्धा नव्हतं. मी निरखून पाहिले. त्याच्या दोन बोटांत जळती सिगारेट धुमसत होती व दुसऱ्या हातांत कसले तरी मासिक होते. अनूची व त्याची ओळख करून द्यायची काहीच आवश्यकता नव्हती; कारण कॉलेजमध्ये आम्ही तिघेही एकाच क्लासमध्ये शिकत होतो. पण नंतर अनूनं आर्टस् घेतलं. पुढे आमचा प्रेमविवाह झाला. नव्या संसारात व अनूच्या सहवासात दोन वर्षे कशी निघून गेली कळलेदेखील नाही. मी माधवला रविवारी जेवणाचे आमंत्रण दिलेच होते. माधवशी पुष्कळ बोलावयाचे होते, पण आत्ता काय बोलावे तेच समजेना. माधवही बोलण्यास उत्सुक आहे हे मी त्याच्या चेहऱ्यावरूनच ताडलें होते. पण रविवारचे आमंत्रण स्वीकारून तो गर्दीत दिसेनासा झाला.

माधवची व माझी कॉलेजमध्ये ओळख झाली होती. अनू काही दिवस माझ्याच क्लासमध्ये होती. पण ती पुढे आर्टसला गेली. अनूचं व माझं मित्रत्व जडलं इलेक्शनच्या काळात. काळाच्या ओघात मैत्रीचं प्रेमात रूपांतर झालं. ह्या कामी मला माधवची फार मदत झाली. मी नेहमी माधववर विसंबून असे. सगळे विद्यार्थी माधवशी फटकून वागत. कॉलेजमध्ये तो कुप्रसिद्ध होता. अनेकदा मुलींना छेडल्याबद्दल त्याला दंड झाला होता. माझ्यानंतर दोन-तीन वर्षे त्याच क्लासमध्ये होता. दिसण्यातही तो तितकासा चांगला नव्हता. पण ऐटीवरच तो मुलींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असे. असं असूनही त्याचं व माझं मित्रत्वं होतं. माझ्याशी तो सरळ-

पणाने वागत असे. तोच माधव आजपासून अवघ्या दोन दिवसांनंतर भेटण्याचं वचन देऊन गेला होता.

अनूच्या मनाविरुद्ध आपण काही केलं की काय असं मला वाटत होतं; कारण संध्याकाळी जेवताना तिनं विषय काढलाच. " हा माधव इकडे कसा काय उगवला ? तुमची व त्याची दाट मैत्री होती काय ?"

मी नुसता हुंकार देऊन गप्प झालो. माधवला बोलावण्यात माझी चूक झाली होती काय ? माझ्या गळ्यात अडकलेला घास काही केल्या खाली उतरत नव्हता. अनू असं का म्हणाली अंच मला समजेना. मी ताटातलं अन्न कसंबसं संपवून उठलो. अंथरुणावर अंग टाकलं पण पलंगावरील गादीदेखील आज मला बोचत होती. सिगारेटची वलये वातावरणात विरळ होत होती. खिडकीतून पौर्णिमेचा चंद्र आत डोकावत होता; पण आता त्यातील शीतलता मला जाणवत नव्हती. गार वाऱ्याच्या झुळका शरीराचा दाह शांत करण्याचा प्रयत्न करीत होत्या. माधवनेच अनूची व माझी ओळख करून दिली होती, त्यानंतर माझी व माधवची मैत्री तुटणार होती; कारण कॉलेजच्या पटांगणात त्यानं अनूच्या अंगावर फूल फेकलं होतं. अर्थातच मला ते आवडलं नाही. अनू प्रिन्सिपॉल साहनींकडे तक्रार करणार होती, पण मीच मध्यस्थी करून ते प्रकरण तेवढ्यावरच मिटवलं. ह्या क्षुल्लक कारणा-



स्तवच का अनू मला दोष देत होती ? मी कॉटकडे दृष्टी वळवली. अनूचा सडपातळ देह, निरागस चेहरा पाहून मला तिची कींव आली. कपाळावरील वर्तुळाकार गोल बटा वाऱ्याच्या स्पर्शाने स्वैरपणे खेळत होत्या, आमचा एकमेकांवर पूर्ण विश्वास होता, पण मला अनूचं बोलणं खटकलं होतं हे निश्चित.

दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. मी आळसटल्याप्रमाणे उशिरा उठलो. रात्री मनावर पडलेला मानसिक ताण. जागरणामुळे तसं होणं साहजिकच होतं. मी रमाला हाक मारली आणि म्हटले, " रमा, आईला जाऊन सांग की मी आज ऑफिसमधून लवकरच परतणार आहे. डबा द्यायची आवश्यकता नाही. "

पण त्या आधीच दरवाज्यावरील झुळझुळीत पडदा सारून अनू आत आली. तिच्या कपाळावर सूक्ष्म शंकेचे विरळ जाळे पसरले होते. तिच्या त्रासिक चेहऱ्यावरून मी ते तेव्हाच ताडले होते.

" आजही नाटकाला जायचं आहे की, निमंत्रण द्यायचं आहे एखाद्या मित्राला ?" ती खोचकपणे म्हणाली.

मला वास्तविक पाहता अनूचा राग आला होता पण शक्य तो मनावर नियंत्रण ठेवीत मी म्हणालो, " अनू, तुला कालपासून झालं तरी काय असं वागायला ?"

" मला काय होणार आहे ? पण तुम्ही माधवला कशाला निमंत्रण दिलंत ?" तिने विचारले.

आता मात्र माझा राग अनावर झाला. " अनू......" मी धारदार स्वरांत किंचाळलो, " तुला माझ्या मित्रावाचून काय करायचं आहे. "

" अहो, पण त्याचं चरित्र माहीत आहे का तुम्हांला ?" अनू नरमाईने बोलत होती. " मी फार दिवसांपासून त्याला ओळखते. "

" मी त्याच्या सहवासात जास्त दिवस होतो."

ते बोलणं तेवढ्यावरच थांबविण्यासाठी मी घराबाहेर पडलो. पण हृदयात मात्र स्वस्थता नव्हतीच. अनू प्रथमच माझ्याशी असं तुसडेपणाने वागत होती. लग्न झाल्यापासून आमच्या वैवाहिक जीवनात कोणत्याच प्रकारची उणीव भासली नव्हती; किंवा कोणत्याही संकटाने आम्ही ग्रासलो नव्हतो. मग अनूच्या वागण्यात एकाएकी झालेला असा फरक का ?

माझी पाऊले जुहूच्या किनाऱ्यावरील वाळू तुडवीत होती मी एकटाच एका बाकावर बसलो होतो पण मला पुढचं दृश्य पाहवेना.

प्रियकर प्रेयसींच्या व पति–पत्नीच्या जोडया त्या वाळूवर विहार करीत होत्या. आपण गळाठून तर जात नाही ना......आज ऑफिसलाही जाणं झालं नव्हतं...... सुखापासून आपण परावृत्त तर होणार नाही ना. अनूचा स्वभाव मी पूर्णपणे ओळखून होतो. एक शल्य मनाला बोचत होतं. सिगारेटच्या वलयात चित्रीत होणारा एक प्रसंग अस्पष्टपणे नजरेसमोर तरळत होता.

" अनू," मी पावडरच्या मुकटीतून चिठ्ठी काढीत म्हटले, " ही चिठ्ठी यात, कोठून आली ? कोणाचं आहे हे पत्र ?"

त्या वेळी आमच्या लग्नाला नुकतंच एक वर्ष संपत आलं होतं. अनूच्या प्रत्येक मागणीसाठी मी काहीही करण्यास तयार होतो. तिच्या मैत्रिणीच्या बहुतेक चिठ्ठ्या मी वाचीत असे व त्या सर्व उघड्यावरच तारेला लावलेल्या असत; तर मग ही चिठ्ठी येथे का ? मी तो कागद उलगडणार होतो, पण तितक्यातच अनूच्या कोमल हातांची त्यावर झडप पडली. त्यात तो कागद संपूर्णपणे चुरगळला होता. मी क्षणभर तिच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत पुटपुटलो, " मैत्रिणीची आहे वाटतं ती चिठ्ठी ?"


# इंडिया फर्टिलायझर इंडस्ट्रीज

## मुंबई ३

अधिक धान्य पिकवा मोहिमेत
अत्यंत यशस्वी ठरलेली आमची

**बैलगाडी छाप मिश्रखते वापरा !**

सर्व मिश्रखते सरकारमान्य असून
योग्य किमतीत ताबडतोब मिळतात.

**जिल्ह्याचे ठिकाणी व गावोगाव**
**स्टॉकिस्ट व एजंटस् नेमणे आहेत.**

*चौकशी:–*

**मुंबई ऑफिस :** ३३१, सॅम्युअल स्ट्रीट, मुंबई–३
तार : BHARCHEM
फोन : ३२४४०१/४७१६०१

**पुणे ऑफिस :** १०९३, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे २
तार : BHARCHEM
फोन : ५५६२९/५८१३२

" नाही......हो......हो......सरलाची......सरला देशपांडे " ती चाचरत म्हणाली.

" अग, पण तुला एवढं घाबरायला काय झालं ?" मी विचारलं.

" तसं काही विशेष नाही. " ती तो कागद केराच्या टोपलीत फेकीत म्हणाली, " पण मैत्रिणीनं पाठविलेली पत्रं वाचणं ठीक नाही. "

अनू माझ्या अगदी जवळ आली होती. मी तिच्या स्पर्शाने सुखावलो पण साधारण दूर होत म्हटले,

" त्यात गुपित होतं का काही ?"

" तसं नसतं तर दाखविली असती ना ! "

" हो खरंच की, काय ग अनू, काय होतं त्या चिठ्ठीत ?" मी.

" काय असणार !......असतं असंच काहीतरी. " अनू.

" अग, पण सांग तर खरं. " मी जिद्दीला पेटलो होतो. " तुझ्या त्या सरीतानं काय लिहिली होती चिठ्ठी ?"

" सरितानं आपल्या बाळाबद्दल......पण तुम्ही स्नान करणार ना......"

तिच्या वाक्यानं पूर्ववत मी शुद्धीवर आलो. अनू धडधडीत खोटं बोलून मला बनवण्याचा प्र यत्न करीत होती. मी बाथरूममध्ये गेलो पण अनूने टॉवेल आणला नाही म्हणून मला पुन्हा बाहेर यावे लागले. तत्क्षणी मला दुसरा धक्का बसला. अनूने टॉवेल आणण्याऐवजी स्वयंपाकघराचा दरवाजा बंद केला होता. मी फटीतून आत पाहिले. अनूने त्या पत्राला जाळावर धरले होते.

मला मारलेल्या हाकेने मी एकदम सत्यसृष्टीत अवतरलो. समोर प्रत्यक्ष माधव उभा होता. तोच हसरा चेहरा, पण त्यावर पडलेली गंभीरपणाची सावली...... ओठातून लकाकणारं क्षीण हास्य.

" अरे, बस ना ....." मी थोडं बाजूला सरकत म्हटलं, " इकडे कसा काय फिरण्यासाठी आलास ?"

" सहज. " विषण्णतेने माधव म्हणाला. " अशोक, खरंच तू भाग्यवान आहेस."

" ते जाऊ दे रे. " त्याच्यातील उरलीसुरली संकोचवृत्ती काढून टाकण्यासाठी मी म्हणालो, " तुझी मिसेस सध्या कोठे आहे ?"

" मी अजून लग्नच केलं नाही. "

" आश्चर्य आहे. बरं सध्या काय करतोस ? माझा म्हणण्याचा अर्थ नोकरी ?"

" ऑफिसमध्ये क्लार्क आहे पण रजा घेतली आहे. डोकं ठिकाणावर नाही म्हणून. आज वातावरणही कुंद वाटतं आहे."

" पगार किती आहे तुला ?"

" दीडशे रुपये. पण सध्या ठीक आहे, म्हणजे घरी कोणीच नाही. एकटाच आहे."

" स्वत:बद्दल तू कधी विचार केलास का ?"

" कशाबद्दल ?" तो आश्चर्याने उद्गारला.

" स्वत:बद्दल ! लग्नाबद्दल कधी विचार केलास का ? अरे, जीवनात येऊन कधी ना कधी प्रेम केलंच पाहिजे."

" तुझं बरोबर आहे. पण ज्याचं नशीबच दुर्दैवाच्या चक्रात गिरक्या घेत आहे त्याचं काय ?"

" तुला म्हणायचंय तरी काय माधव ?" मी आश्चर्यानं विचारलं. " मी काही मदत करू शकतो का ?"

" तू काय मदत करणार ? सुखात लोळणारांना दु:खात अडकलेल्यांशी कर्तव्यच काय ?"

" असं कोड्यात बोलू नकोस. तुझं कोणावर प्रेम आहे का ?"

" अपूर्ण गोष्टी मी सांगू इच्छीत नाही. पण मला वाटतं, मी तुला अनेक बाबतींत मदत करून स्वत:च्या पायावर दगड पाडून घेतला आहे."

" माधव, " मी जोरात ओरडलो. " शुद्धीवर येऊन बोल."

" शुद्ध हरपलेल्यांना असं बोलण्याचा काहीच अधिकार नाही. तुम्ही दुसऱ्याचं मन पाहण्याचा कधी प्रयत्न केला नाहीत. तुला त्रास होईल म्हणून मी आजवर गप्प आहे. तुझं आमंत्रण स्वीकारून मी येऊ शकत नाही त्याबद्दल मला क्षमा कर." आणि तेथून तो वेगाने निघून गेला.

अशी कोणती बाब होती की ज्यामुळं तो माझ्यावर व अनूवर रागावला होता. अनूवर त्याचं प्रेम होतं का ? नाही...तर मग ते पत्र...अनूचा तिरस्कार... माधवचा माझ्यावरील राग...हे सर्व का ?

शनिवारचं ऑफिस सुटण्यापूर्वीच मी घरी परतण्यास निघालो. डोकं अजून शांत झालं नव्हतं. रमा शाळेत गेली असावी. मी उंबरठ्यावर पाय ठेवला. पण आतून माधवचा अन् अनूचा आवाज ऐकताक्षणी थबकलो. मी हळूच आत प्रवेश केला. माझ्या स्टडी रूममधूनच आवाज बाहेर येत होता.

" माधव, तुम्ही येथून चालते व्हा. ते केव्हा येतील त्याचा नेम नाही. तुम्ही पुन्हा हे घर विटाळू नका. "

" वहिनी, तुम्ही स्वत: माझ्याबद्दल गैरसमज करून घेतलात. "

" माधव, तू 'वहिनी' ह्या पवित्र संबोधनास कलंक लावीत आहेस " अनू एकेरीवर आली होती. " तू मला व माझ्या मैत्रिणीला किती त्रास दिलास ते तीच जाणते. "

" ते सर्व खरं असलं तरी तुमच्याबद्दल माझ्या मनात पवित्र भावना होती. मला जेव्हा समजलं की, अशोकचं तुमच्यावर प्रेम आहे, तेव्हापासून मी तुम्हांला केव्हाच त्रास दिला नाही; पण तुम्हांला ते पटलं नाही. "

" तू मला पत्र पाठवून बदनाम करण्याचा प्रयत्न केलास. "

" नाही...माझा तसा हेतू नव्हता. माझा उद्देश एवढाच होता की माझ्याबद्दलचे तुमच्या मनात असलेले ग्रह, गैरसमज काढून माझं जीवन सुखी कराल. " पण तुम्ही त्याला आडकाठी केलीत. तुमच्या बहिणीवर माझं खरं प्रम होतं पण तुम्ही चूक केलीत. तुम्हांला वाटलं मी अनेकजणांवर प्रेम करणारा. तो बहिणीला कसं सुखी करील व हे पत्र बहिणीस पाठविलं, ज्यामुळं माझं शरीर अतृप्त भावनेनं होरपळ-लेलं आहे. काय मिळवलं तुम्ही हे करून ? तुमच्या बहिणीचं जीवन तरी सुखी बनले असेल का ? माझ्या मनात असतं तर असं करणाराचा संसार मी उधळून टाकला असता. पण मी तसं केलं नाही...कारण अशोक माझा मित्र आहे. हेच सांगण्यासाठी पत्राद्वारे मी तुम्हांला बोलावलं; पण तुम्ही पुन्हा गैरसमज करून घेतलात...मी जातो आहे. "

आणि माधव बाहेर पडला. मी दरवाजाआड झालो होतो. तो गेल्यानंतर लाग-लीच आत गेलो. माधव उभा होता त्या ठिकाणी एक पत्र पडले होते.

" प्रिय मधू, जो इसम तुझ्यावर प्रेम करतो तो एकेकाळी माझ्यावरही प्रेम करीत होता, त्यावरून तू त्याची योग्यता ओळख. एवढंच नाही तर अनेक विद्या-र्थिनींना त्रास दिल्याबद्दल त्याला दंड झाला आहे. मला त्रास दिल्याबद्दल त्याला कॉलेजमधून काढलं ही उत्तम गोष्ट झाली. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव ! एकेका क्लासमध्ये तीन तीन वर्षे नापास होणारा हा विद्यार्थी. याच्या बरोबर तू स्वतःचं जीवन सुखी करू शकशील काय ?


तुझी बहीण
अनू. "

अनूनं चूक केली होती काय ? तिचं हलकं मन ह्याला कारणीभूत होतं का ? माधवचं खरोखरच अनूच्या बहिणीवर प्रेम होतं की तेही नाटक होतं ? माधवचं मधूवर प्रेम होतं तर मग मधू इतक्या लवकर लग्नाला कशी तयार झाली, हे कोडं सोडवीत मी अनूकडे पाहू लागलो. ती खिडकीबाहेर पाहत अश्रू ढाळत होती.

●



प्लेटो कुटुंबांत आणखी एका नव्या पेनची भर प्लेटो २२२
हें नवें प्लेटो २२२ पेन नुसतं हातांत धरून तर पहा— कसं चपलख धरतां येतं, नाही? याची फ्लश कॅप हलकेंच थोडी वरच्या बाजूला सरकवा—किती झटकन् सरकते नाही। लिहायलाही लागलात? उत्तम। लिहिताना आनंद होतो आहे तो तुमच्या मुद्रेवर दिसतोच आहे.
या पेनचं सोनरी टोपण पाहिलंत कीं नाहीं? ते तसंच रहावं म्हणून अनॉडाईझ्ड् करण्यांत आलं आहे. शिवाय चित्ताकर्षक रंग...शाई भरण्याच्या अनेक तऱ्हा। किंमत? अवघी ५/५० रुपये.
plato 222 प्लेटो २२२
म्हात्रे उत्पादन
एकमेव विक्रेते: दि बेस्ट फाउंटन पेन डेपो, ७९ देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.
PLATO




# रामराज्याची स्फूर्तिकेंद्रे

‘रामराज्य’ या शब्दाने सूचित होणाऱ्या कल्पनेला आपल्या परंपरेत विशेष महत्त्व आहे. रामराज्य हा समाजाच्या सर्वांगीण सुस्थितीचा आणि तिच्यासाठी आवश्यक असलेल्या श्रेष्ठ मूल्यांचा प्रतीक शब्द आहे. काही हजार वर्षांपूर्वी वाल्मिकीने रामायणात रामराज्याचा आदर्श चित्रीत केला आणि नवल असे की, आज विसाव्या शतकात भारतीय नेत्यांना अभिप्रेत असलेल्या स्वराज्यासाठी त्याच शब्दाचा वापर झाला.

सतराव्या शतकात समर्थ रामदासांनी रामाचा आणि रामराज्याचा ध्यास घेतला होता. “रामराज्याच्या निर्मितीसाठी त्यांनी श्रीराम, रामभक्त हनुमान आणि रामवरदायिनी भवानी या तीन दैवतांची उपासना महाराष्ट्राला शिकविली. श्रीराम हे रामराज्याचे अधिष्ठान, रामभक्त हनुमान हा त्याचा शिल्पकार आणि रामवरदायिनी भवानी ही त्याची प्रेरक शक्ती होय. त्रिविध दिसूनही एकात्म असणारी ही उपासना समाजमनात

# जे शिव आहे

# ते समर्थही हवे


दृढ व्हावी, म्हणून त्यांनी चाफळ येथे श्रीरामाचे मंदिर उभे केले; कृष्णा-वारणेच्या खोऱ्यात अकरा मारुती स्थापिले आणि प्रतापगडावर भवानीच्या प्रतिष्ठापनेचा सोहळा साजरा केला."

शिवप्रभूंच्या कार्याला सर्वस्वी पोषक ठरणाऱ्या ज्वलंत विचारांची पेरणी समर्थांनी या देवतांच्या उपासनेच्या संदर्भात केली आणि महाराष्ट्रात अभूतपूर्व विचार जागृती घडविली. हे समर्थांचे महत्कार्य श्री. रा. चिं. ढेरे यांनी या छोटयाशा पुस्तकात अत्यंत समर्थ शैलीत विशद करून सांगितले आहे.

या छोटयाशा पुस्तकात एकूण पाच प्रकरणे आहेत. पैकी पहिल्या प्रकरणात समर्थांचा आणि श्रीरामाचा आगळा भावबंध हळुवारपणे चित्रीत केला असून दुसऱ्या प्रकरणात समर्थांच्या सर्व चळवळींचे अधिष्ठान असलेल्या चाफळच्या रामाचे वैभव वाचकांच्या दृष्टीपुढे उभे केले आहे. तिसऱ्या प्रकरणात हनुमानाचे समर्थ-जीवनांतील स्थान स्पष्ट करून चौथ्या प्रकरणात अकरा मारुतींचे दर्शन घडविले आहे. पाचवे प्रकरण प्रतापगडाच्या भवानीविषयींचे आहे.

समर्थांची अनन्य रामभक्ती विवरताना श्री. ढेरे यांच्या वाणीने धारण केलेले रूप अत्यंत मनोहारी बनले आहे. 'राम आकाशी पाताळी। राम नांदे भूमंडळी ।।' असा व्यापक राम-साक्षात्कार समर्थांनी ज्या तपाच्या बळावर प्राप्त केला, त्या तपाचे वर्णन वाचून वाचकांची हृदये हेलावून गेल्यावाचून राहत नाहीत. समर्थांना झालेल्या सगुण साक्षात्काराचे वर्णन करताना श्री. ढेरे लिहितात—

"श्रीरामाचे सगुण साकार रूपडे रामदासांच्या दृष्टीत भरून राहिले. त्या सर्वांगसुंदराचे ध्यान काही केल्या दृष्टीपुढून हलेनासे झाले. त्याच्या दर्शनाने सर्व अंतर्बाह्य जग अनुपम आनंदाने भारावून गेले. रामदासांची वृत्तीही मधुकरी बनून त्याच्या पदकमलाभोवती रुंजी घालू लागली; त्यांच्या दृष्टीचा चकोर श्रीरामाच्या



साखर कारखान्याची यंत्र-सामुग्री, बॉयलर्सची जोडणी, उभारणी व विद्युतीकरणाची कामे स्वीकारतो, उत्तम प्रकारे पार पाडतो.

लोखंडी खिडक्या, दारे, सरकती दारे व 'विश्वास' रोल अप् शटर्स व रोल अप् ग्रीन्स यांचे उत्पादक.

# नायकरोम मेटल वर्क्स

४६ वेलस्ली रोड, संगम पुणे, १.

फोन : २४२८७ तार : नायक्रोम, पुणे

वदनचंद्राच्या चांदण्यात न्हाऊन निघाला; त्यांच्या चित्ताचा चातक श्रीरामाच्या श्यामल तनूच्या मेघाचे दर्शन होताच सुखावला आणि रामकीर्तीच्या सुंदर तरूवर बसून त्यांची वाक्कोकिला मौनांचे कूजन करू लागली."

परंतु हा झाला समर्थांचा वैयक्तिक अनुभव. एवढयाने समाधानी होण्याइतके समर्थ अल्पसंतुष्ट नव्हते. त्यांना रामाबरोबरच रामराज्य हवे होते. आणि श्री. ढेरे यांच्याच शब्दांत सांगायचे तर "रामराज्याची निर्मिती करायची असेल, तर रामचरित्राचे चिंतन समाजात सातत्याने चालू राहायला हवे; त्या चरित्रातील आदर्शाचा ध्यास समाजमनाला लागायला हवा; आणि त्या आदर्शांना अनुसरून वाटचाल करताना हवी ती किंमत देण्याइतक्या निष्ठा प्रबळ व्हायला हव्या; हे समर्थांना पुरतेपणी जाणवले होते. श्रेष्ठ मूल्यांचे संकीर्तन आणि श्रवण करणे सोपे असते; परंतु मूल्यांच्या केवळ उच्चारांनी मूल्ये जगत नसतात. ती मूल्ये आपल्या कृतीत उतरविण्याचा ध्यास घेतलेली निष्ठावंत मते घडल्यावाचून मूल्यांच्या शाब्दिक घोषांना अर्थ नसतो. मूल्ये जगवायची असतील, त्यांना अनुरूप असा समाज घडवायचा असेल, तर त्यांचे संस्कार दृढ बनविणारी यंत्रणा उभारावी लागते. मूल्यांची उपासना सातत्याने करण्याची सवय समाजाला लावावी लागते आणि त्यासाठी सिद्धपुरुषांनी ती समाजापुढे पुनः पुनः आचरून दाखवावी लागतात."

याचसाठी समर्थांनी आपल्या सर्व चळवळीचे अधिष्ठान म्हणून चाफळ येथे श्रीरामाची स्थापना केली आणि देवाच्या चढत्या–वाढत्या वैभवातून स्वराज्याच्या चढत्या–वाढत्या पुरुषार्थाची प्रेरणा दिली.

हनुमंताच्या उपासनेचे रहस्य प्रकट करताना श्री. ढरे यांनी एका महान सिद्धांत प्रकट केला आहे. या संदर्भात त्यांनी लिहिले आहे की, "समर्थ रामदासांना हनुमंताच्या या सामर्थ्याचा विशेष आधार वाटतो; कारण ते सज्जनांचे–दीन-अनाथांचे संरक्षण करणारे सामर्थ्य आहे– दुष्टांचे दमन करणारे सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य जगाला हवे असते. याच सामर्थ्यातून रामराज्य उभे राहू शकते; नाही तर कंस, रावण, जरासंध इत्यादी सामर्थ्यशाली होतेच की! त्यांचे सामर्थ्य इतरांच्या सुखाची होळी करून तिच्यावर आपली पोळी भाजू पाहणारे होते. असले सामर्थ्य सैतानी सत्ता निर्माण करते. ही सैतानी सत्ता उखडून टाकण्यासाठीच समर्थांनी हनुमंताच्या सामर्थ्याचा आदर्श उभा केला. हनुमंत हा जसा 'समर्थ' होता तसाच 'रामदास'ही होता. जे 'सामर्थ्य' रामाचे म्हणजे सत्त्वगुणाचे 'दास्य' पत्करून त्याच्या आदेशाने कार्य करते; तेच सामर्थ्य रामराज्याच्या उभारणीचा सोहळा पाहू शकते. तसेच जे रामदास आपल्या रामदास्याला आपल्या सत्त्वशील सामर्थ्याची जोड देऊ शकतात, तेच विजयी होतात; नाही तर जगातले सैतान त्यांना सहज चिरडून

टाकतात. म्हणूनच केवळ 'समर्थ' अथवा केवळ 'रामदास' बनून चालणार नाही, तर 'समर्थ रामदास' बनायला हवे."

## इतिहास आणि काव्य यांचा संगम

अगदी हाच समर्थ सिद्धान्त श्री. ढेरे यांनी समर्थांच्या भवानीभक्तीच्या निमित्ताने अखेरच्या प्रकरणात तेजोमय शैलीत विवरिला आहे. "जिथे प्रताप उणा पडतो, जिथे प्रताप हा पीडकांचा दास बनून देवाधर्माचा छळ करायला प्रवृत्त होतो. तेथे आदिशक्ती नांदत नाही. तिचे सामर्थ्य मूर्तीत नाही, पूजेच्या षोडशोपचारात नाही, केवळ शाब्दिक चंडीपाठात नाही. तिचे सामर्थ्य आहे तिच्या भक्तांच्या विवेकनिष्ठ विक्रमात! 'प्रतापगिरिचे ठाई। आदिशक्ति विराजते।।'" हेच खरे! अशी प्रभावी आणि आशयघन वाक्ये श्री. ढेरे सहजपणे लिहून जातात आणि अफझलखानाच्या वधाच्या आकाशवाणीलाही एक नवा आशय प्राप्त करून देतात— "भवानीची पाषाणमूर्ती फोडून महाराष्ट्राच्या अस्मितेला डिवचणाऱ्या त्या मस्त महिषासुराचे आव्हान स्वीकारण्यास भवानीचे भक्त आता सिद्ध आहेत, हाच त्या आकाशवाणीचा अर्थ होता. भवानी आता केवळ त्या शिलामूर्तीतच सामावून राहिलेली नव्हती. ती शिवप्रभूंच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हृदयात आपल्या सर्व कलांनिशी जागृत झालेली असून, आपल्या सहस्र भुजांत तळपत्या तलवारी परजून अनेकनिक महिषासुरांचा बळी घ्यायला सज्ज आहे. हेच या आकाशवाणीला सुचवायचे होते."


—हे असे या पुस्तकाचे अंतरंग आहे. यात भावना आणि विचार यांचा प्रीतिसंगम झालेला आहे. इतिहास आणि काव्य यांचे स्वयंवर साजरे झाले आहे. प्रकाशकीय व्यवहाराच्याच पद्धतीने पाहायचे झाले तर चाफळचा राम, अकरा मारुती व प्रतापगडची भवानी यांचे हे यात्रा–गाईड आहे; परंतु पुस्तक वाचू लागताच ते मनाची पकड घेते आणि वाचून संपताच वाचक तेजस्वी विचारांनी, समर्थ भावनांनी आणि काव्यात्म अभिव्यक्तीने भारावून जातो. शिवसमर्थ आणि त्यांचा काळ यांना आपल्या हृदयात अनन्यसाधारण स्थान प्राप्त करून देणाऱ्या प्रेरणांचा अर्थ या पुस्तकाने आपल्याला जाणवून जातो. "शिव-समर्थ— एकाच महान् कार्यासाठी बद्धपरिकर झालेले. जे शिव आहे, ते समर्थ हवे आणि समर्थ आहे, ते शिव हवे— हा दिव्य संदेश देणारे!" हा शिवसमर्थांच्या संगमाचा अर्थही आपल्या मनी मुरतो आणि आपण अगदी सहजपणाने लेखकावर गौरवाचा वर्षाव करू लागतो.

**—राम नगरकर**

●

**[ रामराज्याची स्फूर्तिकेंद्रे : रामचंद्र चिंतामण ढेरे : ललित प्रकाशन, ४१३ ब शनिवार पेठ, पुणे २ : पृष्ठे १०४ : मूल्य ३ रुपये ]**

## प्लवंगनाम संवत्सरे



राजेंद्र गायकवाड

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ शब्दसृष्टीचे मेकॅनिक

कालिदासापासून मोरोपंतांपर्यंत आणि शूद्रकापासून राम गणेश गडकऱ्यांपर्यंत सगळ्या साहित्यकारांनी असा ( गैर ) समज पसरविला आहे की नाट्य, काव्य असले काही लिहायचे म्हणजे प्रतिभासाधन करावे लागते.–असेल, नाट्य लिहायला प्रतिभा लागत असेल—पण ननाट्य लिहायला कुठे लागते ? तेव्हा काव्य करायला लागणारी साधना नवकाव्य लिहायला मुळीच आवश्यक नाही हे ओघानेच आले. खरे म्हणजे नकाव्य किंवा काव्याचा इतर कुठलाही अपटुडेट प्रकार करायला माणसानं कुठलीच खटपट करावी लागत नाही; कारण असल्या काव्याला मुळात माणूसच लागत नाही–कॉंप्यूटर पुरतो. कॉंप्यूटर–काव्याचे काही अभिजात नमुने कुठल्याही नव-कवीच्या थोबाडीत मारतील असे असल्याचे प्रत्यक्ष टीकाकारांनीच कबूल केले आहे. तरीदेखील प्रसंग पडला तर या शब्दसृष्टीच्या मेकॅनिकवर माणूस मात करू शकेल–फक्त त्याला काव्याचे मेकॅनिक्स माहीत हवे.

आता हेच बघा. लंडनमधल्या एका इंग्रजीच्या प्राध्यापकाने काही "सापडलेल्या" कविता छापल्या आहेत, त्या त्याला टेलिफोन डिरेक्टरी, विम्याची पॉलिसी असल्या ठिकाणी सापडल्या; म्हणजे एका कवितेत लंडन डिरेक्टरीमधली वीस नावे ओळीने पत्त्यासकट दिली आहेत, तर दुसऱ्या कवितेत प्रोफेसर मजकुरांच्या विम्याच्या पॉलिसीतली हातपाय मोडला तर किती विमा मिळतो याची कलमे दिली आहेत ! ! ! तरीच.........परवा आमच्या हिने मला वाण्याच्या सामानाची यादी तयार करून दिली. ती एका अभिनव कवीने पाहिली तेव्हा तो मुग्ध होत्साता वदला," अहाहा ! कोणाचे बरे हे विश्वाला गवसणी घालणारे गूढगुंजन ?" मी डोळे चोळून यादी पुन: पुन्हा पाहिली अन् मख्खासारखा चेहरा केला. तेव्हा माझी कींव करीत मला माझ्या कविमित्राने माझ्या हातातल्या कवितेचा अर्थ समजावून सांगितला......" हे बघ, एक किलो मुगाची डाळ, अर्धा डझन सनलाइटच्या वड्या–अहाहा ! अरे, मुगाची डाळ म्हणजे मूग गिळाल्यावर प्रत्ययाला येणारी विश्वात सामावलेली विफल स्तब्धता, आणि सनलाइटच्या वड्यांचा अर्थ तर स्पष्टच आहे–" मज मार्तंडाची ज्योतिर्मयता हवी...... " माझे डोके गरगरायला लागले; पण कवीचे डोळे यादीवरून–चुकलो, कवितेवरून–हलेनात. तंद्री लागल्याप्रमाणे किंवा हात-

भट्टीची चढल्याप्रमाणे तो अर्धवट आपल्याशीच पुटपुटला–" टिनोपॉलची एक डबी व्हिमचा डबा, एक खराटा......पाहिलेस ? अरे मूढा, याचा अर्थ मानव म्हणज विश्वपुरुषाच्या शर्टाच्या कॉलरवरचा मळ आहे, मानवी जीवन हे विश्वपुरुषाच्या फ्लॅटमधल्या मोरीसारखे आहे व ते वैश्विक खराटयानेच निर्मळ होऊ शकेल..." अर्थात् मी आणखी थांबलो असतो तर भर रस्त्यात झीट येऊन पडलो असतो. तेव्हा सौ. ने खास वाण्याला उद्देशून लिहिलेल्या त्या नवकवितेची मित्राच्या हातातून सुटका करून घेऊन कसाबसा पुढे सटकलो.

इंग्लिश नवकाव्याचा हा प्रकार, तर अमेरिकन नवकाव्याचा ' इस्सेमी जादा '. न्यूयॉर्कमधल्या एका छापखान्याने खास नवकवीच्या सोयीसाठी ३३ पत्त्यांचा जोड तयार केला आहे. प्रत्येक पानावर काही शब्द छापले आहेत. पाने पिसायची, मग कुठलीही दोन-चार पाने घेऊन त्यांच्यावर लिहिलेले शब्द जोडायचे–कविता तयार ! आहे की नाही ' इन्स्टंट कविता ?' रमी खेळता खेळता पाने येतील त्याप्रमाणे सिक्वेन्स पण लावा अन् कविता पण करा. उदाहरणार्थ, १. काल लोकसभेत मंत्री म्हणाले......हम सब चोर हैं. २. जेमिनीचे महान् कौटुंबिक चित्र......लूप वापरा. ३. बिहारमध्ये भीषण दुष्काळ......त्याप्रीत्यर्थ अशोक हॉटेलात जंगी खाना...राम मनोहर लोहिया......सुश्राव्य भावगीत गायन.

*आता काळजी कशाला ?*

डोंबिवलीमध्ये राहण्याची जागा, दुकाने व जमिनी, तसेच सोईस्कर फ्लॅटस यांचेसाठी फक्त भेटा

**विद्याधर एजन्सी** (इस्टेट एजंटस)

हरिदीप : महाराष्ट्र बँकेजवळ, डोंबवली (पूर्व)
मुंबईत : द्वारा माधवाश्रम, गिरगाव, मुंबई ४.
दूरध्वनी : ३५८६१३

**सरदार गृह**

क्रॉफर्ड मार्केट शेजारी, मुंबई २

राहण्याची व भोजनाची मनपसंत व्यवस्था

- अद्ययावत पद्धतीचे भोजन गृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी
- टिळक हॉलमध्ये लग्न-मुंजी समारंभ व मेजवान्यांची उत्कृष्ट सोय

फोन नं. ३८३३७

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

ता. २२ ते २८ एप्रिल १९६७

**मेष** :– गतीचा कायदा पाळा आणि कालाचे, बदलत्या परिस्थितीचे आव्हान स्वीकारून जीवन–इतिहासातील नवे पान उघडा. या वेळेच्या ग्रहस्थितीचा हाच तुम्हांला संदेश आहे.

ता. २४ चे खग्रास चंद्रग्रहण तुमच्या राशीसमोरच होणार असल्याने या वेळी तरी निदान तुमच्या प्रयत्नांचे–निर्धाराचे खड्ग बोथट होऊ देऊ नका. थोडीशी जरी गफलत झाली तरी तुमच्यावर हल्ला करायला टपलेले उग्र ग्रह तुम्हाला क्षमा करणार नाहीत.

सांपत्तिक ताण खूपच वाढू लागेल, कौटुंबिक वातारण अप्रसन्न बनू लागेल. विरोध पावला–पावलागणिक जाणवायला लागेल. थोरांचा सल्ला घेऊनच कोणत्याही कार्यक्रमाची आखणी करा.

दि. २६ ते २८ हे दिवस काहीसे अनुकूल.

**वृषभ** :– अमर आशा आणि प्रसन्न चित्त हेच तुमच्या यशस्वी जीवनाचे सूत्र. त्याच्या आधारावरच आजवर आपण अनेक अनिष्ट परिस्थितींशी मुकाबला केलात आणि म्हणूनच आता आपणांस सर्वत्र आशादायक वातावरण दिसायला लागलेले आहे. शुक्रासारखा तेजस्वी ग्रह तुमच्या राशीतून संचारू लागलेला आहे. तो अनेकांचे सहकार्य मिळवून देईल, हाती घेतलेली सारी कामे गतिमान

करील. साहित्य–कला क्षेत्रातील व्यक्तींना तर गेल्या कित्येक दिवसांत लाभला नसेल एवढा लाभ, फार मोठी प्रतिष्ठा तो देऊन जाईल.

वरचेवर प्रवास घडतील, नवे करारमदार होतील, थोरांची कृपा कोणत्याही क्षणी लाभेल. राजकीय वातावरणात प्रतिष्ठेने मिरवता येईल.

दि. २५–२६–२८ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन** :– अनेकांना अनिष्ट वाटणारे या वेळचे चंद्रग्रहण ( दि. २४ ) तुम्हांला मात्र अनुकूल व लाभदायक ठरावे. सूर्य-राहू लाभस्थानी आहेत. ते या वेळी तुम्हांला लाभ–प्रतिष्ठा, यश हवं ते देऊ शकतील. नव्या कल्पना, नवे विचार, आधुनिक मते आणि विज्ञान हे तुमच्या मनात मूळ धरू लागतील. आणि त्याच्या विकसनानेच तुमचा नजीकचा भविष्यकाल उज्ज्वल होईल.

नव्या व्यवसाय क्षेत्रात पदार्पण घडेल, थोर व संपन्न व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

आजवर जिवाभावाने ज्यांची जपणूक केलीत त्या निष्ठेचे, ध्येयवादी वृत्तीचे फल आताच तुम्हांला मिळावे. दि. २५–२७–२८ या कालात आपणांस सर्वत्र आशादायक वातावरण दिसायला लागेल.

**कर्क** :– या वेळचे खग्रास चंद्रग्रहण ( दि. २४ ) तुमच्या चतुर्थात–सुखस्थानी होणार आहे. त्याचा सुख–स्वास्थ्याला, आरोग्याला वेध लागणारच. मुख्यत्वे स्थावरात नव्या मानगडी वाढू लागतील, तुमचे सहकारी तुमचा गट सोडून विरुद्ध बाजूला मिळतील, राजकारणातील तुमचे प्रतिष्ठेचे स्थान डळमळू लागेल. या वेळी पैशापेक्षा प्रतिष्ठेवरच तुम्हांला लक्ष केंद्रित करावे लागेल.

विचार न करता वाटेल तसे वागणे आणि अनवधानाने हातून चुका घडणे या गोष्टी क्षम्य समजल्या जाणार नाहीत. व्यवहार धंद्यातील साहस अंगाशी येण्याचा संभव. फार सावधान. दि. २६ ते २८ काहीसा अनुकूल काल.

**सिंह** :– सिंह ही उसळत्या रक्ताची, चैतन्यसमृद्ध राशी. त्यातून सूर्य तुमच्या भाग्यस्थानी आलेला आहे. अशा वेळी आठव्या शनीची व धनस्थानच्या मंगळाची डर नाही. कोणताही विरोध तुम्ही सहजासहजी मोडून काढू शकाल. या आठवड्यातील चंद्रग्रहणही तुम्हांला बाधक ठरू नये. या आठवड्यात राजकीय आखाड्यात आपण दंड थोपटून उभे राहाल. विरोधक तुमची चाहूल लागताच मागील दाराने पसार होतील.

प्राप्ती, प्रतिष्ठा येथूनच वाढीस लागेल. दूरचे प्रवास घडतील, अनेक दौऱ्यांवर निघावे लागेल. व्यावसायिक क्षेत्रातही चैतन्य निर्माण होऊ लागेल. प्रगतीच्या अनेक वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. दि. २५–२६–२८ या कालाची नोंद करा.

**कन्या** :– पुनश्च मंगळाने तुमच्या राशिप्रदेशावर अन्यायाने आक्रमण केलेले आहे. सूर्यही काही दिवस तुमच्याशी असहकाराने वागणार आहे. अशा वेळी थोडेसे जपून, विचाराने वागल्याशिवाय गत्यंतर नाही. आक्रमक पवित्रा घेणे या

वेळी तरी इष्ट नाही.

आरोग्य बिघडण्याचा संभव आहे. मन बेचैन बनण्याची शक्यता आहे. व्यवसाय धंद्यात अनेक गोंधळ माजू लागलेसे दिसते. गुरू अनुकूल असल्यामुळे ही अनिष्टता फार काळ टिकू शकणार नाही.

मंगल कार्ये पार पाडण्यासाठी जिवाचा आटापिटा करावा लागेल, पैशाअडक्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेकांची विनवणीही करावी लागेल.

दि. २६ ते २८ हा काळ थोडाफार प्रगतीचा ठरेल.

**तूळ** :– वक्री मंगळ आणि तोही व्ययस्थानी, अशा वेळी ग्रहणही तुमच्याच राशीत होणार आहे (दि. २४). तुमची प्रतिभा काळवंडेल, प्रज्ञा बोथट बनेल, कर्तृत्व निष्प्रभ ठरेल. या वेळी काही न करण्यासारखा शहाणपणा नाही.

प्रकृती मन:स्थिती बिघडविणारे अनेक प्रकार पावलोपावली घडू लागतील. इष्टमित्र हातोहात बनवतील. या वेळी लोकांच्या आश्वासनावर यत्किंचितही विसंबून राहू नका.

कौटुंबिक वातावरण दूषित बनू लागेल, सामाजिक क्षेत्रात अप्रतिष्ठा ोण्यासारखे काही घडू लागेल. तुमचे अधिकाराचे स्थान डळमळू लागेल.

दि. २७–२८ या काळी थोड्याफार अनुकूल घटना घडाव्यात.

**वृश्चिक** :– ग्रहणाने दूषित झालेला चंद्र व्ययस्थानी, ही अवस्था तुमच्या वेगवान् प्रगतीला रोखण्याचा प्रयत्न करील. या १५ दिवसांत भाग्यस्थ गुरूचे सामर्थ्य निष्प्रभ ठरेल.

मुख्यत: व्यापारी क्षेत्रांतील व्यक्तींनी या वेळी फारच सावधपणाने सारे व्यवहार करायला हवेत. तुमचा थोडाही अनवधानपणा या वेळी क्षम्य समजला जाणार नाही.

गुप्तशत्रू उठाव घेतील, खोटेनाटे आरोप यायला लागतील, नोकरीत वरिष्ठांची सहानुभूती गमावून बसाल. प्रत्यक्षात फार मोठे अनिष्ट प्रकार काही घडणार नसले तरी या वेळी सावधगिरी बाळगण्याची नितांत गरज असेल.

दि. २६–२७–२८ अनुकूल काल.


**अद्ययावत राहणीसाठी आवश्यक गोष्टी**

★ बसायला खुर्ची ★ जेवायला टेबल

★ झोपण्यासाठी कॉट ★ स्वयंपाकाला कुकर

★ ऐकायला ‘पाय’ रेडिओ ★ गार हवेसाठी पंखा

★ सुरक्षिततेसाठी स्टील कपाट ★ थाटाला सोफा सेट

*रोखीने अगर सुलभ हप्त्याने मिळण्याची सोय*

**कल्याण केंद्र**

बाजीराव रोड, पुणे २. फोन : ५८४९४

**धनू :** या वेळचे ग्रहण तुम्हांला फारसे अनिष्ट नसले तरी मंगळाची स्वारी पुच्छगतीने दशमस्थानी आलेली असल्याने, नको त्या कटकटी व नाही त्या भानगडी पाठीशी लागतील. वरिष्ठांशी पदोपदी खटकू लागेल, इष्टमित्रांशी पटेनासे होईल. नोकरी धंद्यांत बढती नाहीच; पण अवनती होते की काय अशी भीती वाटू लागेल. त्याचप्रमाणे नवीन काही जबाबदाऱ्या वाढू लागल्यामुळे अगदी टेकीस याल. याच वेळी तुमच्या चारित्र्यावर शितोडे उडविण्याचाही काही लोक प्रयत्न करतील. तेव्हा प्रत्येक गोष्ट विचाराने व सावधपणे करायला हवी.

दि. २५–२६ या वेळी काही अनुकूल घटना घडाव्यात.

**मकर :** मंगळ पुनश्च भाग्यात, आणि या वेळचे चंद्रग्रहणही तुमच्या प्रगतीच्या आड येण्यासारखे नाही.

येथूनच तुमच्या ठिकाणची कला सर्वांगांनी लखलखेल. अनेकांच्या कौतुकाच्या नजरांचे तुम्ही लक्ष्य बनाल. तुमच्यातील कलावंत आता जागा होईल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. तुम्हांपैकी काही जणांना परदेशच्या दौऱ्यावर निघण्याचे भाग्य लाभेल. सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील आशाआकांक्षा या कालापासूनच सफल व्हाव्यात. थोडक्यात या कालाबद्दल गौरवोद्गार असे काढता येतील की, ज्या ज्या कार्याला आपण हात घालाल ते ते धवघवीत यश घेऊन उठेल. प्रज्ञा विकसेल, प्रतिष्ठाही उंचावेल. दि. २५ ते २८ सर्वोत्तम काळ.


**कुंभ :** या वेळचे खग्रास चंद्रग्रहण तुमच्या भाग्यस्थानी होणार असल्यामुळे, तुमच्या भाग्याला उत्थान देणाऱ्या अनेक घटना या आठवड्यापासून भराभर घडून यायला लागतील. या वेळी घाईगर्दीचे व धावपळीचे अनेक कार्यक्रम यशस्वी करून दाखवावे लागतील आणि हे तुमचे सारे परिश्रम अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील. मंगल कार्याचा प्रश्न सुटेल, नव्या उद्योगधंद्यांची उभारणी करण्याचे ठरेल. या वेळी नवे स्थावर, नवे वाहनही कदाचित लाभावे.

तुमच्या कर्तृत्वाला आणि प्रज्ञेला योग्य असे वातावरण याच काली मिळेल. आणि त्यातूनच भावी उज्ज्वल काळाचे बीज रुजायला लागेल.

दि. २५ व २८ या कालाची प्रामुख्याने नोंद करा.

**मीन :** ग्रहण अष्टमात आणि मंगळ तुमच्या राशीसमोर, शिवाय साडेसातीची लटकती तलवार तुमच्या माथ्यावर आहेच. हे दिवस मोठे आणीबाणीचे जाणवतील. अडीअडचणी, अनारोग्य कोणत्याही क्षणी जाणवेल.

अशा वेळी कोरडी धडपड करणे शहाणपणाचे ठरत नाही. या वेळची क्षुल्लकशी चूकही क्षम्य समजली जाणार नाही. अनेक उग्रग्रहांच्या कोंडीत आपण सापडला आहात. काय करावे, कसे वागावे हे समजेनासे होईल. फक्त गुरूच एक भरंवशाचा गडी तुमच्या बाजूस आहे. तो ऐन आणीबाणीच्या वेळी मदतीचा हात पुढे करील. दि. २६ ते २८ अनेकांचे सहकार्य लाभेल.



# राजा शिवछत्रपति

**ब. मो. पुरंदरे**

चतुर्थ आवृत्ती, सचित्र

प्रसिद्धिनंतर : मूल्य रुपये
चाळीस किमान

प्रसिद्धिपूर्व : मूल्य रुपये
सत्तावीस फक्त

प्रसिद्धिपूर्व ग्राहक नोंदणीची
अखेरची मुदत ३१ मे १९६७

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २



बर्मन

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

# ल ता

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

२५

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

माझी मते आणि तिची मते यांत दोन टोकांचे अंतर आहे. मी रुंद गळ्यांचे ब्लाऊज घालते तर ती बंद गळ्यांचे. ती सारखीच पांढऱ्या रंगाचा पोषाख करते तर मला गुलाबी रंग प्रिय. माझ्या तिच्या राहणीत, विचारात फरक आहे. एवढेच काय, मी एकदम फटकळ तर ती सगळे मनात ठेवणारी. ती बारीक सडसडीत, तर मी चांगली गरगरीत. ती नाजूक सॅड गाणी गाते तर मी सगळ्या ढंगांची गाणी गात असते. ती म्हणते, मी कलेसाठी जगते तर मी म्हणते, कला माझ्यासाठी आहे. सगळे म्हणतात; या दोघीजणी दोन डोळ्यांसारख्या आहेत. दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी. पण त्यांना हे माहीत नाही की दोन डोळ्यांना प्रकाशाची जाणीव देणाऱ्या नसा एकच आहेत आणि जर का एका डोळ्यांत काही गेले तर दुसऱ्यात पाणी येते.

आशा





□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□ आनंदी शिखरे







मी चालत होतो. एकटाच होतो. सांज उलटली होती. आकाश काळ्या ढगांनी झाकाळलेलं होतं. माझी पावलं पडत होती. समोर वेरूळचा कोरीव कातळ झाडांमागून दिसत होता. लपत होता. दिसत होता. रात्र उमलत होती.

मी कैलास लेण्यापाशी पोहोचलो. पुराणवास्तू खात्याचा तिथला अधिकारी माझा मित्र होता. मला अशाच रात्री कैलास लेणं बघायचं होतं. कुणाशीही न बोलता. कुणालाही सांगाती न घेता. एकट्याने ! एक आपलं वेड !

दीड–दोन तासांनी माझ्या त्या मित्राने मला कैलासाच्या आवारात सोडलं.

मी कैलासाच्या आतल्या प्रांगणात प्रवेश केला. नीरव शांतता होती. प्रांगणाच्या मध्यभागी उभ्या असलेल्या शिवालयाच्या शिखराची काळी कोरीव आकृती काळ्या निळ्या आकाशावर रेखीव दिसत होती. जयस्तंभ आणि

## ब. मो. पुरंदरे

# स्वरशिल्प

गजराजही असेच दिसत होते. शिल्पकारांनी जणू काळामोर अंधारच कोरला होता. किंचितही आवाज त्या शांततेला सोसवत नव्हता. मी काडी ओढली हातातली मशाल पेटवली. लालसर पिवळसर उजेडात ते मोवतीचे भव्य स्तंभ, मखरं आणि मूर्ती जरा जरा उजळू लागल्या. डाव्या बाजूच्या मखरात तीन मूर्ती उभ्या होत्या. गंगा, यमुना आणि सरस्वती. आपल्याएवढ्या भव्य मूर्ती. त्या कोरीव काव्यात छायाप्रकाश भरला जात होता. तिघांच्याही मुद्रांवरचं हास्य प्रकाशात खुलत होतं.

मशाल घेऊन मी संथपणे चालली होतो. एका ठिकाणी शंकरपार्वती सारीपाट खेळत होते. पार्वती पराजित झाली होती. अन् म्हणूनच ती रुसून उठून चालली होती. केवढा फुगवा तो ! तिचा हात धरून तो विश्वनाथ तिची समजूत घालत होता.

दुसऱ्या ठिकाणी लक्ष्मीचं गजांत वैभव ओसंडत होतं. दोन गजराज आपल्या सोंडांत कलश भरून लक्ष्मीला स्नान घालीत होते. खाली कमलदळे फुलली होती. लाटा हलत होत्या. हे सारं खडकात ! तिसऱ्या जागी संतप्त भवानी आपल्या आठही हातांत शस्त्रे घेऊन महिषासुरावर तुटून पडली होती. कुठं नृत्यांगना विजेसारख्या लवत होत्या. कुठं वाद्य वाजविण्यात वादक तल्लीन झाले होते. कुठं रावण थैमान घालीत होता. कुठं मातृवात्सल्य ओसंडत होतं. कुठं शृंगार बहराला आला होता. सारे पाषाण जिवंत झाले होते. मी मशाल घेऊन ती कलेची श्रीमंती डोळ्यांनी लुटीत होतो. माझ्या कानांना जाणवत होते; अज्ञात शिल्पकारांच्या छन्नीचे आवाज.

कलावंतांची केवढी ही किमया ! पाषाणांना त्यांनी हसायला लावलं, खेळायला लावलं, नाचायला लावलं, रुसायला लावलं, रौद्र तांडव करायला लावलं, अन्

हळुवार शृंगार करायलाही लावलं. खडकावर जललहरी उमटविल्या. लतावेली झुलविल्या. माझं मन मंतरलं गेलं होतं. ह्या कलेची कशाशी तुलना करावी, हेच समजत नव्हतं. हे 'त्या' सारखं आहे का ? की 'ह्या'सारखं आहे ? उपमा आणि साम्य शोधण्यासाठी मन साऱ्या स्मृती शोधीत होतं. पण मनच उत्तरं देत होतं 'न इति' 'न इति' ! मग हे शिल्पकाव्य आहे तरी कोणासारखं ? कोडं सुटत नव्हतं.

खडकांत कोरलेली ती स्वर्गसभा मी पाहत होतो. बाहेर आभाळ गहिवरून आलं होतं. मेघ मृदंग घुमवू लागले होते. विजा लकाकत होत्या. विजेच्या झोतात एखादी अप्सरा समेवर येताना दिसून जाई. ते हावभाव आणि लावण्य इतकं रेखीव व सजीव होतं की, क्षणभर मला वाटलं की, यातील एखादी अप्सरा रंगशीलेवरून खाली उतरून माझ्याजवळ येणार अन् माझा हात हातांत घेऊन मला म्हणणार,

"किती वेळ असं उभं राहायचं ते ! बसायचं ना ?"

इतकं सचेतन, इतकं भावविवश, इतकं रसप्रत्ययकारी अन् इतकं तल्लख शिल्प होतं ते.

तेवढ्यात पलीकडचा कैलासेश्वराचा गाभारा घुमला. धारदार सुरांची लकेर उठली. वाद्यांची साथ निनादली आणि झुंबराच्या लोलकांसारखे शब्द उमटले,

"तुझ्या प्रीतीचे दुःख मला दावू नको रे !"

"वा !"—माझ्या तोंडून एकदम उद्‌गार उमटला. त्या गीतस्वरांनी सारा कैलास घुमला. माझं मन रोमांचलं. असं वाटलं ह्या दगडी अप्सरांच्या अंगावरही फुलला असावा. मी तर मशाल घेऊन सौधाकडे एकदम धावलो. मला काही तरी नवीनच उमगलं होतं. अनेकदा पाहिलेला कैलास मी आज पाहत होतो. अनेकदा ऐकलेलं लताचं ते गाणं मी आज ऐकत होतो. नवीन काहीच नव्हतं; पण आज नवीनच मला काही तरी गवसलं होतं. समोरच्या गाभाऱ्यातून स्वरामृताचे थेंब ठिबकत होते.

"बघुनी जाई, प्राण घेई, येऊ नको रे !
तुझ्या प्रीतीचे......'

मी पुन्हा माघारी आतल्या शिल्पाकडे धावत गेलो. एक शिल्प समोरच उभं होते. एक प्रेयसी प्रियकराला विनवीत होती. पलीकडे एक अभिसारिका एकटीच आतुर नजरेनं कुणाची तरी वाट बघत होती. मशालीचा धुंद प्रकाश त्या प्रेयसींच्या मुखावर पडला होता. केवढा आर्जवी भाव होता त्यांच्या डोळ्यांत ! आर्त सुरात ती प्रेयसी आपल्या प्रियकराला विनवीत होती,

—'दुःख मला दावू नको रे !'

हे शिल्प नव्हे, लताचा आवाजच समोर साकार झाला आहे, असं मला वाटलं. सूर हेलावत होते. लताचे सूर कैलास लेण्यांत निनादत होते. नव्हे नव्हे, एक नवाच

स्वरकैलास पुन्हा खोदला जात होता. हृदय भेदीत जाणारी तान मधूनच उठत होती. एक गाणं संपलं दुसरं सुरू झालं तेही तिचंच. जोगीया रागातली विरहिणी. तिच्या सुरांचा पाठलाग सतारीचे बोल करीत होते. आभाळात वीज लकाकत होती. शिल्पातल्या प्रेयसीचे प्राण व्याकुळ झाले होते. पाषाण कासावीस झाले होते. लताचे सूर फिरत होते. अंतःकरण घुसळून निघत होतं. शेजारच्या शिल्पात, रावण आपल्या वीस हातांनी कैलास गदगदा हालवीत आहे असं दृश्य होतं. अन् 'ते तुला अशक्य आहे !' असा भाव शिवशंकराच्या मुद्रेवर तरळत होता.

—पण लताच्या सुरांनी मात्र कैलास गदगदा हेलावत आहे, असा भास मला झाला. विरहिणीच्या साऱ्या कळा लताच्या स्वरावाटे स्फुंदत होत्या. मला वाटलं शिल्पातल्या त्या प्रेयसीचे डोळे ओलावले असतील. ते पुसावे. मी खिशातून रुमाल काढला. माझेच डोळे मी टिपले.

जोगीया संपला. लताचं गाणं आज मला समजलं. कैलास लेण्यातलं मुग्ध काव्य आज मला समजलं.

बाहेर ढगांचा गडगडाट वाढला होता. माझा तो पुराणवास्तुवाला मित्र मला हाका मारीत होता.

"अहो श्रीमंत, चला आता ! 'आपली आवड' संपली ! साडे दहा वाजून गेले."

ट्रॅन्झिस्टरचं हृदय फिरवीत त्याची काळी आकृती प्रांगणांत हत्तीजवळ उभी होती.

मी खाली आलो अन् एकदम पाऊस कोसळू लागला. आडोशाला न होता मी तसाच उभा राहिलो. चिंब भिजलो. कैलास आणि मी दोघेही ! मघाशी लताच्या सुरात भिजलो होतो; आता पाण्यात.

जवळच असलेल्या सरकारी क्वार्टर्समध्ये आम्ही आलो. माझं मन निथळत होतं. ते खरं म्हणजे जाग्यावरच नव्हतं. ते रेंगाळत होतं स्वरांत आणि शिल्पांत. लताच्या आवाजासाठी मला आजपर्यंत उपमा सापडत नव्हती आणि कैलासालाही तुलना गवसत नव्हती. मला उपमेय सापडलं. अनुपमेय सापडलं. माझ्या डोळ्यांपुढून ती लाजरी लक्ष्मी, ती संतप्त भवानी, ती प्रसन्न गंगा, ते बेभान वादळ, ती खटचाळ वानरं, ते मस्त हस्ती, ते चवताळलेले वाघ— सारा कैलासच सरकत होता. केवढं रसतादात्म्य ! केवढा लवचिकपणा ! केवढी सुडौल प्रमाणबद्धता ! लताच्या आवाजाइतकीच. कैलास म्हणजे शिल्पलता. लता म्हणजे स्वरकैलास ! स्वरशिल्प !

लताविषयी आणि तिच्या चौघाही भावंडांविषयी माझ्या मनात अपार कुतूहल आहे. ते अजूनही कमी होत नाही. लता, मीना, आशा, उषा आणि हृदयनाथ ही पाचही जणं सख्खी भावंडं. ह्या सर्वांचे गळे इतके गोड कसे ! ही पाचही भावंडं जन्मजात कलावंत आहेत. एकाच घरांतली एका पाठोपाठची सख्खी भावंडं इतक्या उत्तुंग श्रेणीची कलावंत व्हावीत हे मास्टर दीनानाथांचं असामान्य विधिलिखितच

नव्हे का ? मा. दीनानाथांनी आयुष्यभर रंगदेवतेची तन्मयतेने आराधना केली. सरस्वती त्यांच्यावर शेवटपर्यंत प्रसन्न होती. लक्ष्मी मात्र शेवटी शेवटी त्यांच्यावर रुष्ट झाली. पण त्यांची सेवा पाहून सरस्वतीनेच जणू आपल्या स्वतःच्या अंगावरचे पाच अलंकार दीनानाथांच्या पदरात टाकले. लता म्हणजे सरस्वतीच्या गळ्यातला स्वरसाज. जे सूर गळ्यातून काढण्यासाठी नामवंतांना वर्षानुवर्षे रियाज करावा लागतो, ते सूर लताच्या गळ्यातून सहज उमलतात. लताचं गाणं केवळ कानाला सुखवीत नाही, तर ते हृदयाचा ठाव घेतं. मग ते भावगीत असो वा रागदारी असो. गीत रामायणातल्या 'मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे ?' या तिच्या गीताने गहिवरला नाही, असा श्रोता विरळाच. हे यश केवळ त्या गोड गळ्याचं नाही. त्या गळ्याखालच्या मनाचं आहे. तिच्या सुराइतकेच तिचे उच्चार शुद्ध आहेत. त्या उच्चारांइतक्याच तिच्या भावना शुद्ध आहेत. मराठी, हिंदी, तेलगू, तामीळ, उर्दू, भोजपुरी, गुजराती, बंगाली इत्यादी भारतीय भाषांतही लता गाते. नाना फडणीसांकडे एकदा म्हणे एक बहुभाषी गृहस्थ आला होता. प्रत्येक भाषा तो उत्तम बोलत असे. अगदी मातृभाषेइतकी. त्याची खरी मातृभाषा कुणालाही ओळखता आली नाही. खरोखर लतादिदींच्या ध्वनिमुद्रिका ऐकूनही श्रोत्यांना हाच प्रश्न पडेल.

सारी भावंडं आणि संबंधित लोक लताबाईंना 'दिदी' म्हणतात. दिदींच्या कुटुंबात दिदींविषयीच्या भावना मास्टर दीनानाथांइतक्याच प्रेमादराच्या व धाकाच्या आहेत.

दिदीचं यश असामान्य आहे. बालगंधर्वांनाही हे अलौकिक यश पाहून दिदींचं कौतुक वाटत असेल. कुठलीही हवेची लहर मुठीत पकडली तरी त्यात दिदींचेच सूर सापडतील ! आज लतादिदींच्या घरी लक्ष्मी ओंजळ ओतीत उभी आहे. पण वडिलांच्या अखेरच्या दिवसांत व स्वतःच्या लहानपणी दिदींना सोसावे लागलेले हाल ऐकले की, मन शहारतं. पुण्या-मुंबईच्या मानवगर्दीत त्यांनी दिवस काढले वनवासासारखे. दिदी तेव्हा होत्या फक्त तेरा वर्षांच्या. तेरा वर्षांची मुलगी संसार पेलीत होती. आयुष्याच्या उषःकाली दिदींना फारच खडतर रियाज करावा लागला. हृदयनाथच्या अंगावर घालायला कपडेही धड नसायचे. 'प्रफुल्ल' फिल्म कंपनीतून दिदींनी हृदयनाथसाठी दोन कपडे मागून आणले होते व ते कपडे किती तरी दिवस ते पोर घालीत होतं. ते कपडे होते कंपनीच्या ड्रेपरीतले !

पण तेही दिवस गेले. धुकं विरलं. गजांत लक्ष्मी दारी आली. कीर्ती आली. मान आला. अहंकाराला मात्र दिदीच्या घराचे आणि मनाचे दरवाजे सतत बंदच राहिले. साधेपणा कधीच गेला नाही. दिदींच्या अंगावर मी कंठे, तोडे, शालू, पैठण्या वा जडजवाहीर कधीच पाहिलं नाही. साधेपणालाच 'लता मंगेशकर' नावाचा अमोल अलंकार लाभला.

दिदींच्या घराची सजावट साधी आहे. भडकपणा त्यात दिसणार नाही. कंजूष-

पणाही दिसणार नाही. तिथं जुनाटपणा आढळणार नाही. पाश्चात्य चालीरीती तिथं दिसणार नाहीत. आधुनिकता पचवून महाराष्ट्रीय संस्कृती तिथं रुबाबात नांदताना आढळेल. दिदींचं देवघर फार सुरेख आहे. साधं आहे. स्वच्छ आहे. शांत आहे. सुगंधी आहे. 'श्री राजा शिवछत्रपती' हे नाव दिदींच्या देव्हाऱ्यात आणि हृदयात नित्य पूजलं जातं. तेही एकांतात. गाजावाजा न करता. छत्रपती शिवाजी महाराज हे दिदींचं, साऱ्या मंगेशकर भावंडांचं, दैवत आहे. अन् हे त्यांचं शिवप्रेम संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनचं नाही! लहानपणापासूनचं आहे. हृदयनाथ लहान असतानाच दिदींनी त्यांना एक सुरेखसं पुस्तक भेट म्हणून दिलं होतं. त्या पुस्तकात आतल्या पानावर दिदींनी लिहिलं होतं,

'चिरंजीव बाळ यास आशीर्वादपूर्वक भेट.

—शिवदासी'

दिदींनी स्वत:ला घेतलेलं हे आवडीचं टोपण नाव.

काही लोक गंमतीने पण कौतुकाने 'Daughter of Shivaji' असं दिदींना म्हणताना मी ऐकलं आहे. एकदा दिदी मला म्हणाल्या,

"तुम्हाला आवडेल अशी एक वस्तू मी तुम्हाला भेट म्हणून देणार आहे."

मी कुतूहलाने पाहत राहिलो. दिदी देवघरात गेल्या. त्यांनी एक वस्तू देवांतून काढून आणली आणि माझ्या हातावर ठेवली. छत्रपती शिवाजी महाराजांचं ते शिवराई नाणं होतं. पूजेत शिवराई नाणी आहेत. या नाण्यांना दिदींनी चांदीचं पाणी दिलं आहे. नाण्यांवर दोन्ही बाजूंस मिळून अक्षरं आहेत, 'श्री राजा शिवछत्रपती' अशी.

आपल्याला नवल वाटेल, पण लतादिदींना शिवकालीन गडकोट पाहण्याची फार फार आवड आहे. अनेक किल्ले त्यांनी पाहिले आहेत आणि अजूनही बरेच किल्ले पाहण्याचा त्यांचा आमचा तह झालेला आहे. त्यात राजगडासारखा बुलंद बाका गड घेण्याचाही मनसुबा आहे!

दिदींना फोटोग्राफी चांगली येते. रायगडाची त्यांनी घेतलेली छायाचित्रे सुरेख आली आहेत. त्यातल्या त्यात राजवाड्यालगतच्या मनोऱ्याचं दर्शन फारच सुंदर आलं आहे. दोन वर्षांपूर्वी त्या रायगडावर आल्या होत्या. कॅमेरा फार उत्तम होता. सारा गड हिंडत हिंडत खाशा स्वाऱ्या टकमक टोकावर आल्या. खाली दीड हजार फूट खोल दरी होती. —अन् निसटला! सुटला! गेला गेला गेला! कॅमेरा गेला! खोल दरीत कुठं तरी कॅमेरा जाऊन पडला! आता त्या इतक्या भयंकर खोल दरीत कोसळलेला तो नाजूक कॅमेरा काय शिल्लक राहणार! तिथं जाणंसुद्धा कठीण. पण पुढं काही दिवसांनी एका गड्याने तो शोधून काढलाच. पार खलास झाला होता. पण तो त्याने दिदींना मुंबईला नेऊन दिला. दिदींना आणि हृदयनाथना त्याचंच कौतुक वाटलं.

दिदींच्या घरी दरवर्षी गणेशोत्सव फार हौसेने साजरा करतात. सर्वांत हौस हृदयनाथना जास्त. स्वत: सारी सजावट करतात. अन् मग त्या छोट्याशा दिवाणखान्यात काही ना काही कार्यक्रमही करतात. गेल्या वर्षी माझं शिवचरित्रावर भाषण झालं गणपतीपुढं. भाषणाच्या आधी दिदी मला किती तरी वेळ कुठं दिसल्याच नाहीत. पण भाषण सुरू होण्याच्या थोड्याच आधी त्या येऊन बसल्या. भाषण दोन तासांनी संपलं. त्या लगेच जाऊन झोपल्या. नंतर मला समजलं की दुपारपासूनच त्यांच्या अंगात खूप ताप आहे ! मी दिदींना म्हटलं,

" तापात कशाला बसलात भाषणाला ? त्रास झाला असेल. मधून उठून गेला असतात तरी चाललं असतं. "

" भाषण शिवचरित्रावरचं होतं, बाबासाहेब. "

त्यांनी एवढंच म्हटलं. शिवाजीमहाराजांसंबंधीच्या त्यांच्या भावना अशा आहेत. भालजी पेंढारकरांच्या ' छत्रपती शिवाजी ' ह्या चित्रपटाची फिल्म त्यांच्या घरी त्यांनी मुद्दाम ठेवली आहे. अधून मधून लावतात. तो बघतात. दोन वर्षांपूर्वी मी आणि गो. नी. दांडेकर पन्हाळगड ते विशाळगड हा रानवाटेने पायी प्रवास करून आलो. घो घो पावसातून हा प्रवास आम्ही पायी केला. नंतर मुंबईला दिदींकडे गेलो. मुंबईलाही पाऊस तुफान पडत होता. पावनखिंडीचं वर्णन आम्ही करीत होतो. हृदयनाथला लगेच दिदी म्हणाल्या,

" बाळ, आपण ' छत्रपती शिवाजी ' पाहू या ! "

दिदींच्या आवडी निवडी अशा आहेत.

मुंबईला आमच्या शिवराय मंडळाने एक सुरेख प्रदर्शन भरवलं होतं. किल्लेकोटांची सुंदर सुंदर मोठी छायाचित्रं, जुनी शस्त्रं, किल्ल्यांची मॉडेलस् व शिवचरित्रातील काही देखावे आम्ही मांडले होते. दिदी मुद्दाम ते बघायला आल्या होत्या...त्यांनी प्रदर्शन पाहिलं अन् एकच प्रश्न मला विचारला,

" शिवचरित्र आणि शिवकालावरचं हे प्रदर्शन. अन् यात समर्थ रामदास-

## आवडता आवाज !

एकदा लता मंगेशकरांच्या घरी गप्पागोष्टी रंगात आल्या होत्या. श्री. बाबासाहेब पुरंदरे त्यात होते. कुणी तरी त्यांना विचारलं,

" बाबासाहेब, तुम्हाला कुणाचा आवाज आवडतो ?"

" कपबशांचा !" बाबासाहेबांनी मिस्किलपणाने उत्तर दिलं. तावडतोब चहा आला !

स्वामींचं काहीच कसं नाही ?"

नव्हतं खरं काहीच. सज्जनगडाची छायाचित्रं आम्ही घेतलेली नव्हती. समर्थांचं चित्र ठेवावं, तेही ध्यानात आलं नाही. दिदी लगेच म्हणाल्या,

" समर्थांच्या अस्तित्वाशिवाय शिवकार्याची पूर्तता नाही. नाही का बाबासाहेब ?"

आम्ही ताबडतोब समर्थांची एक रंगीत प्रतिमा प्रदर्शनात मानाच्या जागी आणून ठेवली.

दिदींच्या घरात संगीताचं साम्राज्य आहे. तिथं सूर आणि ताल यांचीच सतत संगत आहे. डौलदार तंबोरे आहेत. इतरही वाद्यं आहेत. पण त्यांच्याच सोबतीला पलीकडे धारदार तलवारही लटकलेली तुम्हांला दिसेल. तंबोरा आणि तलवार ! केवढी ही दोन टोकं ! पण दिदींच्या आवडी निवडी तंबोऱ्याच्या तारेवर आणि तलवारीच्या धारेवर उभ्या असतात. पोर्तुगीजांच्या अंमलाखाली असलेली नगर-हवेली सशस्त्र हल्ला करून काबीज करण्याचा डाव आझाद गोमंतक दलाच्या तरुणांनी मांडला तेव्हा त्या तलवारीच्या राजकारणाला पहिली साथ दिली दिदींनी. आपल्या गायनाचा कार्यक्रम सशस्त्र स्वातंत्र्ययुद्धासाठी दिला. त्यांचं तंबोऱ्याशी आणि तलवारीशी असं नातं आहे.

गोव्याच्या स्वातंत्र्यसंग्रामात पोर्तुगीजांनी पकडून ठेवलेले मोहन रानडे लिस्बनच्या कॅशस तुरुंगात सव्वीस वर्षांची शिक्षा भोगत पडले आहेत. त्यांच्या विमोचनासाठी धडपड करण्यासाठी एक समिती स्थापन झाली आहे. दिदी त्या समितीत आहेत. आपल्याला नवल वाटेल, पण मोहन रानड्यांच्या निधीसाठी लतादिदी स्वतः हातात पावती पुस्तकं घेऊन निधी गोळा करीत आहेत. स्वतःचा वाटा तर आधी त्यांनी दिलाच आहे.

लतादिदी म्हणजे भारताचा अलंकार आहे. कोटयवधी भारतीय व भारताबाहेरील गानलुब्ध रसिक त्यांचे सूर रोज वेड्यासारखे वेचीत असतात. सारा आसमंत लताच्या सुरांनी धुंद झालेला असतो. अगदी पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत. पण नवल असं वाटतं की लताचा आवाज अजून आमच्या सरकारच्या कानांवर कसा जात नाही ? वास्तविक यंदाच सरकारने दिदींचा—नव्हे— स्वतःचाच गौरव करून घेण्याची संधी साधायला हवी होती. ●





# लता

लता मंगेशकर ही एक व्यक्ती नाही. तो एक आवाज आहे. आज पंचवीस वर्षं अखंडपणे तो आवाज सारं भरतखंड व्यापून राहिला आहे. उंच, उंच जाऊन आकाशाला भिडतो आहे आणि अनंत माणसांच्या हृदयावर मोहिनी घालतो आहे !



काश्मीरपासून केरळपर्यंत प्रवास केला तर पर्वतश्रेणींची जागा समुद्राचे सहस्रवाहू घेतात. चिनार वृक्षांऐवजी नाजूक पोफळी डोळ्यांसमोर डुलू लागतात. विरळ तलम ऊन दाट, लखलखीत होतं— समुद्राच्या पृष्ठभागावर भिंगासारखं फुटतं. गुलाबी गौरवर्णाच्या जागी तजेलदार कृष्णवर्ण या दाट उन्हात तळपू लागतो. भाषेतल्या मुलायम आर्जवांची जागा उच्चारांची ठसठशीत द्राविड वळणं घेतात. पराठ्यांच्याऐवजी पानांत भाताच्या राशी ढकलल्या जातात. काश्मिरातला गुळमट कांदा दक्षिणेत भलताच तिखट होतो, सफरचंदाच्या स्वादाऐवजी काजूचा

## प्रा. गंगाधर गाडगीळ

# भावसंगीतातला अमृतानुभव

अगर फणसाचा घमघमाट मस्तकात भिनतो. घरांची बांधणी, भांड्याकुंड्यांचे आकार, सारंच बदलतं; पण काश्मिरात असो अगर केरळात असो, लाऊडस्पीकरवरून अगर रेडिओतून जागोजागी स्वर ऐकू येतो तो लताचा. हा देश एक आहे याची सुरेल आठवण तो करून देत असतो.

या विविधतेनं नटलेल्या अवाढव्य देशाला या आवाजानं मोहिनी घातली आहे. पंचवीस वर्षं सतत लताची गीतं ऐकूनदेखील या देशाची तृप्ती झालेली नाही! अजून त्या स्वरांच्या बरसातीत ओलंचिंब व्हावं, म्हणून तो आतुर आहे. त्या संगीताच्या समाधीत तल्लीन आहे. लताच्या संगीताचं साम्राज्य आसेतु हिमाचल अबाधित आहे.

पुन्हा पुन्हा निरनिराळ्या शब्दांत सांगावा असाच हा अद्‌भुत चमत्कार आहे. आणि हा चमत्कार घडवून आणणारा तो आवाज हा त्याहूनही मोठा चमत्कार आहे. माणसांचा आवाज त्यांच्या श्वासांतून स्फुरतो, कंठातून उमटतो, जिव्हेनं संस्कारित होतो. हाडामांसाच्या शरीराशी तो जखडलेला असतो. आणि म्हणूनच त्याच्यावर काही बंधनं पडतात. काही गोष्टी त्यांच्या आवाक्यापलीकडच्या असतात. पण लताच्या आवाजाला असली काही बंधनं आहेत, असं मुळी जाणवतच नाही. तो विमुक्त आहे.

माणसाच्या छातीत कोंडलेल्या श्वासातून जो उमटतो तो आवाज किती उंची गाठेल याला काही स्वाभाविक मर्यादा असतात. म्हणून लताचा आवाज चढायला लागला की आपल्याला वाटतं, हा आता इथं थांबेल. आकाशातल्या ह्या अरेखित रेषेपलीकडे तो जाणार नाही; पण प्रत्यक्षात मात्र पुन्हा पुन्हा त्या रेषेचा भेद करून तो आवाज एखाद्या रुपेरी पक्ष्यासारखा भिरभिरत भरारत उंच उंच जातो—

स्वर्गलोकाला स्पर्श करतो. असं सुचवतो, की आपलं वास्तव्य खरं तिथलंच !

हाडामांसांच्या माणसाचा आवाज हाडामांसांनी घडवलेला असतो. आणि या गोष्टीच्या खुणा त्या आवाजात अपरिहार्यपणे उमटतात. कधी त्या आवाजाला खर असते तर कधी कर्कश धार असते, कधी तो पसरट असतो तर कधी निरुंद असतो. कधी भरदार असतो तर कधी पातळ असतो. आणि सगळ्याच आवाजावर शरीराचं म्हणून काही एक मालिन्य चढलेलं असतं. पण लताचा आवाज मात्र आकाशातून सोडलेल्या रुपेरी धारेसारखा आहे. हाडामांसाच्या शरीराचा त्याला स्पर्श झालेला नाही. मालिन्याची छायादेखील त्याच्यावर पडलेली नाही. तो नितळ, निर्मळ, विशुद्ध आहे.

आणि असा तो अशरीरी आहे म्हणूनच की काय, पंचवीस वर्षांचा काळ उलटला तरी तो जवळ जवळ आहे तसाच आहे. वयपरत्वे तो थकला नाही, कंटाळला नाही. भावनेशी सहजगत्या एकरूप होण्याची त्याची शक्ती हरपली नाही. अजून तो सर्रकन् गगनाला जाऊन भिडतो, भिंगरीसारखा गिरक्या घेतो, उंचावरून खोल डोहात स्वत:ला मुलायमपणे झोकून देतो, अवघड जागी तोल सावरून स्थिर होतो आणि भावनांची नाजूक वळणं, कंपनं व आंदोलनं साकार करतो. परीकथेतल्या दुर्लभ पुष्पासारखा तो कायमचा ताजा टवटवीत आहे.

आवाज गोड, लवचिक असला तरी भावनेशी एकरूप होण्याचं सामर्थ्य त्याच्यात असतंच असं नाही. ‘ उपवनी गात कोकिळा ’ हे पद एखादी गायिका अत्यंत मधुर आवाजात म्हणेल, परंतु उपवनात कोकिळा गाऊ लागली म्हणजे जी एक प्रसन्नतेने मोहरलेली, आतुरतेने डवरलेली मन:स्थिती होते (किंवा संकेतानुसार व्हायला हवी) त्या मन:स्थितीचा प्रत्यय तिला देता येईलच असं नाही. एक तर असं की आपल्या शास्त्रीय संगीताची ती प्रकृती नाही. आणि दुसरं असं की भावना प्रकट करण्याचं सामर्थ्य ही एक वेगळीच गोष्ट आहे. इतर गायकांचे आवाज भावना व्यक्त करीत असताना, भावनेपासून काहीसे अलग असतात, भावना जितकी नाजूक तितके ते हळुवार होत नाहीत. भावना जितकी गाढ तितके ते भारावत नाहीत. जी भावस्थिती व्यक्त करायची तिचे नाजुक तरंग आणि पडसाद त्यांना स्वररूप करता येत नाहीत.

परंतु लताच्या आवाजात मात्र भावना सहजपणे, अकृतिमपणे साकार करायची असामान्य किमया आहे. तो भावना व्यक्त करीत नाही. भावनेचे स्वरूप त्याला समजून आणि उमजून घ्यावे लागत नाहीत. तो मुळी भावनारूपच आहे. गुलकंदातल्या गुलाबाच्या पाकळ्यांशी जशी त्यांतली साखर एकरूप झालेली असते, तसा लताचा आवाज भावनेशी एकरूप झालेला असतो. भावनेचा झराच त्या आवाजाच्या रूपानं वाहत असतो.

चित्रपटसंगीताला सुसंस्कृत माणसं नावं ठेवतात ते योग्यच असतं. चित्रपट

संगीत जर तासभर ऐकायचा प्रसंग आला तर ते मला असह्य होतं आणि दुसऱ्या कोणाही रसिकाला ते तसंच असह्य होईल. पण त्याचबरोबर हेही खरं की संगीतानं आपल्या भावना व्यक्त कराव्या अशी माणसांची पुरातन काळापासूनची अपेक्षा आहे. ही अपेक्षा आपलं शास्त्रीय संगीत पुरी करू शकत नाही आणि आजच्या जीवनाच्या संदर्भात लोकसंगीतदेखील ती पुरी करू शकत नाही. आणि यामुळं एक फार मोठी पोकळी राहते. सामान्य माणसांच्या बाबतीत ही पोकळी चित्रपट संगीत फार परिणामकारकपणे भरून काढते. त्यांचं भावजीवन हे संगीत परिपूर्ण आणि समृद्ध करतं. आणि आजच्या सामान्य माणसाचं सुदैव असं की चित्रपट-संगीताच्या कृत्रिमतेत अकृत्रिम भावनेचा झरा लता त्यांच्यासाठी आणून सोडते.

चित्रपट पाहताना गाणं सुरू झालं आणि लताचा आवाज कानांवर पडला की अंगावर सर्रकन् काटा उभा राहिल्यासारखं होतं. त्या कृत्रिम, बेगडी विश्वात सच्चा भावनेचा झरा एकदम वाहू लागतो. पडद्यावरचा प्रसंग तकलादू असतो, नायिकेचं दुःख नकली असतं आणि तिचा अभिनय हास्यास्पद असतो. खरं म्हणजे दुःख व्यक्त करण्याकरिता ती पापण्या फडफडवू लागली की फाडदिशी तिच्या श्रीमुखात एक ठेवून द्यावी, असा मोह होतो. पुन्हा संगीत दिग्दर्शक अनेकदा पार्श्व संगीताचा जो बँडबाजा वाजवत असतो त्याचा संगीताशी फारसा संबंध नसतो आणि दुःखाशीही पण. या सगळ्या कृत्रिमतेत लता सूर लावते तो मात्र सच्चा असतो. चाल विसंगत असली तरी तिची आळापी त्या दुःखाशी सुसंगत असते.

भावना अकृत्रिमपणे व्यक्त करण्याची एक असामान्य नैसर्गिक देणगी तर लताला मिळालेली आहेच; परंतु शिवाय तसं करण्यासाठी ती जाणीवपूर्वक खूप प्रयत्न करते. अनेक साधनांचा कुशलपणे उपयोग करते. त्यातलं पहिलं साधन म्हणजे स्पष्ट शब्दोच्चार. लता कोणत्याही भाषेत गाणं म्हणत असो, त्या गाण्यातला प्रत्येक शब्द कसा अगदी स्वच्छ कानांवर येतो. इतकंच नव्हे तर गाण्यातल्या शब्दपंक्तींचा उच्चार ती अर्थ समजून करते आणि तो अर्थ श्रोत्यांपर्यंत पूर्णपणाने पोहोचवते. हे करता यावं म्हणून तिनं निरनिराळ्या भाषांचा आणि त्यांच्या उच्चारपद्धतींचा अभ्यास केलेला आहे आणि हे सारं करीत असताना ती शब्दांच आणि त्यात ग्रथित झालेल्या भावनांचं संगीतात रूपांतर करीत असते तिनं शब्द उच्चारला की त्याचं पाणीदार, टपोऱ्या मोत्यात रूपांतर होतं. मग तो शब्द कितीही ओबडधोबड असेना का आणि तीच गोष्ट गीतातल्या ओळींची होते. लताच्या कंठातून निघाली की गीताची ओळ सुरेल होते, तिला स्वतःची अशी एक लय प्राप्त होते ! अर्थात मनालाही हरवणारे गीतलेखक आणि संगीत–दिग्दर्शक नसतात असं नाही; पण सहसा ती हार खात नाही. कारण लय आणि सुरेलपणा ह्या गोष्टी मुळी तिच्या रक्तातच आहेत. मात्र लयीसाठी लय आणि सुरेलपणासाठी सुरेलपणा यांना

मात्र तिच्या संगीतात स्थान नाही. ती स्वर उंच चढवते, शब्द तोडते, एखाद्या अक्षरावर मुक्काम करते, स्वरांना आंदोलन देते, अगर गीतपंक्तीला एखादा वळण-दार आलाप जोडते तेव्हा ते सारं भावनेच्या सिद्धीसाठी असतं. एकच उदाहरण द्यायचं तर 'आ जा रे आ जा' या गीतपंक्तीचं देता येईल. या पंक्तीतला पहिला शब्द उच्चारताना ती स्वरांना जी उंची लावते मग स्वरांना जी आंदोलनं देते, 'जा' या शब्दाला जो स्वरांचा नाजूक आर्त पिसारा जोडते त्या सर्वांमुळे मन कसं भावा-कुल होऊन जातं.

लताचं एक वैशिष्टच असं की अनेक अवघड करामती करण्याचं तिच्या आवा-जात सामर्थ्य असलं तरी करामतीकरता करामती ती कधीच करत नाही. सहज-पणानं हृदयाला जाऊन भिडायचं असाच तिचा प्रयत्न असतो. या बाबतीत सैगल तिचा आदर्श आहे.

लोकप्रियतेचं गणित मोठं अवघड आणि विचित्र असतं. लोकांना जे भावसंगीत हवं असतं ते नुसतं भावपूर्ण आणि गोड असून भागत नाही. मोहिनी पाडील असं ते असावं लागतं आणि लताच्या आवाजात नेमका हाच गुण आहे. तो गोड, अगदी कानांना मिठी बसण्याइतका गोड तर आहेच पण त्यात माणसांवर मोहिनी घाला-यची असामान्य किमया आहे. बालगंधर्वांच्या आवाजात ही दैवी शक्ती होती. सैगलच्या आवाजात होती आणि लताच्या आवाजातही ती आहे. तो एका अतीव आर्ततेने, मन वेडावून टाकणाऱ्या भावाकुलतेने भारावलेला आहे. त्याचा स्पर्श झाला की प्रत्येक सूर कसा एका धवल चैतन्यानं झळाळून उठतो. त्यांच्या भोवती एका गूढ आकर्षकतेचं वलय निर्माण होतं. हृदयात अशा एका ठिकाणी जाऊन तो भिडतो की जेथे ध्वनिकलेचा विचार अप्रस्तुत असतो.

लताचा आवाज ऐकताना नेहमी असा भास होत असतो की आपण प्रत्यक्ष आवाज ऐकत नसून त्यांचा पडसाद आपल्या कानांत घुमत आहे. तो दुरून कोठून तरी एका अज्ञात पोकळीतून आल्यासारखा वाटतो. पडसादासारखा तो घुमत राहतो; हा त्या आवाजाचाच गुणधर्म आहे की, मायक्रोफोनच्या कुशल उपयोगामुळं त्यांना हा गुणधर्म प्राप्त झाला आहे ते मला माहीत नाही. एवढं मात्र निश्चित की, लता माइकचा उपयोग अत्यंत कुशलतेने करते. आणि त्याहूनही हे अधिक निश्चित की तिचा आवाज असा पडसादासारखा असल्यामुळं त्यांची मनावर एक विलक्षण मोहिनी पडते.

प्रत्येक समाजाच्या भावजीवनाची काही एक घडण असते. त्या समाजांच्या भावनांची काही परंपरासिद्ध रूपं असतात, मिश्रणं असतात, वळणं असतात. आणि या सर्वांशी काही नाद निगडित असतात. भावनांची ही रूपं, वळणं आणि त्यांच्याशी निगडित असलेले हे नाद त्या समाजाच्या स्मृतिमंजूषेत साठवलेले असतात. आपल्या भारतीय समाजांचीदेखील अशी एक स्मृतिमंजूषा आहे. या मंजूषेत वृंदावनातल्या

बासरीचा नाद अजून ताजेपणानं घुमतो आहे. आणि तसाच दळताना म्हटलेल्या ओवीचा आर्तपणे ओढलेला अंतिम स्वर आहे. लोकगीतांचा साधासिधा ठेका त्या मंजुषेत आहे आणि तशीच त्यातील स्वरांची तीच तीच साधी भाबडी आवर्तनं व ललकाऱ्या आहेत. शुद्ध, रेखीव, गंभीर संस्कृत मंत्रोच्चार त्या मंजुषेत जतन करून ठेवलेले आहेत. ' गीत गोविंदा 'तला गोडवा आहे आणि बोलीभाषातल्या हेलांची गोड, रांगडी, ठसकेबाज वळणेदेखील. भजनांची भाविक सुरावट, दोहयांतला गोडवा, लावणी—गझलातला कडक ठसका, शेतातून दूरवर घातलेली साद, बैलांच्या गळयातल्या घुंगरांची खुळखुळ, गारुडयाच्या पुंगीचा अस्वस्थ करणारा नाद, बांगडयांचा किणकिणाट, कोकिळेचं कूजन, भालूचं रडणं, कोंबडयाचं आरणं, असे अनंत नाद आणि त्या नादांशी निगडित असलेली भावनांची मोहळं या स्मृतिमंजुषेत आपण जमा केली आहेत.

भारतीयांच्या हृदयाला ज्या माणसाला स्पर्श करावयाचा असेल, त्याचं भावविश्व ज्याला फुलवायचं असेल, त्याच्याजवळ या स्मृतिमंजुषेची किल्ली हवी. लताजवळ ही रुपेरी किल्ली आहे. तिच्या आवाजात वृंदावनातल्या बासरीचा, कोकिळेच्या कूजनाचा, लोकगीतातील उंच ललकारीचा आणि इतर अनेक गोष्टींचा अंश आहे. तिच्या स्वरात मुरलेल्या लयीत आणि आलापांच्या वळणात भारतीय संस्कृतीच्या संचिताचे मूळाकार आहेत. आणि म्हणून ती गाऊ लागली की भारतीय मन प्रफुल्लीत होतं. अनेकरंगी फुलपाखरं त्याच्याभोवती लवलवत, कोलमडत तरंगू लागतात. काय होतंय हे त्या मनांना नीटसं कळत नाही. पण ती वेडावून मात्र जातात.

भारतीय समाजाची जशी एक स्मृतिमंजुषा आहे, तशीच भारतीय आत्म्यांची एक अनिवार ओढ आहे. शतकानुशतकांची ती ओढ आहे. या पार्थिव शरीरातून व्हायची, अनंताला स्पर्श करायची, त्यांत विलीन व्हायची ही ओढ वेरूळच्या बुद्धमूर्तीत, महाभारतातल्या अखेरच्या पर्वात, श्रीकृष्णाच्या मृत्यूत, शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानात, मिरेच्या काव्यात आणि भैरवींच्या स्वरांत साकार झालेली आहे. या विसाव्या शतकातदेखील भारतीय आत्मा याच आर्त ओढीनं प्रस्फुरित होतो, व्याकूळ होतो. ही ओढ व्यक्त झाली की मंत्रमुग्ध होतो.

लताची थोरवी ही की भारतीय आत्म्यांची ही ओढ तिचा आवाज साकार करतो. त्या आवाजाला शरीराचा, पार्थिवतेचा जणू स्पर्शच झालेला नाही. एक असीम वेदना, एक असीम आर्तता यांचा तो जणू उद्गार आहे. अनंतात विलीन होण्यासाठी तो सारखा उंच उंच जात असतो. आकाशाच्या निळेपणात हरवतो. आणि म्हणूनच आज पंचवीस वर्षे भारतीय मन त्या आवाजाच्या मागून धावत आहे.

लता या व्यक्तीशी माझा फारसा परिचय नाही. पण हे सगळं जाणतेपणानं करण्याइतकं तिचं व्यक्तिमत्त्व संपन्न नाही हे उघड आहे. तिचा आवाज हे जे

करतो ते नेणतेपणाने. निसर्गाचा तो एक चमत्कार आहे.

लताची मला नेहमी तुलना करावीशी वाटते ती सैगलशी. तिचं गाणं ऐकलं म्हणजे मला त्याची आठवण होते. सैगलच्या आवाजातदेखील भावना अकृत्रिमतेनं, सहजतेनं, व्यक्त करायची किमया होती. त्या आवाजातदेखील भावनांना भुरळ घालणारा गोडवा होता, असीम आर्तता होती. भारतीय आत्म्याची सनातन वेदना होती आणि म्हणूनच त्यानं साऱ्या भारतीयांना वेडं केलं होतं.

पण सैगलचा आवाज शरीरातून मुक्त झालेला नव्हता. शरीराचं, पार्थिवतेचं मालिन्य त्याला मधासारखं चिकटलेलं होतं. तो आकाशात हरवायला पाहत होता, पण त्याचे पंख त्याला तितकं उंच नेऊ शकत नव्हते. तो अनंताचा वेध घ्यायला बघत होता; पण त्याचं हृदय माणसांच्या जगात गुंतलेलं होतं ते जग त्याला सोडवत नव्हतं. लताला आहे तितकी त्याला संगीताची जाण नव्हती, आवाजाची देणगी नव्हती; पण लताच्या आवाजाच्या अलीकडचं जे सगळं आहे ते तो सांगू शकत होता, सूचित करू शकत होता. लताचा आवाज विशुद्ध भावना व्यक्त करतो पण सैगलचा आवाज माणसांची भावना व्यक्त करीत असे आणि म्हणून या अपुरेपणामुळे, माणुसकीमुळे, मलित्यामुळे, त्याला अशी काही एक शक्ती प्राप्त झाली होती की ती लताच्या आवाजात नाही. सैगलाच्या अपुरेपणातच माणूस म्हणून त्याचं पूर्णत्व होतं.

शिवाय सैगल हा सैगल होता. त्याचं स्वतःचं असं एक व्यक्तिमत्व होतं व त्याला नट म्हणतात, पण तो चित्रपटात अभिनय करीत नसे. सैगल म्हणून वावरत असे. तानसेनाचा त्यानं वेष चढवला तरी तो सैगलच राहत असे. आणि तो गात असे तोदेखील सैगल म्हणूनच ! आणि म्हणूनच त्याचं गाणं कुठल्याही चित्रपटात खपून जाण्यासारखं नव्हतं. न्यू थिएटर्सच्या त्या अभिजात चित्रपटांशी त्याचं अतूट नातं होतं. उलट लताचं गाणं कुठंही चपखल बसतं, कुठंही साजून दिसतं आणि तरी आपली अभिजात प्रकृती ते सोडत नाही.

गंमत अशी की लताचं अभिजात संगीत भारतीय चित्रपटसृष्टीत फुललं, बहरलं आहे. चित्रपटसृष्टीनं लताला घडवलं, मोठं केलं, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात नेऊन तिला बसवलं आणि उलट लतानं चित्रपटाच्या करोडो प्रेक्षकांची अभिरुची घडवली, चित्रपट–संगीताच्या स्वरूपावर स्वतःचे असे संस्कार केले. लता चित्रपटसृष्टीची आहे आणि चित्रपटसृष्टी लताची आहे.

लता आणि चित्रपटसृष्टी यांचं हे नातं हे एकपरीनं जसं अपरिहार्य आहे तसंच दुसऱ्या परीनं ते एक गूढ आहे, चमत्कार आहे. लताच्या आवाजाचं मोहिनी घालणारं माधुर्य आणि भावपूर्णता यांमुळे तिनं चित्रपटांच्याद्वारे अफाट लोकप्रियता मिळवावी हे अपरिहार्यच आहे. तिच्या आवाजाची जादू प्रकट व्हायला चित्रपटसृष्टीच्या स्वप्नभूमीसारखी दुसरी जागा नाही; पण त्या बरोबर हेही खरं की

चित्रपटसृष्टीला जे हवं असतं आणि लता आपल्या संगीताच्या द्वारे जे देते त्यांची जात अगदी वेगळी आहे. चित्रपटाचा प्रधान हेतू बहुसंख्य लोकांची करमणूक करणे हा असतो. यात काही गैर असं मी म्हणत नाही. पण करमणूक ही करमणूक असावी लागते. आणि लोक जर अशिक्षित वा मागासलेले असले तर ती हिणकस असावी लागते. करमणूक करण्याचं काम सत्यापेक्षा सत्याचा आभास पुष्कळदा अधिक चांगल्या प्रकारे करतो. सच्च्या नाट्यापेक्षा नाटकीपणा या क्षेत्रात अधिक परिणामकारक ठरतो. उत्कटतेपेक्षा भडकपणाचं मोल तिथं अधिक असतं आणि जिवंतपणाच्या तजेल्यापेक्षा बेगडी लकाकीच तेथे चटकन खपते. या करमणुकीच्या विश्वात उबवलेल्या कामुकतेला फार मागणी असते. शरीराच्या भुका चाळवल्या आणि खाजवल्या म्हणजे करमणूक करून घ्यायला आलेला मनुष्य संतुष्ट होतो.


आणि लताचे संगीत तर यांपैकी काहीच करत नाही. कामुकतेचं त्याला वावडं आहे. नखरा आणि ठसका यांच्याकडे त्याचा कल नाही. आपल्या अंगावर बेगड चढवायला ते तयार नसतं आणि शरीराच्या भुका चाळवायला ते निग्रहीपणानं नकार देतं, खरं म्हणजे शरिराला ते पुसूनच टाकतं. अकृत्रिमता हा त्यांचा स्वभावधर्म आहे आणि ज्या एका असीम आर्ततेनं ते भारावलेलं आहे, जे श्रेय ते शोधत आहे ते करमणुकीच्या कोष्टकात कधीही बसणं शक्य नाही. व्यवहारी जीवनाच्या चौकटीतदेखील ते बसत नाही.

असं जर आहे तर चित्रपटसृष्टीत लतानं एवढी अफाट लोकप्रियता मिळविली कशी ? आणि जिथं माणसाचं आयुष्य जास्तीत जास्त दहा वर्षं असतं तिथं ती अखंडितपणे पंचवीस वर्षं टिकली कशी ? या गोष्टीचं एक कारण तर उघड आहे. लोकांना करमणूक हवी असली तरी इतर काही त्यांना नको असतं अशातला भाग नाही. त्यांना कामुकता उबवायला हवी असते आणि अनंताची आर्त ओढही त्यांना जाणवू शकते. दोन्ही गोष्टींवर पैसे खर्च करायला ते तयार असतात.

पण लताच्या लोकप्रियतेचं आणखीही एक कारण असू शकेल आणि ते असं की बेगडी आणि सच्ची, कामुकता आणि प्रीती, नाट्य आणि नाटकीपणा, उत्कटता आणि भडकपणा यांतला भेदच पुसून टाकायची—अप्रस्तुत करायची असामान्य किमया तिच्याजवळ असेल. एखादा कलावंत असं कसं करू शकतो ! त्याच्या प्रांजळपणातच एक संदिग्धता बेमालूमपणे मिसळलेली असते. आणि मग प्रश्न पडतो—

पण लताच्या आवाजात अशी एक मोहिनी आहे की तिच्या प्रभावानं आपले सारेच प्रश्न मूक होतात.

●





बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. 'सजनी' चित्रपटाचं रेकॉर्डिंग चालू होतं, बॉम्बे लॅबोरेटरीत. 'किस्मत का नही दोष बावरे...' हे गाणं मी म्हणणार होतो. त्या दिवशी लताचा फोन आला. "तुम्ही गा. मी ऑर्केस्ट्रॉ कण्डक्ट करायला येईन ... " असं तिनं सांगितलं. करदार स्टुडिओत तिचं त्या दिवशी रेकॉर्डिंग होतं. तिथून ती आमच्याकडे येणार होती. रात्री ८ वाजता रेकॉर्डिंग होतं. लताला यायला उशीर झाला. आम्ही तिची वाट पाहत होतो. रेकॉर्डिंगची सारी तयारी झाली होती, इतक्यात 'सजनी'चे दिग्दर्शक बाबूराव पेंटर यांच्या मनात एक कल्पना आली. 'किस्मत का नही दोष बावरे...' हे गाणं चित्रपटात एका भिकाऱ्याच्या तोंडी होतं. बहुतेक भिकाऱ्यांबरोबर एक लहान मूल अथवा मुलगी असते आणि भिकारी म्हणत असलेल्या गाण्यात ती आपलाही सूर मिळवून देत असते. तेव्हा या गाण्यात फक्त एक

सुधीर फडके

# स्मृतींच्या झरोक्यातून

ओळ लहान मुलीच्या तोंडी असावी अशी कल्पना बाबूराव पेंटरना सुचली व ते म्हणाले, "बाबूजी, लताबाईंना एक ओळ म्हणायला सांगाल काय ?" मी म्हणालो, "काय वेडबिड लागले की काय तुम्हांला ? अहो, ती केवढी मोठी, सर्वश्रेष्ठ कलावत्. तिला काय कोरससारखी एक ओळ म्हणायला सांगू ? तुमची कल्पना पटतदेखील नाही. रात्रीचे ९-३०. झाले होते. आता एक ओळ म्हणायला मुलगी आणायची कोठून ? प्रसंग मोठा बाका होता. बाबूराव पुन्हा आले. "बाबूजी करायचं काय ?" त्यांचं पालुपद चालूच होतं. शेवटी मी बिचकत बिचकतच लताला विचारलं, आणि तिने पट्कन संमती दिली. गाणं सुरू झालं. लताने एक ओळ म्हटली, वेळ निभावून गेली आणि जाताजाता लताचा मोठेपणा सांगून गेली. 'सोलो सिंगर' म्हणून अफाट लोकप्रियता मिळत असताना ती प्रथमच अशी कोरसमध्ये गातात तशी गायिली. त्या वेळी ती म्हणालीदेखील, "तुम्ही मला आज कोरस आर्टिस्ट बनवलंत."

संगीत क्षेत्रात उमेदवारी करणाऱ्या अनेक मुली माझ्याकडे येतात, गाणी म्हणून दाखवितात. या मुलींत लताची नक्कल करणाऱ्याच अधिक. 'माझी मुलगी अगदी लतासारखीच गाते हो !' असे सांगताना अनेक पित्यांना मोठा अभिमान वाटतो. अशी नक्कल करणाऱ्या मुलींना मी सबूरीचा सल्ला देतो. तुम्ही लताची नक्कल करू नका, संगीतक्षेत्रात तुमचे स्वतःचे वेगळेपण प्रस्थापित करावयाचे असेल तर नक्कल करून कसे चालेल ? त्यासाठी तुमच्या गायनातही वेगळेपण हवे, असे मी त्यांना सांगतो. एकदा लताकडे गेलो असता मी तिला हे सारे सांगितले. मला वाटते ते तिला आवडले नसावे. अर्थात् हे मला जाणवले. बऱ्याच दिवसांनी असाच एकदा तिच्या घरी त्यानंतर गेलो होतो. लता चित्रपटांना

स्वतः संगीत देते. त्या दिवशी तिने आपण दिलेल्या संगीताची एक रेकॉर्ड मला ऐकवली. ती म्हणाली, "संगीत देताना एक गोष्ट मी कटाक्षाने पाळली आणि ती म्हणजे सुधीर फडक्यांची नक्कल काही केल्या करावयाची नाही, असे मी ठरविले होते." आपण मात्र नक्कल करण्याविषयी बोललो होतो त्याचाच संदर्भ तिच्या मनात असावा, असे मी तिच्या त्या वेळच्या आविर्भावावरून ताडले. मी लगेच म्हणालो, "नक्कल न करण्याचा तुझा निश्चय फार चांगला आहे; हे असेच व्हायला हवे."

अनुकरण करण्याविषयीचा माझा शेरा तिला आवडो अथवा नावडो, संगीतकार म्हणून लतामध्ये निश्चितच वेगळेपण आहे. इतर पाच-पन्नास गाण्यांतून तिने संगीत दिलेले एखादे गाणे वेगळे पडते, आगळे वाटते.

'सांग तू माझा होशील का ?' व 'त्या तिथे पलीकडे ...' ही आशाबाईंनी म्हटलेली गाणी विलक्षण लोकप्रिय झाली. खरं म्हणजे ही गाणी म्हणणार होती लता. परंतु तिच्या सुरांचा स्पर्श या गाण्याला होण्याचा योग नव्हता. गाण्याच्या रेकॉर्डिंगची सारी तयारी झाली होती; परंतु प्रत्यक्ष रेकॉर्डिंगपूर्वी तिला फिट् आली. २-४ दिवसांनी रेकॉर्डिंग करावयाचे ठरले. पुन्हा तीच तयारी झाली. परंतु त्या दिवशीही रेकॉर्डिंगच्या आधी लताला फिट् आली आणि रेकॉर्डिंग झाले नाही. अखेरीस आशाबाईंकडून ही गाणी म्हणवून घेतली गेली.





रो श न

# सुरांचा सूत्रकर्ता

संगीतकाराने एखादी चाल म्हणून दाखविली की गायक, ती तशीच म्हणून दाखवितो. काही गायकांना चाल उचलण्यास वेळ लागतो तर काही ती पट्कन आत्मसात करतात; परंतु गाण्याचा आत्मा फक्त त्यांच्या चालीत नसतो. चालीच्या पलीकडे त्यात आणखी एक गोष्ट असते आणि ती म्हणजे संगीतकाराची कल्पकता. ही कल्पकता ज्ञात्याची असते. गाणं भारून टाकतं, धुंद करून टाकतं, डोळयांत अश्रू उभं करतं ते या कल्पकतेमुळं. संगीतकाराची ही ज्ञात्याची दृष्टी गायकालाही समजली तर ते गाणं वेगळं भारून टाकणारं होतं. तयार होतं. लताबाईंत हा गुण आहे. चालीच्या पलीकडची ही कल्पकता त्यांना दिसते. ती त्या आपल्या गाण्यात उतरवतात आणि म्हणून त्यांची गाणी 'हिट' ठरतात.

गाणं लताबाईंच्या नुसत्या कंठातून बाहेर पडत नाही. ते त्यांच्या नसानसांतून वाहत असतं. त्या गायला लागल्या की, मूर्तिमंत गाणंच पुढं उभं राहिल्यासारखं वाटतं. माइकपाशी गाण्यासाठी त्या उभ्या राहिल्या की, हे गाणं त्यांना चढतं. ते 'हिट' होणार की, नाही हे त्यांना तेव्हाच कळून चुकतं. 'रहते थे कभी' (ममता), 'जो वादा किया पाँव छू लेने...' 'दिल जो न कह सके ..' या माझ्या लोकप्रिय झालेल्या गाण्यांबद्दल त्यांनी रेकॉर्डिंगच्या वेळेसच मला सांगितलं होतं, "रोशनजी, ये आपका गाना चल गया–" 'बहु बेगम' या आगामी चित्रपटातील मी संगीत दिलेल्या "दुनिया करे सवाल, तो हम क्या जवाब दें..." या गाण्याबद्दल त्यांनी असंच भाकित केलं आहे.


शब्द कसे उच्चारावेत, कोठे जास्त भर दिल्याने बहार येईल, याची कमालीची समज लताबाईंना आहे. मेलोडियस गाण्यांना त्यांचा आवाज जास्त योग्य असला तरी त्यांच्या आवाजात एक वेगळेच नाटय आहे. सगळे सूर एकजात काबूत; त्यामुळे सुरांची त्या अशी काही मजेदार खुलावट करतात की, देहभान हरपावे.

मी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला १९४९ साली. माझं पहिलं चित्र ' बावरे नयन ' होय. कामाच्या गडबडीमुळे लताबाईंना या चित्रपटासाठी गाता आलं नाही. जेव्हा त्यांनी हा चित्रपट पाहिला, तेव्हा त्या तडक माझ्याकडे आल्या. " तुम्ही इतक्या वेगळ्या दर्जाचे संगीतकार असाल अशी मला कल्पनाही नव्हती. तुमच्याकडे गायला मला येता आलं नाही, याबद्दल दु:ख वाटतं, " असं त्या म्हणाल्या.

माझा दुसरा चित्रपट ' मल्हार. ' यात गायचं त्यांनी मान्य केलं. मुकेश या चित्रपटाचा निर्माता आणि तारा हरिश दिग्दर्शक होते. महालक्ष्मी येथील एका स्टुडिओत रेकॉर्डिंग होणार होते. लताबाईंच्या गाण्याला संगीत देण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग ! ' नर्व्हसपणा ' हा माझा स्थायीभावच आहे; परंतु त्या दिवशी मी आणखीनच उदास झालो होतो. आता आपलं कसं होणार, लताबाईंपुढे आपला निभाव लागणार कसा, याची चिंता मला होती. लताबाई आल्या. गाणं होतं— ' मोहब्बत की किस्मत बनानेवाले... कहा हो तुम जरा आवाज दो...' छातीत धडधडत होतं. मी कशीबशी चाल सांगितली. लताबाईंनी गाणं म्हटलं. त्यांनी माझी प्रशंसा केली आणि माझा जीव मांड्यात पडला. त्या दिवशी रेकॉर्डिंग करताना वेगळ्याच ' थ्रिल 'चा अनुभव आला. त्या दिवसापासून लताबाई मला सतत प्रोत्साहन देत आहेत. माझा नर्व्हसपणा त्यांना ठाऊक असल्याने मला दिलेली रेकॉर्डिंगची वेळ त्या कधीही चुकवीत नाहीत. मी उगाच अधिक नर्व्हस होऊ नये, असा विचार त्या करीत असाव्यात. बरेच दिवस त्यांची भेट झाली नाही तर एक दिवस सकाळी फोन घणघणतो. लताबाईंचा आवाज येतो–' रोशनजी, कैसे हो आप ? तबियत तो ठीक है ?...'

' मल्हार 'ला संगीत देत असतानाच ' हमलोग 'चे संगीत दिग्दर्शनही मीच

सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण



नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक

हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८.


करीत होतो. रणजित स्टुडिओत हा चित्रपट तयार होत होता. शेठ चंदूलाल यांच्या या स्टुडिओत, काही समजा—गैरसमजांमुळे लताबाई गायला जात नव्हत्या; परंतु मी त्यांना विनंती करताच ' हमलोग 'साठी गाणी म्हणायचं त्यांनी मान्य केलं. या चित्रपटासाठी ३–४ गाणी त्यांनी म्हटली, परंतु त्याचं त्यांना मानधन अद्याप देण्यात आलं नाही, असं मला कळलं. माझ्याखातर लताबाई या चित्रपटात गायल्या आणि त्यांना पैसे मिळाले नाहीत, याची जबाबदारी माझी होती आणि म्हणून त्या चित्रपटाला संगीत न देण्याचा निर्णय मी निर्मात्याला कळविला. ते काम सोडून दिलं. ३–४ दिवसांनी लताबाई घरी आल्या व म्हणाल्या, " रोशनजी, तुम्ही काय केलंत् हें ? मला पैसे मिळाले नाहीत म्हणून तुम्ही काम का सोडून दिलंत ? आताशी कुठं तुमच्या संगीतक्षेत्रातील कामगिरीस आरंभ झाली आहे. तेव्हा असं करू नका; ते काम पुरं करून टाका बघू– "

आपल्याला एखादी गोष्ट आवडली नाही तर ती त्या लगेच सांगून टाकतात. ' नवबहार ' या चित्रपटात ' देखोजी मेरा जिया चुराये लिए जा ' या गाण्याच्या वेळचं ऑर्केस्ट्रेशन त्यांना मुळीच पसंत पडलं नाही. त्यांनी तसं बोलूनही दाखविलं; परंतु प्रत्यक्ष रेकॉर्ड झालेलं गाणं जेव्हा त्यांनी ऐकलं तेव्हा त्यांचं मत बदललं. " इतकं चांगलं रेकॉर्डिंग झालं असेल अशी मला कल्पनाही नव्हती. हे या वर्षीचं सर्वोत्कृष्ट गाणं ठरणार, " असं त्या म्हणाल्या,

लताबाई चित्रपटांना संगीत देतात. मी ते ऐकलंय्. त्यांनी हिंदी चित्रपटांनाही संगीत द्यावं अशी माझी इच्छा आहे. सध्याच्या हिंदी संगीतात काहीतरी वेगळं ऐकायला मिळेल. ●

## कृष्ण मंदिर

हिन्दी चित्रपट व्यवसायामध्ये सतत वावरूनही मराठी चित्रपट व्यवसायातील अडीअडचणीकडे लताबाईंची बारीक नजर असते. पुण्यातील मराठी चित्रनिर्मिती थांबली व मुंबईच्या स्टुडिओंची भाडी मराठीला परवडत नाहीत हे लक्षात आल्यावर भालजींच्या नेतृत्वाखालील कोल्हापूरचा ' जयप्रभा ' स्टुडिओ त्यांनी मराठी व्यावसायिकांना उपलब्ध करून दिला. या स्टुडिओतील वातावरण पवित्र राखण्यासाठी त्या सतत प्रयत्न करीत असतात. याच दृष्टिकोनातून ' जयप्रभा 'च्या आवारामध्ये छोटे कृष्ण मंदिर बांधण्याचा त्यांचा मानस आहे.



आठवू गेले तर काहीच आठवत नाही, हीच दिदीबद्दलची माझी पहिली आठवण. एखाद्या माणसाच्या आठवणी काढण्यासाठी त्याच्यापासून दूर जावे लागते. दूर राहावे लागते. दिदीपासून आम्ही कधी दूर राहिलोच नाही, तर तिच्या आठवणी काढण्याचा प्रसंग कुठून येणार ?



खरे म्हटले तर अगदी लहानपणच्या आठवणींत दिदी फारशी डोकावतच नाही. ती सर्वांत थोरली बहीण. मीनाताई नंबर दोन. आशाताई नंबर तीन. आणि मग मी. दिदीच्या नि माझ्या वयांत बरेच अंतर असल्यामुळे तिची विशेष दोस्ती मीनाताईबरोबर असे. त्या दोघी अगदी पाठोपाठच्या. त्यामुळे त्यांचे खेळ, भातुकली, हितगुजे एकत्र चालत. मी अगदी लहान म्हणून त्या मला आपल्यात खेळायलाही घेत नसत. माझी दोस्ती आपली बाळशी– हृदयनाथशी– असे. कारण, तो माझा पाठचा. आमचे खेळणे, भांडणे, रडणे सारे बरोबरीने चालायचे. मोठी झाल्यावर आमच्या

## उषा मंगेशकर

# शैशवाच्या आठवणी

'सुरेल कलाकेंद्रा' चे कार्यक्रमही मी त्याच्याच सहकार्याने केले.

मला दिदीची पहिली आठवण आहे ती बाळबद्दलचीच आहे. बाळ लहानपणी दिसायला फार सुरेख होता. अगदी लहानपणचे मला आठवते ते हे की, बाळ सुंदर दिसे म्हणून दिदी त्याला नाटकांतले राजपुत्राचे कपडे घाली. हिरवी मखमलीची चड्डी आणि लाल मखमलीचा कोट असा पोशाख तिने त्याला चढवला की तो राजबिंडा दिसे. त्याच्याबरोबर ती मलाही राजकन्येचा पोशाख घालीत असे. मखमलीचा झगझगीत लाल फ्रॉक. आणि मग जाहिरातीसाठी तयार केलेल्या उभ्या गाडयांतून ती आम्हा दोघांना कौतुकाने फिरवीत असे.

आमचे बाबा मुलांना गाणे शिकवीत. त्या वेळी बाकीची सर्व भावंडे त्यांच्यासमोर बसून गात. मी मात्र कधी त्यांच्यांत बसले नाही. मी बाबांची खूप लाडकी होते, त्यामुळे अशा वेळी मी ऐटीत त्यांच्या मांडीवर बसे. मी बाबांच्या मांडीवर बसले आहे, ते गाणे शिकवीत आहेत आणि दिदी, मीनाताई तंबोरा धरून समोर गात आहेत हे दृश्य अजूनही मला डोळयांसमोर दिसते.

मला आठवते तेव्हापासून अगदी प्रारंभी आम्ही धुळयाला होतो. वर सांगितलेल्या आठवणी तिथल्याच. नंतर आम्ही पुण्याला आलो. या वेळी मी जेमतेम चारपाच वर्षांची असेन. दिदी आणि मीनाताई भातुकलीचा खेळ खेळत. क्वचित त्या मलाही आपल्याबरोबर खेळायला घेत. अशा वेळी दिदी आम्हांला सांगे, "झोपा आता. रात्र झाली." आम्ही आपल्या वेडयासारख्या खोटया खोटया झोपी जायच्या. अन् मग दिदी चोर म्हणून येऊन भातुकलीच्या खेळातल्या खाऊचा चट्टामट्टा करून टाकायची.

आमच्या बाबांचा पोशाखाच्या, वर्तनाच्या साधेपणावर फार कटाक्ष असे. त्यामळे आम्हा भावंडांचे कपडे साधे असत. दिदी तेव्हा फ्रॉक घाली. त्याच्या बाह्या मनगटांपर्यंत असत. आणि खूप दाट केसांच्या दोन लट्ठ वेण्या तिच्या पाठीवर रुळत

असत. आम्ही पावडर लावलेली बाबांना आवडत नसे. तसेच मुलींनी पान खाल्लेलेही त्यांना बिलकुल खपत नसे. पावडरची हौस भागवण्यासाठी पिठाच्या डब्यात हात घालून व तेच हात तोंडावर फिरवून दिदी आणि मीनाताई कधी कधी चेहरे उजळ करीत.

पुढे माझे बाबा गेले आणि आमचे आयुष्य एकदम बदलले. नंतर दिदी काम करू लागली. तिचा मिस्किल, थट्टेखोर स्वभाव बदलून ती बरीचशी गंभीर झाली. तिच्या मुद्रेवरचे अखंड हसूही मावळले. तेव्हा ती खूप कामे करी. तेव्हापासून तो आतापर्यंत मी तिला सतत कष्ट करतानाच बघते आहे.

तथापि त्या दिवसांतही तिने आम्हांला परिस्थितीची झळ सहसा लागू दिली नाही. आम्ही सर्वजण कोल्हापूरला आलो. दिदी विनायकांच्या 'प्रफुल्ल' कंपनीत कामाला राहिली. स्टुडिओची गाडी येऊन सकाळी तिला घेऊन जाई. नंतर दिवसभर तेथे काम करून रात्री केव्हा तरी ती घरी परत येई. कित्येकदा ती यायच्या आतच आम्ही धाकटी मुले झोपी गेलेली असू. दिदी तेव्हा फार कष्ट करीत असली पाहिजे. घरच्या खूप अडचणी असल्या पाहिजेत. पण त्या वेळी आम्हांला—विशेषत: मला आणि बाळाला—हे जाणवू नये, आमच्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये, म्हणून घरात सारेजण जपत. घरातले वातावरण कटाक्षाने प्रसन्न ठेवीत. जेवणखाण, कपडालत्ता, कशातही आम्हांला उणीव जाणवू नये याची दिदी काळजी घेई. ती त्या वेळी नृत्याचे शास्त्रोक्त पाठ घेत होती. सुटीच्या दिवशी ती आम्हांला नाचून दाखवी. कधी कधी स्टुडिओतल्या गंमती सांगून, वेगवेगळ्या माणसांच्या नकला करून ती आम्हांला खूप हसवी. कोल्हापूरला तिने आम्हांला शाळेतही घातले. चार लोकांपुढे आम्ही मुलांनी दीन, केविलवाणे दिसू नये, आमचे शिक्षण व्हावे, आमच्या मनांवर चांगले संस्कार व्हावेत यासाठी तिची सारखी धडपड चाललेली असायची.

पुढे विनायकराव अकस्मात वारले आणि परिस्थिती अधिकच विपरीत झाली. त्याच्या आधीच आमचे एकत्र घरही फुटले होते. विनायकांच्या 'प्रफुल्ल' कंपनीबरोबर दिदी आणि मीनाताई या मुंबईला आल्या होत्या. आणि माई व आम्ही सर्व भावंडे खानदेशात थाळणेर येथे आमच्या आजोळी जाऊन राहिलो होतो. कोवळ्या वयाच्या आपल्या दोन मुली मुंबईला परक्या माणसांत कसा दिवस काढीत असतील या कल्पनेने माई विलक्षण कासावीस होई. दिदीच्या पत्रांची ती आतुरतेने वाट पाही आणि पत्रातल्या मजकुरावरून मुंबईतल्या परिस्थितीचा अंदाज घेण्याचा ती प्रयत्न करी. दिदीची पत्रे संयमाने लिहिलेली असत. पण या दोघींना इकडे खूप त्रास होत असला पाहिजे, हे त्या पत्रांतूनही जाणवल्यवाचून राहत नसे. चव्वेचाळीस साली मुंबईला स्फोट झाला त्या वेळी दिदी आणि मीनाताई मुंबईतच होत्या. आपल्या मुलींचे तिकडे काय झाले असेल या कल्पनेने माई तेव्हा अतोनात घाबरून गेली होती.

पुढे दिदीने आम्हा सर्वांना मुंबईला आणले आणि आम्ही नाना चौकात राहू लागलो. आता दिदीची कामे एकाएकी खप वाढली. सारा दिवस ती गाण्यांचे रेकॉर्डिंग करण्यात गढलेली असे. त्या वेळी दिवसच्या दिवस असे जात की सकाळी आम्ही उठावे तो दिदी पहाटेच उठून कामाला गेलेली असे आणि रात्री ती परत येई तोवर आम्ही गाढ झोपलेले असू. सकाळी फक्त कपभर कॉफी घेऊन ती जाई. नंतर तिचे दुपारचे खाणे, चहा सारे बाहेरच होत असे. आता ती साड्या नेसत असे. पांढरी सुती साडी, पांढरे ब्लाऊज, केसांच्या दोन वेण्या, कसलेही प्रसाधन न केलेला चेहरा अशी तेव्हाची दिदी आजही डोळ्यांपुढे स्पष्ट दिसते. त्या वेळी तिला इतकी कामे असत की कधी कधी रेकॉर्डिंग उरकून घरी परत यायला तिला पहाटेचे तीन–चारदेखील वाजत.

नंतर दिदी एकदम भराभर प्रसिद्ध होऊ लागली. तिची गाणी रेडिओवर वाजू लागली, पण तिच्या या प्रसिद्धीचे खरे स्वरूप किंवा महत्त्व कळावे एवढाही समज तेव्हा आम्हांला आला नव्हता. त्यामुळे आम्हांला त्याचे काहीच विशेष वाटत नसे. तोवर आमच्या घरी रेडिओदेखील आलेला नव्हता. कित्येकदा दिदीची गाणी आम्ही लोकांकडच्या रेडिओवरच ऐकत असू.

पन्नास साली मद्रासच्या 'ज्युपिटर' कंपनीने चित्रपटासाठी दिदीची गाणी घ्यायचे ठरवले आणि रेकॉर्डिंगसाठी त्यांनी तिला मद्रासला बोलावले. दिदीला खूप आनंद झाला. ती आम्हांला म्हणाली, "आता तुम्हा सर्वांना मी मद्रासला घेऊन जाईन!" आणि आम्ही सगळीजणे मद्रासला गेलो, आम्ही सर्वांनी मिळून केलेला तो पहिलाच मोठा प्रवास. या प्रवासात आम्ही खूप मजा केली.

याच सुमारास घडलेला एक विलक्षण प्रसंग आज इतक्या वर्षांनंतरही काल घडल्यासारखा स्पष्टपणे मला आठवतो आहे. बावन्न-त्रेपन्न सालची गोष्ट असेल. नागपूरकरांनी नागपूरला दिदीच्या गाण्याचा कार्यक्रम ठरविला. कार्यक्रमासाठी दिदी, मी आणि बाळ गेलो होतो. पण नागपूरचा असह्य उन्हाळा आम्हांला बाधला की आणखी काही कारण झाले कोण जाणे; आम्हा तिघांनाही खूप ताप भरला. दिदी तर बेहोष अवस्थेत होती. आम्हांला कार्यक्रमाला उपस्थित राहणे केवळ अशक्य होते. आमच्या दिमतीला तिथले डॉक्टरदेखील होते. आणि त्यांनीही कार्यकर्त्यांना कार्यक्रम होऊ शकणार नाही, असे निक्षून सांगितले. पण कार्यक्रमाच्या संचालकांनी मात्र प्रेक्षकांना घाबरून की काय कुणास कळे, दिदी आता येईल, मग येईल, असे खोटेच सांगून त्यांना थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. थोड्या वेळाने प्रेक्षक खवळले. त्यांचा संताप आटोक्याबाहेर गेला. त्यांनी खुर्च्या फेकल्या, सामानाची मोडतोड केली. कार्यक्रमासाठी उभारलेल्या मांडवाला आग लावून दिली. एकच गोंधळ उडाला. आमचा दोष नसताना आमच्यावर ठपका आला. तेव्हापासून दिदी नागपूरला जात नाही.

नाना चौकात आम्ही राहत होतो तेव्हाची आणखी एक गंमत आठवते. दिदीला भरपूर पैसे मिळू लागल्यावर तिने आम्हा भावंडांसाठी खूप भारी कापड विकत आणले. ते सर्व कापड तिने एका शिंप्याकडे दिले. आमच्या कपड्यांची मापे घेऊन आणि कापड घेऊन शिंपी निघून गेला, तो पुन्हा आलाच नाही! कापड गेले नि कपडेही गेले.

दारिद्र्य आणि ऐश्वर्य — जीवनाच्या या दोन्ही अवस्था आम्ही अनुभवल्या; पण आमच्या घरातले वातावरण फारसे कधी बदलल्याचे मला आठवत नाही. आमच्या घरात जेवण हा मोठा समारंभ. अशा वेळी घरी असतील त्या माणसांना पंक्तीला थांबवून घेण्याची दिदीला मोठी हौस. माझ्या वडिलांपासून ही परंपरा चालत आली आहे. आम्हा भावंडांचे एकत्र खाणेपिणे, थट्टामस्करी, गप्पा, हसणे-खिदळणे सतत चालू असते. त्यामुळे घर गाजत राहते. आम्ही एकमेकांत खूप भांडतोदेखील. पण परक्यांपुढे मात्र आम्ही सारी एक असतो. नातेवाईकांपुढे देखील सतत आम्ही एकीने वागत आलो आहो. त्यामुळेच आजवर आमच्यांत कोणी फूट पाडू शकले नाही. गरिबी होती तेव्हाही नाही, आताही नाही.

दिदी बाहेरच्या जगात एक अत्यंत प्रसिद्ध अशी व्यक्ती आहे. मोठी कलावंत आहे. बाहेर ती कुठेही गेली तरी सर्वत्र तिला विशेष वागवणूक मिळते. पण घरात ती स्वतःचे वेगळेपण कधीही जाणवू देत नाही. थोरली बहीण म्हणूनही नाही, की मोठी कलावंत म्हणूनही नाही. घरात ती आमच्यातलीच एक सतत असते.

दिदीला शॉपिंगची भयंकर हौस आहे. त्यासाठी नाना दुकानांतून ती हिंडेल आणि कधी दमणार म्हणून नाही. अशा वेळी मात्र मी तिला न चुकता बरोबर हवी. दिदी काय काय खरेदी करील याचा नेम नाही. साड्या, पर्सेस, माळा, सेंटस्, हात-रुमाल, बहिणीच्या मुलांसाठी कपडे व खेळणी इथपासून तो क्रोकरी, रेकॉर्डस्, ट्रॅन्झिस्टर्स, रेडिओ इथपर्यंत सारे ती खरेदी करीत असते. लोकांना प्रेझेंटस् देण्याची तिला विलक्षण हौस आहे. घरातल्या माणसांपासून तो मित्रमैत्रिणींपर्यंत साऱ्यांचे वाढदिवस नेमके ध्यानी ठेवून त्या दिवशी त्यांना ती भेटी पाठवते. साड्यांच्या खरेदीबाबत ती अतिशय चोखंदळ आहे. पण तितकीच अनिश्चित. एक साडी घ्यायची असेल तर दुकानदाराला हजार साड्या काढायला लावील. आणि मग मला म्हणेल, "तू पसंत कर." मी साडी निवडते. गाडीत जाऊन बसेपर्यंत तिला ती साडी पसंत असते. पण मग पुन्हा म्हणते, "राणीमा, तू ही साडी परत करून ये. मला आता ही आवडत नाही."

सांगायला विसरलेच. ती मला 'राणीमा' म्हणते. बंगाली पद्धतीचे हे लाडके नाव तिने कौतुकाने मला दिले आहे.

एकदा तर दिदीने गाडी पसंत केली आणि मग तिची लहर फिरली. बाळला म्हणाली, "दुकानदाराला तू नाही म्हणून सांग." बाळची पंचाईत झाली. आता

शब्द कसा बदलणार ? शेवटी आशाताई मदतीला धावून आली. तिने दुकानदाराची कशी समजूत घातली कोण जाणे ! तो प्रसंग निभावला.

जेवणात दिदी खूप चोखंदळ आहे. जेवते अगदी थोडे, पण आवडी निवडी जास्त. मांसाहार तिला विशेष प्रिय आहे. पण वेळप्रसंगी तिखटात कच्चे तेल ओतून त्याच्याशी भाकरी आवडीने खाईल. रेकॉर्डिंग करून घरी यायला तिला रोज दुपारचे तीन-चार वाजतात. अशा वेळी जेवण थंड होऊन गेलेले असते. मग ती थोडेसे काहीतरी खाल्ल्यासारखे करते. नाहीतर दुपारच्या जेवणाला अजिबात फाटा.

दिदी सतत उद्योगात गढलेली असते. त्यामुळे गेली अनेक वर्षे घरातली सारी व्यवस्था मीच बघते. पैसाअडका, ठेवरेव बघणे, आल्यागेल्याचे स्वागत करणे, जेवणाची व चहाची व्यवस्था पाहणे, निरोप सांगणे, फोन घेणे ही सर्व कामे आपोआपच माझ्यावर येऊन पडली आहेत. एकदा मी एखादा निर्णय घेतला तर तो सहसा घरात कोणी बदलीत नाही. दिदीसुद्धा त्यात हस्तक्षेप करीत नाही.

कित्येकदा गंमत होते. कोणाला तरी फोनवर तिच्याशीच बोलायचे असते. काम अगदी क्षुल्लक असते. अशा वेळी दिदी कामात असल्यास दिदी म्हणून मीच दोन शब्द त्या माणसाशी बोलून टाकते. फोनवर आमचे आवाज वेगळे ओळखायला येत नाहीत. तो माणूस खूष होतो. खोटे बोलण्याचे पाप मात्र माझ्या पदरी पडते. पण त्याला काय करायचे ?

दिदीबरोबर चित्रपटांतली अनेक गाणी मी गाइली आहेत. कलावंत म्हणून तर ती मोठी आहेच, पण सहकारी म्हणून ती फार मदत करणारी आहे. गाण्याचे मर्म समजावून देईल, अवघड जागा स्वत: गळ्यातून काढून दाखवील, शब्दोच्चार चुकत असल्यास ते दुरुस्त करील, अशी ती गाताना पावलोपावली मार्गदर्शन करते. तिच्याबरोबर गाणे म्हणावयाची संधी मिळणे ही आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे.

दिदीच्या संगतीत मी खूप भटकले आहे. सर्व महाराष्ट्र तिच्याबरोबर हिंडले आहे. कलकत्ता, दिल्ली, मद्रास, कश्मीर, कन्याकुमारी सारे तिच्याबरोबर पाहिले आहे. प्रवासात जेथे जावे तेथे तिचा अफाट प्रसिद्धीचा व अपूर्व लोकप्रियतेचा प्रत्यय येतो.

आम्हा भावंडांना दिदीने फार ममताळूपणाने वागविले आहे. आमचे खूप लाड केले आहेत. स्वत:च्या आधी आमचा विचार तिने सतत केला आहे. माझ्यावर ती कधीही रागावलेली नाही. मग कठोर शब्द बोलून मला दुखवणे तर दूरच. आम्ही हवा तसा खर्च करतो. त्याचा जाब ती कधी विचारीत नाही. पुष्कळदा आम्ही एखाद्या वेड्या छंदात पैसे घालवतो. मला आठवते, एकदा मी नि बाळ बाजारात गेलो नि हजारो रुपयांची खूप खेळणी मुलांसाठी घेऊन आलो. अगदी वेड्यासारखी. घरी येताना भीती वाटत होती, काय हा खर्च ? आता दिदी काय म्हणेल ?

दिदी काही म्हणाली नाही; नुसती हसली मात्र. ●



# ओव्या आणि अभंग



“ दुष्काळी परिस्थिती आपल्या देशाला नवीन नाही. वर्षा-दोन वर्षाआड दुष्काळ या ना त्या भागात हमखास पाय पसरतो. १९४४ मधील बंगाल दुष्काळाला तोंड देण्याचे प्रयत्न सर्वत्र चालू होते. महाराष्ट्रातही सर्व क्षेत्रातील मंडळी दुष्काळनिवारण प्रयत्नात सहभागी झाली होती.

या राष्ट्रीय संकट काळी आपला वाटा उचलण्याच्या जाणिवेने मास्टर विनायक यांनी कोल्हापूर-मध्ये एक मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित केला.

त्या वेळच्या अनेक नामवंत कलाकारांच्या बरोबर विनायक-रावांनी मोठ्या विश्वासाने दीना-नाथ मंगेशकरांच्या मुलीची या कार्यक्रमासाठी निवड केली.

## वि. स. खांडेकर

# बाईंच्या गळ्यातून अवतरले तळ!

पॅलेस थिएटर प्रेक्षकांनी तुडूंब भरले होते. एकापेक्षा एक सरस कार्यक्रम होत होते. लता मंगेशकरच्या गीतगायनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाची रात्र रंगवण्याचे खरे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. या प्रसंगी प्रकट झालेल्या गान कौशल्यातून लताच्या उज्ज्वल भवितव्याची चाहूल लागली."

सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर जुन्या आठवणींना उजाळा देत लताबाई-संबंधी शरद गोखले यांच्याजवळ सांगत होते.

खांडेकर-मंगेशकर कुटुंबांचे स्नेहसंबंध ही स्वत: खांडेकरांनाही आश्चर्याची बाब वाटते. खांडेकरांचे वास्तव्य कोल्हापूरमध्ये; तर लताबाईंसकट सर्व मंगेशकर मुंबईमध्ये. परंतु तरीही दोन्ही घरांमधील परस्पर आपुलकीमुळे अतूट स्नेह निर्माण झाला आहे, असे भाऊसाहेबांना वाटते.

दीनानाथ मंगेशकरांच्या मृत्यूनंतर मास्टर विनायकरावांनी मंगेशकर कुटुंबियांना आग्रहाने आपल्याजवळ बोलावून घेतले.

'सरकारी पाहुणे' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी विनायकरावांनी बेबी आचरेकर व लता मंगेशकर या दोन नवीन मुली आणल्या. तीच आमची पहिली ओळख.

'नवयुग' बंद पडल्यानंतर विनायकरावांनी 'प्रफुल्ल चित्र'ची स्थापना केली व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांबरोबरच लता कोल्हापूरला आली. लताला लाभलेल्या दैवी देणगीचा निश्चित उपयोग करून घेता येईल असा विश्वास विनायकरावांना वाटत होता. या विश्वासातून त्यांनी 'माझं बाळ' या चित्रपटामध्ये गाणे घातले.

लताचे वय या वेळी १३–१४ वर्षांचे असावे. गानकलेमध्ये लता चांगली यशस्वी होईल, अशी खात्री असल्यामुळे विनायकरावांनी लताला संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्याची व्यवस्था केली. लताला स्वत:ला लहानपणापासून गाण्याची विलक्षण आवड होती. या मुलीच्या आवाजामध्ये इतरांपेक्षा काहीतरी वेगळे आहे, याची जाणीव इतरांना होती. उणीव होती ती फक्त शास्त्रशुद्ध शिक्षणाची. त्याची सोय झाल्यानंतर संगीतातील प्रगतीस वेग आला.

विनायकांच्या अनेक चित्रपटांच्या कथा भाऊसाहेबांनी लिहिल्या आहेत. कथेची निवड झाल्यावर होणारी चर्चासत्रे भाऊसाहेबांच्या घरी होत असत. अनेक वेळा लता विनायकरावांच्या बरोबर भाऊसाहेबांच्या घरी येत असे; परंतु वय लहान असल्याने स्वाभाविकपणेच तिला आपला वेळ खेळण्यामध्ये अथवा ऐकण्यामध्येच घालवावा लागे. भाऊसाहेब म्हणाले, "तिचे वय व परिस्थिती यांच्या मर्यादांमुळे माझी प्रत्यक्ष बातचीत क्वचितच होत असे. आणि मी बोललोच तरी सर्वसाधारण चौकशीचे जुजबी प्रश्न विचारण्यापलीकडे आमचे बोलणे होत नसे. असे असूनही आमच्या घरी वारंवार येऊन तासन् तास वावरल्याने लताला आमच्या घरातील सर्वांबद्दल व आम्हांला तिच्याबद्दल आत्मीयता वाटू लागली व कालांतरानंतर व्यवसायनिमित्ताने लता दूर जाऊनही हा जिव्हाळा टिकून आहे."

या कौटुंबिक स्नेहसंबंधांमुळेच १९५९ मध्ये बाईंचा भाऊ हृदयनाथ निर्माता झाल्यावर त्याच्या 'अंतरीचा दिवा' व 'माणसाला पंख असतात' या चित्रांची कथा भाऊसाहेबांनी लिहिली. व्यवसायापासून बराच काळ दूर असूनही लताबाईंच्या आग्रहामुळे भाऊसाहेबांनी हे काम स्वीकारले.

१९५१ च्या अखेरीस खांडेकरांच्या डोळ्यांवर इलाज करणे आवश्यक झाले. डॉक्टरांनी शस्त्रक्रियेसाठी मुंबईला जाण्याचा सल्ला दिला. भाऊसाहेबांच्या डोळ्यांवर ऑपरेशन होणार, अशी माहिती लताला मिळताच भाऊसाहेबांना तिने स्वत:च्या घरी ठेवून घेतले. या प्रसंगासंबंधी बोलताना भाऊसाहेब म्हणाले, "मी मुंबईस आल्याचे समजताच माझ्याकडे अनेक साहित्यिक व अन्य मित्रमंडळी येत असत. या मंडळींची वर्दळ इतकी वाढली की त्याचा मंगेशकर कुटुंबियांना त्रास होतो की काय, असे मला वाटे. परंतु आपुलकीने भेटावयास येणाऱ्या या मित्र मंडळींना नकार देणेही शक्य नसे. आमच्या कौटुंबिक स्नेहसंबंधांमुळेच सर्व मंगेशकरांनी हा त्रास सोसला व माझी सर्वतोपरीने काळजी घेतली.

कौटुंबिक स्नेहाचा हा प्रसंग मी 'माणूस'जवळ सांगितला, हे त्यांना कदाचित रुचणार नाही; परंतु स्वभाववैशिष्टय, मित्रमंडळीसाठी झीज सोसण्याची तयारी, या त्यांच्या गुणांवर प्रकाश पडत असल्यानेच मी हा प्रसंग सांगितला. स्वभावावरून निघाले म्हणून सांगतो, मराठी माणसांसंबंधी, मराठी चित्रपट व्यवसायासंबंधी बाईंना कमालीची आत्मीयता आहे. आपली माणसे पुढे यावीत, मराठीचे

मराठीपण कायम टिकावे म्हणून त्या सर्वतोपरीने प्रयत्न करीत असतात. लताची मराठी वाचनाची आवड दांडगी आहे. परप्रांतीय साहित्यिकांच्या उत्कृष्ट साहित्याशीही तिचा सतत संपर्क आहे. शरश्चंद्र हे तिचे आवडते लेखक. सामाजिक व राजकीय परिस्थितीबाबत तिची निश्चित मते आहेत. समाजाचा एक घटक म्हणून आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींमध्ये लताला गोडी आहे. कामाचा प्रचंड व्याप सांभाळून या सर्व आघाड्यांशी ती सतत संपर्क ठेवते हे विशेष आहे.

असामान्य गुण लाभलेल्या या कलावंताच्या बाबतीत सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या उदासीनतेबाबत भाऊसाहेबांनी नाराजी व्यक्त केली. आवाजाच्या गोडव्याचे मी वेगळे वर्णन करायला पाहिजे, असे नाही. परंतु असामान्य गानकौशल्य असलेल्या या कलावंताचा आपण समाजाच्या सांस्कृतिक परिपोषासाठी काय उपयोग करतो, असा प्रश्न विचारून ते म्हणाले, "गणपतराव जोशी व तत्कालीन अन्य श्रेष्ठ कलावंतांची ध्वनिमुद्रित भाषणे व गीते उपलब्ध नाहीत म्हणून आपण खेद करतो. आज लताच्या हजारो ध्वनिमुद्रिका आहेत. 'घनःशाम सुंदरा' सारखी भूपाळी तिने अमर करून ठेवली आहे. भा. रा. तांबे यांच्या 'जन पळभर म्हणतील हाय हाय,' 'मधु मागशी माझ्या सख्या परी,' या कविता तिने त्यातील भावार्थासह श्रोत्यांपर्यंत पोचवल्या आहेत.


ज्ञानेश्वराच्या ओव्या, तुकारामाचे अभंग बाईंच्या गळ्यातून अवतरले तर त्याची गोडी शतपट वाढणार आहे. केशवसुतांची जन्मशताब्दी नुकतीच साजरी झाली. या प्रसंगाच्या निमित्ताने लताबाईंकडून त्यांची कवने ध्वनिमुद्रित करून घेतली नाहीत, याचे आश्चर्य वाटते.

सांस्कृतिक शिक्षणाचा भाग या दृष्टिकोनातून लताबाईंचा उपयोग करून घेणे अत्यावश्यक असल्याचे भाऊसाहेबांनी मजजवळ बोलून दाखवले व श्राव्य–दृक ( Audio–Visual Mthod ) पद्धती सांस्कृतिक शिक्षणासाठी असलेले महत्त्व लक्षात घेऊन शासकीय पातळीवरून या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. ●

---

प्रफुल्ल–चित्राबरोबरच मा. विनायक यांनी काही काळ प्रफुल्लची नाटचशाखा चालवली. 'उसना नवरा' या नाटकाचे अनेक प्रयोग 'प्रफुल्ल'ने त्या वेळी केले. लताबाई या नाटकात काम करीत. अभिनय व गायन या दोन्ही आघाड्यांवर प्रेक्षकांची दिलखुलास पावती घेत. याच काळामध्ये त्या काही काळ सैगलची गाणीही म्हणत असत. कै. सैगल हे बाईंचे श्रद्धास्थान, त्यामुळे स्वाभाविकपणेच गाणी कमालीची रंगत.

---



# कहाणी कोणा एकेकाळी



वेळ अशीच दुपारची.
पेडर रोडवरील एका
दिवाणखान्यात स्वर्गीय
मैफल भरली आहे.
बडे गुलामअली खाँ असे व्यासपीठावर
बसले आहेत. बाजूला आहेत पंडित
रविशंकर. समोर स्वरांच्या दुनियेत
मश्गूल झाले आहेत भीमसेन जोशी.
मैफलीला दाद देणारा श्रोताही तितकाच
तोलामोलाचा, काकणभर वरचढच आहे.
मैफल भरविली आहे या श्रोत्यानेच.
शब्दांच्या अर्थगर्भ शून्यातून मैफलीची
ही स्वर्गसृष्टी या श्रोत्याने उभी केली आहे.
श्रोत्याचे नाव ?
लता मंगेशकर.
कधी कोणा एकेकाळी भरलेली ही आगळी
मैफल ! नुसती शब्दांची; परंतु
सुरांचा सागर उभी करणारी.
लताबाईंनी आपल्या शब्द सामर्थ्याने
उभ्या केलेल्या, कधी कोणी न
ऐकलेल्या मैफलीची
ही कहाणी—

## ल ता मं गे श क र

# भरलेल्या मैफिलीची

लता मंगेशकर बोलत आहेत. सूर दूरवर कोठेतरी थबकलेले, तरीदेखील त्यांच्या आवाजाला सुरांचा दिव्य स्पर्श आहे. गेली पंचवीस वर्षे आमच्या जीवनाला याच सुराने व्यापून टाकले आहे. कधी न मावळणाऱ्या या सुरांच्या इंद्रधनुष्याने जीवनाला काही अर्थ असल्याची विलक्षण जाणीव करून दिली आहे. हा सूर अखंड-पणे वाहतो आहे, आमच्या रोमरोमांत तो भिनून गेला आहे. लताबाईंनी खूप खूप गायलं आहे आणि त्याहून कितीतरी पटीने ऐकलं आहे. त्यांच्या कानांनी एकच गोष्ट केली आहे, गाणं आणि संगीत ऐकण्याची. सुरांची ही संगत अगदी लहानपणापासूनची. गाणं भिंगरीसारखं कानातच फिरायचं मुळी.

त्या सांगू लागल्या, "कोणा एकाचंच गाणं मला आवडायचं असं नाही. वेगवेगळ्या गायकांची गाणी मला आवडत. त्यातल्या त्यात लहानपणी रोशनआरा माझी खूप लाडकी होती. तिचं गाणं मी अगदी मनसोक्त ऐकायची. त्याचा व्हायचा तोच परि-णाम झाला. सकाळी रियाज करायला बसले कीं पुष्कळशा ताना अगदी रोशनआरा-सारखा येत. तिचा तुझ्यावर फार परिणाम झाला आहे. अशी नक्कल करीत जाऊ नकोस, असा सबुरीचा सल्लाही मला वारंवार मिळे. तशी नक्कल करण्यात मी पटाई-तच होते म्हणा. वडिलांची तर मी अगदी छान नक्कल करीत असे......" लताबाईंनी गाणं ऐकलं ते असं, उदंड. काही गायक आवडीचे तर काही नावडीचे. लताबाईंचे जसे लक्षावधी चाहते आहेत, तशा लताबाईही कोण्यातरी गायकाच्या चाहत्या आहेत.

बडे गुलामअली खाँची ठुमरी अशीच त्यांच्या डोक्यात घर करून राहिली आहे. "खाँ साहेबांना मी प्रथम ऐकलं १९४५ साली." त्या म्हणाल्या– त्यांची अतिशय गाजलेली रेकॉर्ड होती ती. "तिरछी नजर..." असे शब्द होते. मालकंसचीही एक रेकॉर्ड होती. खाँसाहेब अशिकअली खाँचं गाणं गातात असं मानलं जातं. या घरा-ण्याची गायकी ते गातात असे सर्व जाणते म्हणतात. बडे गुलामअलींच्या गाण्याला

कोणत्याही घराण्याचा वास नाही. त्यांचं गाणं स्वयंभू आहे. स्वतःच्या कल्पकतेतून आकारलेलं आहे. त्यांना सुचतंही छान. त्यांचा स्वर निघतो तो कल्पकतेच्या वारूवर आरूढ होऊनच. त्यांना गाताना इतक्या जागा सुचतात की ते सारं गाणं दहा–पंधरा मिनिटांत संपवून टाकतात. गाणाऱ्याला कल्पकता असणं फार महत्त्वाचं आहे. काहींना सुरांनी काठोकाठ भरलेला कंठ असतो, परंतु त्याला कल्पकतेची जोड नसते. त्यामुळे गाणं बांधलं जातं. हे बंदिस्त, बांधील गाणंच ते सतत गात असतात. शब्द मोजकेच, परंतु त्यांच्या साहाय्याने लताबाईंनी खाँसाहेबांना व्यासपीठावर आणून बसविल्यासारखा प्रत्यक्ष भास होत होता.

लताबाईंना गायक आठवत नाहीत, आठवतं ते त्यांचं कोठेतरी स्पर्शून गेलेलं स्वर्गीय गाणं. बोलण्याच्या ओघात त्यांना याद आली अमीरखाँच्या गाण्याची. ते गायला लागले की, सारं वातावरण पावित्र्याने भारून जातं. ईश्वरदत्त आवाज, अर्थात मेहनत तर निश्चितच आहे. त्यांचे गाणं ऐकताना डोळे मिटावेसे वाटतात, डोळ्यांसमोर कफनी घातलेला शुचिर्भूत मूर्तिमंत पावित्र्य असलेला साधू उभा राहिल्याचा भास होतो. अमीरखाँचा आवाज भारदस्त आहे. त्यांची ठुमरी मी कधी ऐकली नाही आणि ऐकायची इच्छाही होणार नाही, का कोणास ठाऊक ! परंतु त्यांची ठुमरी बडे गुलामअलींसारखी होणार नाही, अशी भीती मला वाटते......

आणि मग याद आली वडिलांची. कै. दीनानाथ मंगेशकरांची. त्यांच्याच सुरांच्या कुशीत सारे मंगेशकर कुटुंब वाढले. तो सूर सर्वांच्या गात्रागात्रांतून फुलला." ते अगदी वेगळं गाणं गायचे–" लताबाई सांगू लागल्या. " त्यांचे शब्द अतिशय स्वच्छ असत. आवाज पॉवरफुल असूनही गोड होता. काय उंच सुरात गायचे ते ! अतिशय विलक्षण. त्यांना सुचायचंच फार. गायला लागले की मला इतक्या जागा सुचतात की कोणती म्हणावी व कोणती म्हणू नये हे कळतच नाही ! तेव्हा सगळ्याच जागा मी म्हणून टाकतो असे ते नेहमी सांगत. त्यांचा फारसीचा फर्डा अभ्यास होता. पंजाबी संगीताचीही चांगली समज होती. हे दोन्हीही संगीत, गझलसारखे प्रकार त्यांनी आपल्यात आणले. भावबंधन, राजसंन्यास, संन्यस्त खड्ग, रणदुंदुभी या नाटकांतील पदे त्यांनी गायिली आहेत. ' धिक्कार मन साहिना ' त्या त्यांच्या पदाला एकदा चौदा वेळा वन्समोअर मिळाला होता. त्यांनी हे पद प्रत्येक वेळी वेगळ्या रागांत गायिले. मानापमानमधील सगळ्या चाली त्यांनी बदलल्या होत्या व त्या लोकप्रियही झाल्या होत्या. काय गायचे ते ! ' रणदुंदुभी ' नाटकातील पदे गायल्यावर रक्ताची उलटी करताना मी त्यांना पाहिले आहे...... त्यांचा खरा आवाज त्यांच्या रेकॉर्डसमध्ये ऐकायला मिळतच नाही. त्या वेळी रेकॉर्डिंग करण्याची एक वेगळी विशिष्ट पद्धती होती, त्यामुळे त्यांचा आवाज रेकॉर्डमध्ये दबल्यासारखा वाटतो. " वडिलांच्या आठवणीने निर्माण झालेल्या भावनांच्या कल्लोळाची सूक्ष्म किनार त्यांच्या आवाजात भासत होती.

"आवाजाची देणगी असलेला आणखी एक गायक म्हणजे सलामतअली खाँ." त्या पुन्हा आपल्या आवडत्या गायकाविषयी सांगू लागल्या "त्यांचा आवाज म्हणजे देणगीच! तेथे काही प्रश्नच नाही. अशी वेगवान तान घेतात, की थक्क व्हावे. पंखा सटकन गर्रकन् फिरावा तशी त्याची भयंकर वेगवान तान असते. तुम्ही सगळ्या गवयांच्या ताना ऐका आणि त्यांची तान ऐका. त्यांचा पेशन्सही वाखाणण्यासारखा. कंठाच्या कलशातून सुरांचे अमृत बाहेर पडू लागले की, मग तो कलश कधी रिता होतच नाही. रात्री नऊ वाजता त्यांच्या मैफिली ऐकायला आम्ही बसलो आणि पहाटे झुंजु मुंजू व्हायच्या वेळी बाहेर पडलो असे कित्येकदा झाले आहे."

भीमसेन जोशींचे सुरात मिसळून गाणे लताबाईंना आवडते. "त्यांच्याइतका बरोबर सूर फारच थोड्यांचा लागतो. एखादे वेळेस त्यांच्यापुढे तंबोरा बेसूर लागेल परंतु त्यांचा सूर अगदी बरोबर!" असे त्या म्हणतात.

दाक्षिणात्य संगीत आणि तेथील संस्कृती जतन करणारे लोक यांना लताबाई फार मानतात, त्यांच्या शब्दांत सुब्बलक्ष्मी म्हणजे एकदम 'सुरेल बाई!' दाक्षिणात्यांनी संगीत खरोखरच टिकवलं आहे. नादस्वरम हे त्यांचं वाद्य. कान फुटतील की काय असे वाटते. राजरत्नम पिलाई यांनी वाजवलेल्या नादस्वरमच्या एका रेकॉर्डने त्या विलक्षण भारावून गेल्या होत्या. सारा दक्षिण भारत लताबाई फिरल्या आहेत. खूपसा प्रवास त्यांनी मोटारीनेच केला. त्यांच्या खेड्यापाड्यांतून त्या हिंडल्या. प्रत्येक घरात एक वीणा आणि सरस्वतीची मूर्ती त्यांना आढळून आली. महाराष्ट्रातील या उलट परिस्थिती पाहिली की लताबाईंचा संताप उफाळून येतो. त्यांच्या आवाजाला उग्रतेची धार चढली– "हे दाक्षिणात्य संस्कृतीचे खरे उपासक. ते लोक महाकर्मठ आहेत, परंपरेला धरून आहेत. आपल्याकडे अभाव आहे तो याचाच. आपले गुरू शिष्याला आपल्या जवळचं सगळं शिकवीतच नाहीत. जे चांगलं ते ते या गुरूंबरोबर लय पावतं. दक्षिणेत त्यागराजाचा मोठा उत्सव साजरा होतो. लुंगी नेसलेले हजारो संगीतप्रेमी लोक उघड्या–वाघड्या अंगाने तळपत्या उन्हात एकसाथ गातात. महाराष्ट्रात असं दृश्य दिसतं का? मेहनत हा प्रकारच आपण विसरत चाललो आहोत. काही शिकाऊ मुली माझ्याकडे येतात, मी त्यांना सांगते, 'मी तुम्हांला काय गाणं शिकवणार? मीसुद्धा विद्यार्थिनीच आहे.' काहीजणी, भावगीत शिकवा आणि तेही अगदी सहा महिन्यांत 'टॉप' यायला हवं, म्हणून आग्रह धरतात. धन्य आहे. भावगीत शिकायचं तर रेकॉर्डस ऐका की! माझ्याकडे कशाला येताय?"

तयारी नसताना कोणीही एका दिवसात संगीतकार बनतो आणि वाटेल ते म्हणायला सांगतो. म्युझिक रूममध्ये चहा देणारा पोऱ्या संगीतकार बनतो आणि लताबाई गाणे म्हणा की म्हणून चक्क सांगतो. याचा उल्लेख करून लताबाई मिस्किलपणे म्हणाल्या, "हे असे लोक अक्षरशः गाण्याने आमचा गळा कापतात!"

आपली नाट्यगीते लताबाई फारशा ऐकत नाहीत. "बालगंधर्वांनी घालून दिलेल्या चालीच सारे उगाळतात. बालगंधर्वांनादेखील त्याचा कंटाळा आला," असे सांगून त्या म्हणाल्या, "आवाज मोकळा करून कोणी गातच नाही. 'चांद' शब्दाचे वाटेल तसे धिडवडे काढतात. 'हासरा' शब्द चक्क 'घासरा' असा ऐकू येतो! मदनाची मंजिरी, 'मदनाजी मंजिरी' सारखी ऐकू येते!"

मेहनतीचा, तयारीचा अभाव पाहिला की लताबाईंना सात्त्विक संताप येतो. मग भान राहत नाही. त्यातून त्यांची कळकळ दिसून येते. वाटतं त्या तळमळीने सांगत आहेत. "जे आपलं आहे, ते कुठेतरी जपून ठेवा. त्यावर मेहनत करा. काळाच्या ओघात बदल अपरिहार्य असला तरी मूळचे म्हणून काहीतरी हवेच." त्यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर "जर मूळ निगेटिव्ह नसेल तर फोटो येणार कोठून?"

पुन्हा लताबाई मूळ विषयाकडे वळल्या. भारतीय संगीताबरोबरच अनेक देशांचं संगीतही त्यांनी ऐकलं आहे. निरनिराळ्या देशांतील संगीताचा, गायकांचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. बोलता बोलता एकदम कोठल्यातरी इटालियन दिग्दर्शकाने कधी, कोठेतरी दिलेल्या संगीताचा संदर्भ त्या देतील तर पॉल रॉब्सनसारख्या गायकाला तो कम्युनिस्ट म्हणून कशी अधिक प्रसिद्धी मिळत गेली तेही सांगतील. स्पॅनिश गिटारची लज्जत काय आहे, अरबी संगीतातला मजा कोणता आहे, हे त्या विस्ताराने विशद करून सांगतील. "अरबी संगीतातले काही हेल आपल्याकडील दाक्षिणात्य संगीतासारखे वाटतात," असे त्या म्हणाल्या. अरबी संगीत कमालीचं आर्त आहे. त्यांच्याकडे फैरूज नावाची एक गायिका आहे. ती फारच सुरेल गाते. रेशमासारखा तिचा आवाज आहे–" हे शब्द लताबाईंचे. सर अब्दुल अहमद वाहाब हा आणखी एक अतिशय जबरदस्त अरबी गायक. त्याच्या संगीत–रचनेतील एक विचित्र पद्धत लताबाईंनी सांगितली. त्या म्हणाल्या, "या देशात मूळ सुरापेक्षा इतर सर्व वाद्ये ते पाव सूर कमी लावतात आणि तरीदेखील गाणे एकसुरातच लागते. मूळ स्वर वेगळा पडत नाही. त्यांचे ऑर्केस्ट्रेशन वेगळे वाटते."

स्पॅनिश संगीतातल्या बऱ्याचशा सुरांचे सूत आपल्याकडील सुरांशी जुळते. स्पॅनिश गिटार तर विख्यातच आहे. आपल्याकडे राहुलदेव बर्मन त्याचा जास्त वापर करतात. रशियन संगीताचे तर आपल्या संगीताशी खूप साम्य. 'मधुमती' चित्रपटातील आपण म्हणलेल्या 'दिल तडप, तडप...' या गाण्याचे ट्यून्स रशियनच होते, अशी माहिती त्यांनी दिली.

"बीटल्स'च्या संगीताविषयीचं लताबाईंचं मत रंजक आणि माहितीपूर्ण आहे. त्या म्हणतात, 'बीटल्स'चं संगीत बरेचसे जुने. रोमन व हिंदुस्थानी लोकसंगीताचे मिश्रण वाटते. त्यात बरेच आसामी लोकसंगीतही त्यांनी कुशलतेने वापरलेले दिसते. त्यांचे एक गाणे तर अगदी आपल्या मंगलाष्टकांसारखेच आहे. त्याचं गाणं अगदी सोपं आणि सरळ ताना, मुरके यांचा प्रणायाम नाही. चौघांनी एकत्र गाण्याचा

प्रयोग त्यांनीच प्रथम केला. केवळ एक फॅड, वेड म्हणून कोणी बीटल्सच्या मागे लागत नाही. त्यांचंही स्वतःचं अस वैशिष्टय आहेच. श्रोत्यांना आपण काहीतरी नवे दिले पाहिजे याची जाणीव त्यांना आहे. आपल्या संगीतातून काही चांगल्या गोष्टी पाश्चात्त्य संगीतकारांनी उचललेल्या आहेत; परंतु अनुकरण करताना त्याला ते स्वतःचा आकार देतात. आपण मात्र जसेच्या तसे उचलतो. मोसार्ट, बीथोव्हन, शोपेन यांच्या सिंफनीज आपल्याकडे कित्येकदा वापरल्या जातात."

नॅट किंग कोल, बिंग क्रॉसबी, पॅट बून हे त्यांचे आणखी काही आवडते पाश्चात्त्य गायक. लताबाईंच्या घरात शिरताच टेबलावर उठून दिसणारी एक स्केच असलेली तसबीर नॅट किंग कोलची आहे.

लताबाई सारख्या बोलत होत्या. मधूनच मार्मिक विनोद करीत होत्या, गंमती सांगत होत्या. विविध गायकांची वैशिष्टये मोजक्याच शब्दांत, परंतु अतिशय प्रभावीपणे मांडत होत्या. साऱ्या दिवाणखान्यातील वातावरण त्यांनी विलक्षण सजीव करून सोडलं होतं. दूरवर कोठेतरी लताबाईंच्याच 'ओ सजना...'ची रेकॉर्ड मंद स्वरांत वाजत होती, वातावरण चैतन्यमय होतं. वाटत होतं मैफल भरत आली आहे. देशोदेशींचे सूर एकत्र आले आहेत. कोणत्याही क्षणी गाणं सुरू होईल, सतार झंकारेल, पाश्चात्त्य वाद्यांचा कल्लोळ सुरू होईल आणि तशात बडे गुलामअली खाँची ठुमरी सुरू होईल– "याद पियाकी आवे..." सारं वातावरण त्यानं भारून जाणार आहे, सुरांची वलयं विस्तारणार आहेत. अस्मानालाही भिडणार आहेत. मैफल खरोखरच सुरू होणार आहे–

●

## उन्नीस और बीस –

प्रत्येक क्षेत्रात जशी स्पर्धा आहे तशी आमच्याही क्षेत्रात आहे. एकेदिवशी एक निर्माते माझ्याकडे एका नव्या गायिकेला घेऊन आले व म्हणाले, "लताजी, आप उन्नीस हैं, तो ये बीस है।" माझ्यापेक्षा ही गायिका सरस आहे, ही त्यांच्या बोलण्यातली खोच माझ्या लक्षात आली. मी म्हणाले, "ते ठीक आहे; परंतु तुलना करताना तुम्हांला माझा उल्लेख करावा लागलाच; तेव्हा मीही आहेच. तुलना करण्यासाठी माझा आधार तुम्हांला घ्यावा लागलाच; यावरून माझं स्थान दृढ असल्याचं अधिकच सिद्ध होतं. 'बीस'चे नाव घेताना 'उन्नीस'चा आश्रय तुम्हांला घ्यावा लागतोच!"



# तिने



"लता मंगेशकरसारखी गायिका आगामी शतकभरात तरी होणार नाही. अवघा हिंदुस्थान तिने सुरेल करून सोडला आहे. कलावंत म्हणून फार मोठी आहे ती. फार मोठी."

सी. रामचंद्र यांचे हे शब्द. लता मंगेशकरविषयी बोलताना ते हेच सांगतात. कलावंत म्हणून ती फार मोठी आहे. मग त्यांचे त्यांनाच वाटते, हे शब्द फार तोटके आहेत, तुटपुंजे आहेत. आणि म्हणूनच जणू ते पुन्हा पुटपुटतात, "फा ऽ र फा ऽ र मोठी

हिंदी चित्रपटांसाठी सी. रामचंद्र यांनी लता मंगेशकरची अनेक हिट गाणी केली. मैफिलमें जल उठी शमा (निराला), काटते हैं दुखमें दिन (परछायियाँ), धीरेसे आ जा रे (अलबेला), ये जिंदगी उसकी है (अनारकली), दिलकी दुनिया बसाके साँवरिया (अमरदीप). आजही कानांत घुमून राहणारी लता मंगेशकर यांच्या अनेक गाण्यांची स्वररचना

## सी. रामचंद्र

# हिंदुस्थान सुबेक करून टाकला

सी. रामचंद्र यांची आहे. लता मंगेशकर केवळ 'लता मंगेशकर'च होती तेव्हापासून तो आजची महान कलाकार बनेपर्यंतची तिची सर्व प्रगती त्यांनी बरीचशी जवळून पाहिली आहे. त्यामुळेच त्यांच्या शब्दांस फार किंमत आहे.

मास्टर विनायक यांच्याकडे लता कोल्हापूरला काम करीत होती; त्या वेळी एका गाण्याला अंतरा म्हणावयाचा होता म्हणून मी तिला बोलाविले हीच आमची पहिली भेट. साल १९४६. त्यानंतर फिल्मिस्तानमध्येच 'जवानी की रेल चली जाय रे' हे पहिले गाणे लताबाईंसाठी बसविले. ते फार आवडले म्हणून आणखी कामासाठी बोलविले पण विनायकांनी तिला सोडले नाही.

त्यानंतर आठवते ती खिडकी चित्रपटाच्या रेकॉर्डिंगसाठी मोहन स्टुडिओमध्ये येणारी लता. त्या वेळी ती रेल्वेने येऊन अंधेरीला उतरे व तेथून एवढेच लांब अंतर चालत चालत येई. सुरुवातीच्या या काळात तिने अतिशय हाल काढले. पण मेहनत सोडली नाही. कष्टांची कमी केली नाही. आणि म्हणूनच आजची लता निर्माण झाली आहे.

लताचा अतिमधुर आवाज ही दैवदत्त देणगी म्हणता येईल. पण गायकाजवळ कल्पकता असावी लागते, ती तिच्याजवळ आहे. शिवाय लताच्या बाबतीत आणखी एक गोष्ट म्हणजे, तिला योग्य दिशेने वाव मिळत गेला. गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश, आर. सी. बोरल यांच्यासारख्या मोठमोठ्या संगीतकारांकडे गायची तिला प्रारंभीच संधी मिळाली. त्या सर्वांचे रंग, ढंग व इतर खुणा तिने जशाच्या तशा आत्मसात केल्या. त्यामुळे तिला वेगवेगळ्या प्रकारचे गाणे गावयास मिळाले. नवनवीन गायकीचे शिक्षण मिळत राहिले.

या काळात आपले गाणे वाढविण्यासाठी लताने जातीने केलेली साधनाही खूपच

होती. नूरजहाँ, रोशनआरा या त्या काळच्या लोकप्रिय गायिका. त्यांची नवी रेकॉर्ड आली की लता दिवसच्या दिवस ती ऐकत बसे. या गायिका शब्द कसे फेकतात याचा बारकाईने अभ्यास करी. हिंदी चांगले व्हावे, शब्दांचे उच्चार स्पष्ट व्हावेत म्हणून याच काळात ती उर्दू शिकली.

यामुळे लताचे गाणे विविध प्रकारचे बनले आहे. त्याचा ठराविक साचा बनून गेला नाही. त्यातला गोडवा संपला नाही. गेल्या पंचवीस वर्षांत लताने सबंध हिंदुस्थानच सुरेल केला आहे. आता तिने परदेशांतून जावे. मोठमोठ्या मैफिली कराव्या आणि जगभर भारतीय संगीताची माधुरी नेऊन पोचवावी.

**प्रश्न** : असे म्हटले जाते की लता मंगेशकरने तुमची जी गाणी म्हटली ती विलक्षण लोकप्रिय झाली. त्यामध्ये असा एक सूर असतो की लता मंगेशकरशिवाय तुमची गाणी फारशी गाजली नाहीत.

**सी. रामचंद्र** : हेच उलटेही सांगता येईल. तिने माझ्याबरोबर जी गाणी म्हटली ती विलक्षण लोकप्रिय झाली. अर्थात इतरांबरोबर गायलेली तिची गाणीही लोकप्रिय होतात. पण मी आधी जन्माला आलो. आणि माझ्यादेखतच तिची गायिका म्हणून वाढ होत गेली, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**प्रश्न** : संगीतकार लताबाईविषयी काय सांगाल ?

**सी. रामचंद्र** : आनंदघन नावाने तीच संगीत देते, असे ऐकतो. तिला स्वत:लाच बहुधा संगीतकार म्हणून फारसा विश्वास वाटत नसावा. कारण तसा असता तर लता या नावानेच तिने संगीत दिले असते.

**प्रश्न** : नवीन चित्रपटांतील संगीतकाराच्या एकाच पद्धतीच्या सर्व संगीताचा उल्लेख आपण केलात. अशा परिस्थितीत लताबाईंच्या पुढील गाण्याबाबत काय म्हणता येईल ?

**सी. रामचंद्र** : हिंदी चित्रपटांचा संगीत विभाग दिवसेंदिवस खालावत चालला आहे. संगीताच्या धाटणीमधील वैविध्य व वैचित्र्य संपुष्टात येत आहे. पूर्वी संगीतास काही पद्धत असायची. अस्ताई, अंतरा यांचे महत्त्व होते. सुरांचे एकमेकांशी संबंध असत. आता या गोष्टींना लोक जुनाट म्हणत असतील, पण तेच खरे होते असे वाटते. आता मेलोडियस गाणेच नाही. सर्व काही ऱ्हिदमिक. लताचा आवाज मेलोडियस गाण्यांनाच साजेसा आहे. तशाच गाण्यांमध्ये तिचा आवाज खरा खुलतो हे खरे आहे. पण ऱ्हिदमिक गाण्यांमध्ये किंवा इतर प्रकारच्या गाण्यांमध्येही लताच्या गाण्याला जो फिनिश असतो तो इतर कोणामध्येही दिसणार नाही. त्यामुळे त्याची बरोबरी असंभवनीयच आहे.

**प्रश्न :** लताबाईंचे आणखी काही वैशिष्टच सांगता येईल ?

**सी. रामचंद्र :** स्पष्ट शब्दोच्चार यावेत म्हणून आजकाल शब्द चावून गाणारेच गवई फार झाले आहेत. त्याला अपवाद आहेत फक्त लता, रफी व मुकेश. त्यामुळे त्यांच्या गाण्यात अतिशय सहजता येते व ते अतिशय प्रवाही राहते.

## जाकर्ता ते कैरो


सर्व जगात जिच्या गाण्यांच्या सर्वांत जास्त रेकॉर्ड्स् आणि टेप रेकॉर्ड्स् झालेल्या आहेत, अशी व्यक्ती म्हणजे लता मंगेशकर नावाची एक ३३ वर्षे वयाची भारतीय स्त्री आहे; याची कुणाला कल्पनाही येणार नाही. केवळ पंचेचाळीस कोटी भारतीयच नव्हे तर ज्या ज्या आफ्रिकन आणि आशियन देशातून भारतीय चित्रपट दाखविले जातात अशा सर्व देशांतून तिचे चाहते श्रोते आहेत.

लताबाई स्वतः पडद्यावर कधीच येत नसल्या तरी कोणताही सामान्य चित्रपट 'हीट' करून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या नादमधुर आवाजात आहे. या आवाजाने चित्रपट निर्मात्यांनाही एवढी मोहिनी घातली आहे की एका निर्मात्याने आपल्या एकाच चित्रपटात चार नटयांना लताबाईंचेच आवाज दिले.

लताबाईंच्या गाण्याच्या रेकॉर्डस् जाकर्तापासून तो कोलंबोपर्यंत आणि काबूलपासून तो कैरोपर्यंतच्या सर्व रेडिओ स्टेशन्सवरून कोटयवधी लोक ऐकतात. भारतीय उपाहारगृहांतून आणि कौटुंबिक समारंभातून लताच्या गाण्याचीच मेजवानी असते. केवळ भारतातच लताबाई तेरा भाषांमधून गाणी गातात. लॅटीन प्रार्थना आणि त्यांची हिंदी भाषांतरेदेखील त्या गातात.

सध्या लताबाईंचा आपल्या चाहत्यांकडून आणि संगीतकारांकडून येणारा पत्रव्यवहार तीन सेक्रेटरी पाहतात. कधी कधी लताबाईंना दिवसातून अठरा तास गाण्याची तालीम करावी लागते आणि सहा नव्या गाण्यांचे रेकॉर्डिंग करावे लागते. पण तरीदेखील त्यांच्या आवाजाची धार आणि सुरांची फेक कधीही चुकत नाही.

**[ इंटरनॅशनल स्काला — पश्चिम जर्मनीतील एक लोकप्रिय मासिक : डिसेंबर १९६४ च्या अंकातून ]**



# मराठी चित्रपटांसाठी

माधव शिंदे मराठी चित्रपट रसिकांच्या चांगले परिचयाचे आहेत. 'मायेचा पाझर' पासून 'माणसाला पंख असतात' पर्यंत अनेक चित्रे त्यांनी दिग्दर्शित केली. 'शिकलेली बायको', 'कन्यादान', 'गृहदेवता' ही त्यांची विशेष गाजलेली चित्रे. त्यांच्या अनेक चित्रांवर राजमान्यतेची मोहर उमटली आहे.

व्यावसायिक संदर्भामध्ये लता मंगेशकर यांचा सहवास व मार्गदर्शन ज्या मराठी मंडळींच्या वाटचास आले त्यांपैकी माधव शिंदे हे एक.



स्वाभाविकपणेच या अंकात त्यांची मुलाखत अपरिहार्य ठरली.

माधवरावांना काय विचारायचे यासंबंधी काही निश्चित आखणी करून मी त्यांच्या कोल्हापूरमधील 'राजलक्ष्मी' मध्ये प्रवेश केला. औपचारिक गप्पा झाल्यावर मी लताबाईंवरील 'माणूस' च्या विशेष अंकाची कल्पना विशद करून सांगितली. मुलाखत सुरू झाली—

## माधवराव शिंदे

# बाईंनी खूप केले आहे

**मी :** माधवराव, आपला व लताबाईंचा अनेक वर्षांचा परिचय आहे. आपली निश्चित ओळख केव्हा झाली ते सांगू शकाल काय ?

**माधवराव :** आमच्या परिचयाला आज २५ वर्षे होऊन गेली आहेत. लताबाईंच्या व माझ्या परिचयाची माहिती व ओळख अशी विभागणी करावी लागेल. पुण्याच्या 'नवयुग' स्टुडिओमध्ये मी रसायन व संस्करण (लॅबोरेटरी) विभागाचा प्रमुख म्हणून काम करीत होतो. त्या वेळी श्रीपाद जोशी नावाचे गृहस्थ (सिनेनट) लताबाईंना घेऊन 'नवयुग'मध्ये आले. कै. दीनानाथांच्याबद्दल आदर असल्याने लताबाईंच्या अस्तित्वाची मी जाणीवपूर्वक दखल घेतली. त्या वेळी लताचे वय सुमारे ११–१२ वर्षांचे असावे. त्यानंतर विनायकरावांबरोबर स्टूडिओच्या आवारामध्ये लता अन्यत्र दिसत असे. परंतु लताचे लहान वय व माझा चित्रनिर्मितीच्या केवळ तांत्रिक अंगांशी येणारा संबंध यांमुळे जुजबी ओळख होऊनही त्या वेळी परिचय वाढू शकला नाही. तरी पुढे विनायकरावांची ' प्रफुल्ल ' मुंबईला आली. त्या वेळी नाना चौकाजवळ विनायकराव व मंगेशकर कुटुंबीय राहत. ' प्रफुल 'चा संकलन विभाग (Editing Dept.) याच भागामध्ये होता. माधव कांबळे या विभागाचे प्रमुख होते व मी त्यांच्याकडे शिकत होतो.

एक दिवस कामामध्ये असतानाच लताच्या बहिणीने–मीना मंगेशकरने–मला चित्रपट पाहण्यास येता का, असे विचारले. त्या सर्व बहिणी चित्रपट पाहण्यासाठी जात असल्याने त्यांना सोबतीची आवश्यकता होती. मंगेशकर मंडळी विनायकरावांच्या कुटुंबियांपैकीच मानली जात असल्याने मी होकार दिला. त्या प्रसंगापासून माझा व सर्व मंगेशकरांचा–अर्थात लताचासुद्धा–खऱ्या अर्थाने परिचय झाला व नाना चौकातील संकलन विभागामध्ये माझे सतत काम चालू असल्याने परिचयाचे

स्नेहभावामध्ये रूपांतर होण्यास वेळ लागला नाही.

विनायकराव हे मंगेशकरांचे मुख्य आधार. अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या अकाली निधनाने या मंडळींवर संकटपरंपरा कोसळल्याने त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले असेल, त्या संदर्भात तुम्ही काही आठवणी सांगू शकाल का; मी विचारले.

माधवराव सांगू लागले— विनायकरावांच्या मृत्युनंतर भावी कार्यक्रमांची आखणी चालू असताना मी लताबाईंना सहज विचारले, आता पुढे काय ? त्यावर त्यांनी आत्मविश्वासाने आपल्या भावी प्रयत्नांची कल्पना दिली.

यात्र काळामध्ये या सर्वांना आर्थिक टंचाई विशेष तीव्रतेने जाणवू लागली. मंगेशकर कुटुंबियांच्या मालकीची काही डोंगरवजा मालमत्ता त्यांच्या मूळ गावी होती. लताबाईंच्या मातोश्रींनी (माईंनी) मदतीची याचना न करता या मालमत्तेच्या आधारे कुटुंबाची आर्थिक गरज काही प्रमाणांत पूर्ण केली. आता विषयच निघाला म्हणून सांगतो, लताबाईंची आपल्या मातोश्रींवर अपार श्रद्धा आहे. मंगेशकरांना संपन्नता प्राप्त झाल्यावर अगदी अलीकडच्या काळात काही मामुली कारणांवरून त्यांचे व माईंचे काही किरकोळ भांडण झाले. रागाच्या तोऱ्यातच लताबाई गीत–ध्वनिमुद्रणासाठी निघून गेल्या. संध्याकाळी घरी येऊन पाहतात तो माई घरात नाहीत. त्या रागावून शेजारी आशाबाईंकडे जाऊन बसलेल्या! इतरांनी अनेक वेळा सांगूनही माई इकडे येईनात, जेवणाची वेळ झालेली आणि मातोश्री रागावलेल्या. पेच सोडवण्याचा एकमात्र मार्ग होता. त्याचाच अवलंब झाला. लताबाई तशाच शेजारी गेल्या. आईचे पाय धरले. माई, माझी मोठी चूक झाली, क्षमा कर, म्हणून त्यांची समजूत घालून माईंना घेऊन आल्या. मानापमानाचे छोटे नाटक संपले.

**मी :** विनायकरावांच्या कंपनीमध्ये लताकडे कोणत्या स्वरूपाची कामगिरी असे ?

**माधवराव :** लताच्या उज्ज्वल भवितव्याची विनायकरावांना पूर्ण कल्पना होती. परंतु दुर्दैवाने त्यांच्या हयातीत त्यांना यशसंपदेच्या शिखरावर विराजमान झालेली लता पाहावयास मिळाली नाही. अर्थात त्यांच्या हयातीत लताचे वय लहान होते आणि गाण्याबरोबर लताला भूमिकेचे शिक्षण देण्याकडेही त्यांचा कल असे, 'पहिली मंगळागौर', 'माझं बाळ', 'चिमुकला संसार', 'गजाभाऊ', 'बडी माँ', 'सुभद्रा' 'जीवनयात्रा', (राजकमल) या चित्रपटांत लताने लहान मोठ्या भूमिका केल्या. 'मंदिर' हे विनायकरावांचे शेवटचे चित्र. त्यातही लताला छोटी भूमिका होती.

**मी :** लताबाईंना पार्श्वगायिका या नात्याने निश्चित स्थान केव्हा प्राप्त झाले?

**माधवराव :** विनायकरावांच्या मृत्यूनंतर लता मंगेशकरने गाणी मिळावी म्हणून अपार कष्ट केले. परंतु सुरुवातीच्या काळात तेव्हाच्या मान्यवर दिग्दर्शकांनी तिच्या आवाजासंबंधी अनेक तक्रारी केल्या. कोणी म्हणे, आवाज किरटा आहे; तर कोणाला या आवाजात बालिशपणाचा भास होई; परिणामी नकार पदरी येई. परंतु बाईंनी

निराश न होता अधिक नेटाने प्रयत्न चालू ठेवले. यशाची पहिली चाहूल 'मजबूर'ची गाणी मिळाल्यानंतर लागली. बॉम्बे टॉकीजच्या या चित्राचे संगीत दिग्दर्शक होते गुलाम हैदर. यशाचा दुसरा टप्पा बॉम्बे टॉकीजच्या 'महल'मुळे गाठता आला. 'आयेगा आनेवाला'ने अफाट लोकप्रियता मिळवून दिली. कै. खेमचंद प्रकाश यांनी या चित्राचे संगीत-दिग्दर्शन केले होते.

लताबाईच्या आवाजाबद्दल ते अतिशय आत्मविश्वासाने बोलत.असा आवाज पुन्हा मिळणार नाही, असे उद्गार ते आपल्या सहकाऱ्यांजवळ नेहमी काढीत असत. 'महल' च्या अभूतपूर्व यशानंतर अन्य संगीत दिग्दर्शकांच्या सर्व शंका कुशंका दूर झाल्या. कामाचा रेटा सतत वाढू लागला. ज्यांनी पूर्वी झिडकारले तीच मंडळी त्यांना आदराने बोलावू लागली. बाईही पूर्वीचे विसरून जाऊन अन्तःकरणपूर्वक सहकार्य देऊ लागल्या आणि मग यशस्वी चित्रपटांच्या मालिकेतून आजचे अनन्यसाधारण स्थान बाईंना प्राप्त झाले.

**मी :** मराठी चित्रपट व्यवसायासंबंधी, बाईंचा निश्चित दृष्टिकोन काय आहे ? अनेक उलट सुलट 'सुरस' कथा या संदर्भात ऐकावयास मिळतात.

**माधवराव :** राजालाही पाठीमागे नावे ठेवणारी मंडळी असतातच की ! लताबाईच्याबाबत तसाच काहीसा दूषित दृष्टिकोन काही मंडळींनी स्वीकारला आहे. बाई मराठी चित्रपटांसाठी गाणी गात नाहीत, अशी क्वचित ओरडही केली जाते; परंतु माझा स्वतःचा अनुभव सांगतो. बाईंनी माझ्या अनेक चित्रपटांतील गाणी एक पैचाही मोबदला न घेता म्हटली आहेत. आणखी एक उदाहरण सांगतो. बाईना, मी हे सांगतो, हे कदाचित रुचणार नाही; परंतु त्यांच्यासंबंधीचे गैरसमज दूर होण्यास यामुळे मदत होईल.

*मराठी चित्रपटसृष्टीचे 'महर्षी' म्हणून ज्यांचा अनेकांनी गौरव केला अशा थोर कलाकारांच्या आप्तेष्टांच्या संकटकाळी बाई धावून आल्या. या मंडळींच्या राहत्या घरावरील सर्व कर्जे फेडून बाईंनी या कलावंतांच्या स्मृतीस कृतिपूर्ण आदरांजली वाहिली.*

मराठी चित्रपट–निर्मिती अखंड चालू राहावी म्हणून त्यांनी संकटकालामध्ये मराठी व्यावसायिकांना कोल्हापूरमध्ये चित्र–निर्मिती केंद्र उपलब्ध करून दिले.

इतकी माहिती सांगून माधवरावांनी प्रश्न केला—

मला सांगा आज हिंदी चित्र व्यवसायामध्ये यश संपादन केलेली अनेक मराठी मंडळी वावरत आहेत. यांपैकी किती जणांनी मराठी चित्रपट व्यवसायाच्या संदर्भात कृतिशील जागरूकता दाखवली आहे.

**मी :** 'सुरेल चित्र' च्या संदर्भात तुमचे व लताबाईचे आर्थिक संबंध आले. वैयक्तिक पातळीवरून याबाबत तुमचा काय अनुभव आहे?

**माधवराव :** खरं सांगायचं म्हणजे माझ्यासारख्या त्यांच्या सहकाऱ्यांना साहाय्य

करण्याच्या हेतूनेच बाई निर्मिती क्षेत्रात उतरल्या. 'सुरेल चित्र'च्या 'वादळ' या चित्राचे नावही त्यांनीच सुचवले. 'सुरेल' च्या सर्व चित्रपटांतून त्यांची गाणी आहेत. व्यवसायाचे स्वरूप गुंतागुंतीचे झाल्याने त्यांनी 'सुरेल' मधून भागीदारी काढून घेतली व एक पैचीही अपेक्षा न करता 'सुरेल' चे बॅनर मला देऊन टाकले. आमच्या व्यक्तिगत स्नेहसंबंधांमुळेच त्यांनी 'उदयकला चित्र' च्या 'राम राम पाव्हणं' या चित्रपटास संगीत दिले. सातत्याने कामाच्या दडपणाखाली असूनही ही अवघड जबाबदारी त्यांनी कशी पार पाडली याचे मला आजही आश्चर्य वाटते. माझ्या 'गृहदेवता' या चित्राची भारत सरकारने ताश्कंद चित्रपट महोत्सवासाठी निवड केली होती. मी उपस्थित राहणे अगत्याचे होते. मराठी व्यावसायिकांच्या मागे लागलेली आर्थिक अडचण या वेळीही पीछा सोडीना. लताबाईंच्या बहुमोल सहकार्यामुळेच मला या महोत्सवास हजर राहता आले. लताबाईंचे बंधू हृदयनाथ यांच्यासाठी मी 'अंतरींचा दिवा' व 'सूनबाई' या चित्रांचे दिग्दर्शन केले. व्यावसायिक पातळीवरून प्रदीर्घ सहवास राहूनही हेवा वाटण्याइतके माझे व सर्व मंगेशकरांचे संबंध चांगले राहिले.

**मी :** लताबाई चित्रपट व्यवसायासाठी इतक्या गोष्टी करतात; परंतु तरीही मराठी व्यावसायिकांचे सामुदायिक कार्यक्रम, संमेलने यांपासून त्या काहीशा अलिप्त असतात.

**माधवराव :** तुमच्या म्हणण्यात काहीसा तथ्यांश आहे. परंतु यामागे उलट-सुलट टीकेपासून चार हात दूर राहण्याचा त्यांचा उद्देश असतो. यापेक्षा त्यास विशेष महत्त्व नाही.

**मी :** लताबाईंच्या व तुमच्या या दीर्घ परिचयामुळे त्यांची काही स्वभाव-वैशिष्ट्ये तुमच्या पाहण्यात आली असतील. या संदर्भात काही आठवणी, प्रसंग सांगू शकाल काय ?

**माधवराव :** सांगायचे म्हटले तर तसे अनेक प्रसंग आहेत, परंतु वानगीदाखल एक-दोन सांगतो. या प्रसंगातील संबंधित व्यक्तीवर शितोडा उडवण्याचा उद्देश नाही, अशी प्रस्तावना करून माधवराव म्हणाले, काही वर्षांपूर्वी बाईंकडे तुमच्या पुण्याचेच गोखले, या नावाचे गृहस्थ चिटणीस म्हणून काम करीत होते. आर्थिक व्यवहारात गृहस्थाचा लौकिक चांगला नव्हता, परंतु बाई तिकडे दुर्लक्ष करीत. एकदा बाईंनी सात हजारांची रक्कम या गोखल्यांकडे देऊन त्यांना भरणा करावयास सांगितले. गोखले काही कामासाठी पुण्यास गेले. अपेक्षित दिवशी ते परत न आल्याने बाईंनी रकमेचा भरणा झाला आहे की नाही याची चौकशी करण्याची कामगिरी माझ्यावर टाकली. रक्कम भरली गेली नाही हे लक्षात येताच बाईंनी गोखल्यांना तार करून बोलावून घेतले; पुढील भवितव्याची गोखल्यांना कल्पना आली. मोठ्या मुष्किलीने खर्च केलेली रक्कम गोळा करून आपल्या कुटुंबियांसमवेत ते मोटारने

मुंबईकडे निघालें. मन विचलित असल्याने गाडीला पनवेलजवळ अपघात झाला. बाईंना फोनवर बातमी कळवण्यात आली. घटनास्थळी जाईपर्यंत गोखल्यांचे देहावसान झालें होते. परंतु त्यांच्याजवळ सात हजारांची रक्कम आढळून आली. या रकमेवर आपला काही अधिकार नसून ती रक्कम त्यांची असली पाहिजे, असा निर्वाळा बाईंनी पोलिसांजवळ दिला.

एकदा त्यांच्या डोळ्यादेखतच एका कामगाराने पोपट मारला.बाईंनी त्याच्याजवळ आपली तीव्र नापसंती व्यक्त केली व पुन्हा असा प्रकार घडू न देण्याविषयी बजावले.

प्रसिद्ध दिग्दर्शक मेहबूब यांच्या निधनानंतर बाईंनी त्यांचा एक कुत्रा कौतुकाने आपल्याकडे आणला व त्याच्या देखरेखीची जबाबदारी जयसिंग नावाच्या आपल्या ड्रायव्हरवर टाकली. दुर्दैवाने त्याची नजर चुकवून कुत्र्याने पलायन केले. बाई संतापल्या. जयसिंगचा हिशेब करून त्याला कमी करण्यापर्यन्त त्यांची मजल गेली. इतक्यात कुत्रे मिळाल्याची वार्ता दुसऱ्या नोकराने आणिली. आपल्या शीघ्र कोपाबद्दल बहुधा त्यांना खेद झाला असावा. सायंकाळी सर्व कुटुंबियांसमावेत त्या गंमत म्हणून एका नामवंत हॉटेलमध्ये जेवावयास गेल्या. आणि त्याच दिवशी आपल्या ड्रायव्हरला–जयसिंगला–त्यांनी एक सुरेख रेडिओ सेट् भेट म्हणून दिला. त्यांचा स्वभाव म्हणजे एक विलक्षण कोडे आहे. त्यांचा अनेक वर्षांचा सहवास लाभूनही मला ते पूर्णांशाने सुटलेले नाही.

मात्र तरीही केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला ललामभूत असलेल्या या श्रेष्ठ कलावंताच्या विश्वासातील मी एक सहकारी आहे, याचा मला सतत अभिमान वाटतो.

**मी : शरद गोखले**

## कोणा एकाचा वेळ–



★ लताबाईंना भेटण्यासाठी दोन महिला गेल्या होत्या. चांगल्या एक-दीड तास गप्पा झाल्या. लताबाईंचा निरोप घेताना त्यांतील एक महिला म्हणाली, "लताबाई, तुमचा वेळ कसा गेला हे ठाऊक नाही; परंतु आमचा मात्र वेळ फारच चांगला मजेत गेला. त्यावर लताबाई मिस्कीलपणे उद्गारल्या, "कोणा एकाचा वेळ चांगला गेला ना ?" मग झालं ..." ती महिला प्रफुल्लित चेहऱ्याने बाहेर पडली आणि एकाएकी लताबाईंच्या त्या उद्गारातील मिस्किलतेचे त्या महिलेस ज्ञान झाले, तिचा प्रफुल्लित चेहरा कसा झाला असेल, हे काय सांगावयास हवे ?



# पार्श्वसंगीत

दुपारची बाराची वेळ. कार्यालयातून घरी निघायचा विचार. एवढ्यात फोन घणघणतो–

" प्रेसमधून बोलतो आहे. "

" बोला. "

" कुणीतरी बुवा आले आहेत. तुम्ही या, असा साहेबांचा निरोप आहे. "

" येतो. "

' माणूस ' मधून श्रीगोंदवलेकर महाराज यांची प्रवचने येत होती. ती संपल्यावर काही अभंग अर्थासह द्यावेत, अशी कल्पना साहेबांजवळ केव्हातरी बोलून ठेवली होती. वारकरी संप्रदायातील एक अधिकारी व व्यासंगी बुवांचे नावही साहेबांजवळ तयार होते. बहुधा याच बुवांची भेट होणार ही कल्पना.

साहेब खुर्ची पुढे ओढायला सांगतात. टेबलावर नेहमी असलेले भले मोठे लिहिण्याचे पॅड माझ्यासमोर सरकवले जाते.

साहेबांना कुठली सुरसुरी आली आहे याची अजूनही कल्पना नाही.

# म्हणजे कसं हे समीकरण

" आपल्याला दुपारी दोन वाजता यांच्याकडे जायचं आहे. "

मी मान डोलावतो. बुवांची मान मात्र नकारार्थी हलते.

" मग आत्ताच. " साहेब.

बुवांनी ' नटराज ' मध्ये मुंबईला फोन लावला आहे. फोन मिळेपर्यंत वेळ होताच- माझा वेळ गृहीतच धरला गेला होता. साहेबांना वेळेची फिकीर तशी कमीच.

अजूनही भेटीचे प्रयोजन मला समजलेले नाही.

" पहिलं गाणं केव्हा ऐकलं ?" साहेब.

" असेल पंधरा वर्षांपूर्वी " बुवा.

" पहिलं गाणं नेमकं कोणतं ऐकलं हे सांगता येईल?" मी.

बुवांनी प्रश्न उडवून लावला. बुवांच्या मानाने प्रश्न अगदीच सपक निघाला. " रेकॉर्डिंग कंपनीत सहज कानांवर आलं. " एवढीच बुवांची आठवण.

फालतू गप्पांत दहा-पाच मिनिटे निघून जातात.

" उत्तमातल्या उत्तम दहा गवयांच्या गळ्यांत जे गुण असतात ते हिच्या एकटी-च्याच गळ्यात परमेश्वराने ठेवले आहेत. ईश्वरी देणगी ". बुवांनी एक जागा दाखवली.

या वाक्यामोवती संभाषण काही वेळ घोटाळते.

" मग तिच्या यशात प्रयत्नाचा भाग नेमका कोणता ?" या वेळी माझा प्रश्न बरोबर फेकला गेला असावा.

" तिचे उच्चारण. शब्दांची फेक. " बुवांच्या भुवया या वेळी वर चढलेल्या आहेत.

" आणि श्वासोश्वासावरील तिचा ताबा. गाणं म्हणताना वाटेल तिथे ती थांबली, दमली, नको तिथे शब्द, आलाप तिने तोडले असं तुम्हांला कधीही जाणव-णार नाही. "

" तिचं यश जागतिक आहे. कुठल्याही भाषेतले— अगदी जर्मन, इंग्लिश, फ्रेंच घ्या— कुठलेही गाणे ती त्या भाषेतल्या सर्वोत्कृष्ट गायकापेक्षा चांगले म्हणणार. आपला चॅलेंज आहे."

" एखादे वाद्य तिच्या आवाजाशी विशेष जुळतं असं म्हणता येईल का ?" प्रश्न.

" तिच्या आवाजाला साथच नको. ऑर्केस्ट्रा नेहमी असतोच. पण कुठल्याही साथीशिवाय तिचा आवाज लागेल. दैवी देणगी."

" तिच्या गळ्यात ' गांधार ' आहे, असं म्हटलं जातं. या गांधाराच्या कल्पनेला शास्त्रीय आधार आहे का?"

बुवांचा नकार.

" बरं ! शास्त्रीय संगीताचा तिचा अभ्यास पद्धतशीर झाला आहे ?" एक अवघड प्रश्न.

बुवांची मान हलते. " पण तिला शास्त्रीय संगीत फार छान समजतं. ती अगदी काळजीपूर्वक हे गाणं ऐकते. नमक्या जागेलाच दाद देते."

" तुमच्या मुलाखतीत घाला हो हे. सरकारने हिच्याकडे दुर्लक्ष केले आहे. वाटेल त्या फडतुसाला किताब देतात लेकाचे !" बुवा.

" ती दरबारी व्यक्तींकडे जात-येत नसेल. असे संबंध जोपासल्याशिवाय का कोणाला मानमरातब मिळत असतात !" बवांना डिवचून अधिक रंगवण्यासाठी टाकलेला एक पेचीदा सवाल.

" कलावंतांनी असं कोणाकडे जाऊ-येऊ नयेच मुळी. माझं तर एका मुख्य-

## अखेरची इच्छा !

एकदा, प्रसिद्ध कादंबरीकार श्री. गो. नी. दांडेकर हे श्री. बाबासाहेब पुरंदऱ्यांवर भयंकर खवळले. म्हणाले,

" बाबासाहेब, मी आता तुमची गर्दनच मारतो ! बस्स्, अखेरची इच्छा बोला !"

गुडघे टेकून, हात जोडून राजा हरिश्चंद्राच्या थाटात श्री. बाबासाहेब म्हणाले,

" इच्छा एकच आहे सरकार !"

" बोला !"

" लता मंगेशकरांना मी प्लेबॅक द्यावा एवढी एकच इच्छा आहे !"

मंत्र्याशी भांडणच झालं आहे. स्टेजवर एकदा बसायला खुर्ची दिली. मागाहून मंत्री आल्यावर मला उठा म्हणू लागले. मी सांगितलं, 'हट्. मी उठत नाही. मंत्री माग बसतील. मी निमंत्रित आहे. शिवाय तिकीट काढून प्रवास केला आहे. तुमचा मंत्री फुकट प्रवास करून येथे आला आहे."

साहेबांची आणि माझी एक नजरानजर. 'सांगत नव्हतो तुम्हांला बुवा महा आहे', हा साहेबांच्या नजरेतला भाव मला जाणवतो.

"बरं बुवा, संगीताला हिची देणगी कुठली मानता ?"

"पार्श्वसंगीत म्हणजे लता हे समीकरण. या क्षेत्रात कोणालाही तिचं नाव प्रथम उच्चारूनच पुढं बोलावं लागेल. अजून तिच्या जवळपासही पोचेल अशी पार्श्वगायिका निर्माण झालेली नाही."

"कोणता रस तिचा असा खास सांगता येईल ?"

"संगीतातले सगळे रस."

बुवा पिचकारी टाकायला बाहेर जाऊन येतात.

"पण मंत्र्याच्या थाटात सांगायचे तर करुण रस तिचा विशेष आवडता असावा असे आपले मला वाटते." 'असावा' या शब्दावर विशेष जोर आणि एक मिस्किल हसणे.

बुवांचं घराणं करुणरसप्रधान म्हणून तर बुवांचं हे मत बनलं नसेल, ही एक माझी शंका.

"करुणरस उभा करायला सोपा." साहेबांचं एक मत.

भामिनी, रुक्मिणीपेक्षा बालगंधर्वाची सिंधू अधिक लोकप्रिय, हे १९३१ मध्ये एका मासिकाने केलेल्या पाहणीत आढळून आलं होतं, हा मी सादर केलेला एक पुरावा.

बुवांचे लक्ष फोनकडे. आमचे घराकडे.

अच्छा वगैरे.



नामनिर्देश :
**बुवा** : पं. भीमसेन जोशी.
**साहेब** : माधवराव पटवर्धन.
**मी** : संपादक.



# अशी ती मीळा

मास्टर दीनानाथ म्हणजे कडकडणारी बिजली. मास्टर दीनानाथ म्हणजे लखलखणारे खड्ग. मास्टर दीनानाथ म्हणजे खळखळणारा प्रवाह.

सूर जणू त्यांना दिसत असे. एखाद्या सुराच्या मागे लागले, की तो पकडल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. ‘ कशी जागा पकडली ’ यासारखी त्यांची समाधानाची दुसरी जागा नसे. स्वराशी झोंब्या घेणारा, तो बेभान होऊन हस्तगत करू पाहणारा, त्या भरात मग अभिनयाकडे, मैफलीकडे दुर्लक्ष झाले तरी खंत न वाटणारा एक गायक नट म्हणजे मास्टर दीनानाथ. कित्येकदा तर असे होई, की स्टेजवर गाणे चालू असताना ऑर्गनवाला एखादी हरकत निराळीच काढून जाई. मग नाटक संपल्यावर दीनानाथांनी त्याला थांबवून धरावे आणि ‘ ती मघाची जागा पुन्हा काढ ’ म्हणून त्याच्यामागे लकडा लावावा. ऑर्गनवालाही ती जागा विसरलेला



## डॉ. वसंतराव देशपांडे

# तरी ही कला

असायचा. पण नाही. पुन्हा सगळे पद म्हटले जाई. मधूनच केव्हातरी ती जागा निघे. "हीच ती, हीच ती !" म्हणून मास्तर थांबत. गळयातून ती जागा निघाल्या-शिवाय ऑर्गनवाल्याचीही सुटका नसे, मास्तरांनाही विश्रांतीची आठवण नसे.

मास्तरांच्या मैफलीही नाटक संपल्यावरच खऱ्या रंगत. पाचपन्नास रसिकांचा गराडा पडे. आग्रह सुरू होई. मग जवळपास असणाऱ्या एखाद्या देवळात बैठकीची जमवाजमव. या वेळी वसंतरावांकडे काम येई ते सतरंज्या अंथरण्याचे, दूधकॉफीसाठी धावाधाव करण्याचे. संगीताचे विलक्षण वेड असणारा हा दहा-बारा वर्षांचा पोर विंगमध्ये बसून मास्तरांची सगळी नाटके पाही आणि मैफलीतली याची जागा म्हणजे मागचा कोपरा. कारण जाणकार प्रौढ मंडळींनी पुढचा भाग अडवलेला. पोराला तेथे कोण जागा देतो !

तसे मास्तरांनी वसंतरावांना शिकविले कमी. लहान मुलाला कौतुकाने काही सांगावे या भावनेने मास्तरांनी दोन पदे वसंतरावांना शिकविली. 'सुरसुखखनी तू विमला,' आणि 'दे हाता शरणागता', बस्स. पण मुलगा जात्याच चलाख. त्याने मास्तरांचे गाणे अलगद उचलले. आज दीनानाथांचं गाणं कसं होतं हे कुणाला ऐकायचं असेल तर वसंतरावांशिवाय ही हौस पुरवू शकणारा दुसरा गायक नाही.

पण मास्तरांची वृत्ती विलक्षण चंचल. चमत्कृतीचे भलते वेडच त्यांना होते. त्यामुळे श्रोत्यांना काहीतरी तेजस्वी, चमकदार ऐकल्याची भावना होई; पण परिणाम कमी साधे. श्रोतृमानसाच्या प्रतिक्रिया थोड्या अंतराने व सावकाशीने होत असतात. हे मानस कलावंतांकडून काही मोजक्या, नवीन पण ढोबळ सौख्याची अपेक्षा बाळगून आलेले असते. त्यामुळे कलावंताने—ज्याला लोकमानस जपायचे आहे

त्याने–नावीन्याबरोबरच काही सातत्याचे पथ्यही जपणे अवश्य असते. बालगंधर्व हे पथ्य सांभाळीत. त्यांची पदे पेटीवाल्याच्या साथीसह श्रोत्यांच्या काना-मनात खोल, घट्ट जाऊन बसलेली असत. त्यामुळे ठसा उमटला तो बालगंधर्वांचा. दीनानाथांचा हव्यास याउलट. 'काल मी हे पद तसे गायलो. आज मी हेच पद असे गाऊन दाखवीन' हे वेड. पण हा नावीन्याचा सोस कलेच्या परिणामाच्या दृष्टीने अखेरीस मारक ठरतो.

मास्तरांना भमिकाही मिळाल्या त्या त्यांच्या चंचल स्वभावानुरूपच. भावबंधनातील लतिका ही श्रोत्यांच्या–प्रेक्षकांच्या–मनावर भामिनी-रुक्मिणी-सिंधूइतकी मोहिनी केव्हाही टाकू शकणार नाही. दीनानाथांच्या वीरांगना गाजल्या; पण श्रोतृमानसाला सुशांत चंद्राननांच्या राजसगोड रूपाची तहानच अधिक असते, त्यामुळे गंधर्वांच्या भूमिका नुसत्या गाजल्याच नाहीत, तर कायमच्या स्मरणातही राहिल्या.

शिवाय बालगंधर्वांच्या यशात अभिनयाचा भागही मोठा होता. दीनानाथांचा पिंड हा गायकाचाच. मटियार बंकारसारखा अनवट रागही मास्तर कसून गायचे, अशी आठवण वसंतराव सांगतात. रंगभूमीवरही मास्तरांचे लक्ष अभिनय-पाठांतरापेक्षा गायनाकडेच लागलेले असायचे. केव्हा एकदा मधला गद्य भाग संपतो आणि मी गाण्यावर येतो असे त्यांना होत असे. मग या गाण्याच्या त्वरेपायी दोन-दोन पानांची गद्य संभाषणे उडवली गेली, त्यामुळे समोरच्या नटाची पंचाईत झाली, तरी पर्वा नाही. "\डिलिव्हरीही फार फास्ट." त्यामुळेच मास्तरांच्या बलवंत नाटक कंपनीत दोन "सेक्टर्स" अगदी चक्क वेगळे पडलेले असत. अभिनयाची बाजू चिंतामणराव कोल्हटकरांनी सांभाळायची, गाण्याकडे दीनानाथ. आणि मग बरेचदा असेही होई, की जे श्रोते केवळ गाण्यासाठीच आलेले असत त्यांच्या बाहेर थिएटरात पैजा सुरू होत. 'काय, आज मास्तर रंगत नाहीत'– 'दाखवू का रंगवून ? काय पैज – ?' मग आधीच्याच एखाद्या सामान्य नटाला, त्याच्या सामान्य गाण्याला\ दोन-दोन, तीन-तीन वन्समोअर. इकडे विंगमध्ये मास्तरांची चडफड. स्टेजवर येणार तेच तापून. काय बिशाद गाणे चढत नाही ! मागच्याचे वन्समोअर धुवून निघालेच म्हणून समजा. मग संभाषणाची काय मोडतोड होईल ती होवो.

## पहाडाचे भाग्य आणि दुर्भाग्य

"म्हणून मला वाटतं, की हा कलावंत त्या वेडचा महंमद-तुघलकासारखा काळाच्या फार अगोदर जन्माला आला." वसंतराव सांगत होते. खूप कल्पना, तेजस्वी कल्पना, नवीन कल्पना. पण काळ अनुकूल नाही. प्रत्येक काळात, प्रत्येक क्षेत्रात एकेक पहाड उभा असतो. तो कोणालाच उल्लंघता येत नाही. दीनानाथ ज्या क्षेत्रात वावरले त्या नाट्यक्षेत्रात बालगंधर्व हे पहाडासारखे अनुल्लंघ्य ठरले होते. सवाई गंधर्वांनी याचसाठी रंगभूमीचा निरोप घेऊन मैफलीकडे आपली दृष्टी

वळवली होती. दीनानाथ अधिक भाग्यवान ठरले याचे कारण त्यांना वऱ्हाड-नागपूरने दिलेला हात. बालगंधर्वांचे मुख्य वर्चस्वक्षेत्र पुण्या-मुंबईकडचेच राहिले. या उलट 'बलवंत' चे मालक कोल्हटकर वऱ्हाडकडचे. 'बलवंत' चे नाटककार वीर वामनराव हे वऱ्हाडचे एक बडे प्रस्थ. त्यामुळे दीनानाथांना वऱ्हाडकडे आपली छाप टाकणे सुलभ गेले. त्यांचे रंगभूमीवरचे तेज सुरक्षित राहिले. पण तो काळ म्हणून ओळखला गेला बालगंधर्वांचाच. मास्तर वंचित राहिले.

गुण असूनही वडिलांना न लाभलेले हे पहाडाचे वैभव त्यांच्या मुलीच्या पायाशी आज लोळण घेत आहे. तसे पाहिले तर मास्तरांच्या गाण्यातली चमत्कृती, आक्रमक-पणा लतापेक्षा आशाच्या गाण्यात अधिक दिसतो. आशाचे गाणे अनेक ढंगांचे आहे. मागणीप्रमाणे ती सर्व प्रकारचे गाणे गात असते. लताच्या आवाजाची जात नाजुक आहे व तिने एका विशिष्ट प्रकारचीच गाणी, विशिष्ट पद्धतीने म्हणण्याचा परिपाठ ठरवलेला दिसतो. अशी मर्यादा ठरवून घेणे ही कलावंतांची प्रगती, की स्थिती हे सांगता येत नाही. पण लोकमानसावर आपल्या गायकीचा दृढ संस्कार यामुळे उमटतो हे खरे. लता हे आज एक संगीतातले 'घराणे' होऊन बसले आहे. "नाही-तर आपला 'पब्लिसिटी वर्ल्ड' मधला, प्रसिद्धीच्या दुनियेतला अनुभव काय सांगतो ?" वसंतरावांनी प्रश्न केला आणि उत्तरही लगेच दिले-" जास्तीत जास्त म्हणजे दहा वर्षे. यापेक्षा अधिक काळ कोणाची कीर्ती, नाव या क्षेत्राला टिकत नाही. फार फास्ट क्षेत्र आहे. पण लता आज वीस-पंचवीस वर्षे शिखरावर आहे आणि पुढच्या अनेक वर्षांतही तिला शह देऊ शकेल असा आवाज निर्माण होण्याची शक्यता नाही. यासाठी दैवी देणगीच्या जोडीला तिने परिश्रमही भरपूर घेतले आहेत हे उघड आहे. "तुम्ही तिच्या ४८-४९-५० मधल्या रेकॉर्डस ऐका. अनेक प्रकारने सूर लावण्याचा, अनेक पद्धतीने गाणे म्हणण्याचा तिचा प्रयत्न त्यात तुम्हांला दिसेल. तिथे चाचपडणे आहे, अनुकरण आहे. विशेषतः नूरजहानचा प्रभाव तिच्यावर विशेष होता." शास्त्रीय संगीताच्या शिक्षणासाठीही तिची धडपड चालूच होती. त्या काळी तिने चांगल्या चांगल्या खाँसाहेबांचे गंडेही बांधले. पण 'मैफल' हे क्षेत्र आपले नाही हे तिने वेळीच ओळखले असावे. नूरजहान पाकिस्तानात निघून गेली होती, त्या वेळची दुसरी नामांकित गायिका शमशाद बूढी झाली होती. पोकळी निर्माण झाली होती आणि लताही तयारच होती. तिने अव-चित येणारा भाग्यक्षण अचूक पकडला. 'आयेगा आनेवाला' हे 'महल' मधले गाणे तिची पहिली हिट. आणि मग हिट्सच हिट्स.

तीच काय, पण तिच्यामुळे नवे संगीतदिग्दर्शकही पुढे आले, नवे कवी-गीतकारही जन्माला आले. "आमचे ठाण्याचे पाटील!" "सावळाराम पाटील ... पी. सावळाराम?" "अहो! कवी ठरला!" वसंतरावांना एक नाव सहज आठवले.

त्यांच्या एका सूचक गीताचीही कोणाला तरी आठवण झाली ......
'कल्पवृक्ष कन्येसाठी......'


लताच्या बाबांनीच संगीताचा हा कल्पवृक्ष तिच्यासाठी लावला होता. त्याची जोपासना तिने पुढे केली. पण बीजसंस्कार हा पित्याचा, आणि तोच खोल आणि अवीट असेल तर परिश्रमाने त्यातून वटवृक्ष फुलू शकतो, वाढू शकतो. मास्तरांनी लताला प्रत्यक्ष तालीम कमी दिली असेल, मास्तरांची आणि लताची गायकीही वेगळी असेल, पण 'सूर' मास्तरांनी दिला. अगदी लहान वयात हा 'सूर' तिच्या काना-मनात, हृदयात खोल रुजला. संगीताच्या वातावरणात ती लहानाची मोठी झाली. याचे मोल फार आहे. "बालवयातल्या संस्काराला मी तरी फार महत्त्व देतो," हे वसंतरावांचे मत आधुनिक मानसशास्त्राचेही मत ठरू पाहत आहे.

"आणि त्या सूक्ष्म बीजाचा हा केवढा वटवृक्ष फोफावला आहे! अहो, बी. बी. सी. ला लताची गाणी लावावी लागतात. कित्येक पिढ्या लताचे नाव घेतले जाणार आहे. नुसते 'घराणे'च नाही, तर ज्यांची नावे काळालाही पुसून टाकता आली नाहीत अशा गोपाल नायकांच्या, बैजूच्या, तानसेनच्या मालिकेत लताचे स्थान आहे. त्यांचा एक स्वरही आज कोणाला माहीत नाही. पण ते संगीताच्या क्षेत्रात अमर आहेत, दीर्घायुषी ठरले आहेत. लताला हे दीर्घायुष्य लाभणार आहे. त्या मीरेला जसे कोणी विसरू शकत नाही तसेच या लतेलाही विसरणे शक्य नाही."

वडिलांनी लावलेल्या कल्पवृक्षाच्या आधाराने गगनापर्यंत वर गेलेली लता ●

**[ डॉ. वसंतराव देशपांडे यांच्या मुलाखतीच्या आधारे ]**


# स मा प्त



# भारतातील
# शेती व्यवसायाचा
# कायापालट




नांगर




पेरणी यंत्र

भारतातील शेती ही गेली हजारो वर्षे परंपरागत पद्धतीने केली जात होती. पण आता या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हे या क्रांतीच्या प्रारंभाचे प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयीस्कर नांगर, पेरणी-यंत्र, पाणीपुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्यूगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिती करून किर्लोस्कर कारखान्याने शेतीव्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची चालना दिली आहे.


**किर्लोस्कर ब्रदर्स, लिमिटेड.**
किर्लोस्करवाडी (जि. सांगली)



अॅजिन पंपसेट



इलेक्टिक पंपसेट




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.